# महाराष्ट्र शासन

# वन विभाग

## टिम फॉरेस्ट – लक्ष्य पुढील तीन वर्षांचे




वन, वन्यजीव, जैवविविधता व
पर्यावरण रक्षण, संवर्धन व
सुरक्षितता आणि सामाजिक
वनीकरण या दिशेने पुढील तीन
वर्षातील लक्ष्य आणि त्या दिशेने
वन विभागाची दमदार वाटचाल.



**सुधीर मुनगंटीवार**
**मंत्री (वित्त, नियोजन व वने)**

## मनोगत

मनुष्य जीवन आणि वने, वन्यजीव,पर्यावरण व निसर्ग यांचे खूप जवळचे नाते आहे. जीवसृष्टीसाठी आवश्यक शुध्द हवा, ताजे पाणी आणि सकस अन्न या तिन्हीचा आधार वने हाच आहे. सजीव सृष्टीच्या निर्मितीपासून माणसाला याची जाणीव आहे. म्हणूनच वृक्ष, वन्यजीव, जैवविविधता आणि पर्यावरण यांना मानवी जीवनात अनन्यसाधारण असे महत्त्व दिले असून त्याभोवती अनेक बाबी गुंफल्या गेल्या आहेत.

कोणत्याही विभागाच्या कामगिरीचे यशस्वीतता ही कार्यक्षम आणि सुयोग्य व्यवस्थापनावर अवलंबून असते. व्यवस्थापनाची भूमिका अत्यंत महत्वाची व आधारभूत असते. त्यासाठी नियोजन, नियंत्रण, नवनिर्मिती, संपर्क, जाहिरात आणि उत्तेजन या व्यवस्थापनामधील मूलभूत संकल्पनांचा सामावेश आपल्या कामात आवश्यक आहे. उत्तम व्यवस्थापनामुळे विभागातंर्गत विविध कार्यक्रम आणि योजना यांची अंमलबजावणी उत्कृष्टरित्या करुन इच्छित परिणाम साधता येणे शक्य असते. त्यासाठी दिलेले लक्ष्य आणि उद्दिष्ट गाठण्यासाठी विभागातंर्गत सर्व अधिकारी कर्मचारी यांनी कार्यक्षमपणे काम करुन पोषक असे अंतर्गत वातावरण निर्माण केल्यास आपणांस दिलेले लक्ष्य गाठणे शक्य होईल. त्यासाठी मुख्य धोरणांची आखणी, आवश्यक त्या साधनांची व्यवस्था, वित्तीय उपलब्धता इत्यादी संदर्भात देखील आपल्याला निश्चित दिशेने काम करुन आपल्या नजरेसमोरील उद्दिष्ट गाठणे शक्य होणार आहे.

बदलत्या परिस्थितीमध्ये जागतिक तापमानवाढ (Global Warming) आणि हवामानातील बदल (Climatic Change) ह्या दोन वैश्विक समस्यांचा सामना करण्यासाठी वनक्षेत्र आणि वृक्ष आवरण वाढविणे हे मोठे आव्हान आपल्या समोर आहे. त्याचबरोबर आहे ती वनसंपत्ती टिकविण्यासाठी अवैधरित्या होणारी वृक्षतोड, वृक्षचोरी, वनचराई, वनवणवा आणि वनावरील अतिक्रमण या समस्यांचा प्रभावीरित्या मुकाबला करावयाचा आहे.

सर्वच प्रमुख शहरे आणि गावांमध्ये मोठ्या प्रमाणात प्रदुषण आणि कार्बनचे उत्सर्जन होत आहे. ते नैसर्गिकदृष्या शोषून घेण्यासाठी मोकळ्या जागा आणि हरित आच्छाधन कमी होत आहे. त्यामुळे पर्यावरणाचा समतोल ढासळतो आहे. त्याचे सर्वच जीवांवर घातक परिणाम होताना दिसत आहेत. त्यासाठी सामाजिक वनीकरणाद्वारे हरित शहरे आणि गावे ही योजना राबविण्यासाठी आपण सर्वांनी कटिबध्द राहणे काळाची गरज आहे.

त्याशिवाय वन्यप्राण्यांच्या मनुष्यवस्तीमधील होणारा शिरकाव हे देखील मानव-वन्यप्राणी यांच्या संघर्षाचे कारण ठरत आहे. ज्यांना याची झळ सोसावी लागते त्यांच्या दृष्टीने वन आणि वन्यप्राणी ही समस्या आहे. हा विचार बदलून वन आणि वन्यप्राणी हे शाप की वरदान या दोन्हींमध्ये ते वरदान असल्याचे आपल्याला पटवून द्यावे लागेल. यांचे सरंक्षण आणि संवर्धन करणे, हे निसर्गाचा समतोल आणि वैविध्य टिकविण्यासाठी आवश्यक असल्याचे कृतीतून दाखवावे लागेल. तरच आपण वने संरक्षित राखू शकू. वनवैभव टिकले तरच जल, अन्न, पर्यावरण सुरक्षितता आपण राखू शकू. थोडक्यात आपल्याला आज-आत्तापासूनच या दिशेने पाऊले उचलावी लागतील. एका तज्ञाने अतिशय अचूक शब्दात म्हटले आहे “If not Now then When ? If not You then Who?” पुढच्या पिढ्यांचे कल्याण साधण्यासाठी इतिहास घडविण्याची संधी आपल्याला आहे, असा विचार करून या बदलांना सामोरे जायला हवे.

वरील बाबींची व्यापकता आणि महत्त्व लक्षात घेऊन वन विभागाने पुढील किमान तीन वर्ष वेगवेगळ्या अशा ९९ बाबी आणि घटकांवर लक्ष केंद्रीत करणे आवश्यक आहे असे मला मनापासून वाटते. सदर बाबींचे वर्णन थोडक्यात सोबत ठेवल्याप्रमाणे केले आहे. त्यांचे आणखी सखोल आणि विस्तृत विवेचन यापुढे वेळोवेळी करुन त्यानुसार कार्यवाही करता येईल. चंद्रपूर येथील वन विभागातील उच्च अधिकारी यांची परिषद दि. २० आणि २१ नोव्हेंबर, २०१५ रोजी झाली. त्या परिषदेमध्ये मी मुद्दामहून खास वेळ काढून सहभागी झालो होतो. त्यावेळी विविध विषयांवर विचारमंथन झाले.

प्रत्येक मनुष्याला ईश्वराने कर्तृत्वाची निसर्गदत्त देणगी दिली आहे. वन विभागामध्ये आपले कर्तृत्व दाखविण्याची संधी तुम्हाला मिळाली आहे हा योगायोग समजला पाहिजे. एक काळ असा होता की आपला देश वन प्रधान म्हणून समजला जात होता. राज्याला मिळणाऱ्या महसुलामध्ये वन विभागाचा वाटा फार मोठा होता. म्हणून महसूल व वन विभाग असा एकत्रित विभाग फार पूर्वीपासून अस्तित्वात आहे. त्यावरून वन विभागाचे महत्व अधोरेखित होते. तेच वैभव आपल्याला पुर्ववत आणण्यासाठी खूप मेहनत घेऊन आणि चिकाटीने काम करावे लागेल. चंद्रपूर येथील परिषदेमध्ये पुढील काळात आपणासमोर कोणती आव्हाने आणि उद्दिष्टे आहेत त्याबाबत उहापोह झाला आहे. त्यादृष्टीने निश्चित केलेली लक्ष्य गाठण्यासाठी नियोजनपूर्वक व कालबध्दरित्या काम करण्याबाबत आपण ठरविले आहे. “हरित महाराष्ट्र, सुरक्षित महाराष्ट्र” घडविण्यासाठी त्या दिशेने आपण दमदार वाटचाल करण्याचा दृढ संकल्प करु या !.

धन्यवाद !

# वन विभागासमोरील पुढील ३ वर्षातील लक्ष्य आणि उद्दिष्टे:-

## १) वन विभागांतर्गत उच्च अधिकाऱ्यांच्या वर्षातून किमान ५ चिंतन बैठका घेणे :-

वन आणि सामाजिक वनीकरणांतर्गत विविध योजना आणि कार्यक्रंमाबाबत सातत्याने उच्चस्तरावर आढावा घेणे आवश्यक आहे. वन विभागासमोरील वेगवेगळे विषय, आव्हाने आणि त्यांचा यशस्वीरित्या मुकाबला करण्यासाठी उच्च अधिकाऱ्यांच्या बैठकीमध्ये सखोल चर्चा आणि बौध्दिक विचारमंथन होणे गरजेचे आहे. त्यातून चांगले मुद्दे, विचार आणि संकल्पना समोर येतील. त्यामुळे विभागाचे कामकाज अधिक गतीशील करण्यास मदत होऊ शकेल. धोरण निश्चिती, नवीन संकल्पना आणि कार्यक्रम/योजना यांची अंमलबजावणीत येणाऱ्या अडचणी आणि त्यानुरूप सुधारणा करणे सुलभ होईल.

त्यादृष्टीने दर दोन ते अडीच महिन्यांनी राज्यातील एखादे महत्त्वाचे स्थळ निश्चित करुन त्या ठिकाणी उच्च अधिकाऱ्यांची परिषद आयोजित करण्यात यावी. या परिषदांना भारतीय वन सेवेतील व उप वनसंरक्षक संवर्गातील निवडक तरुण अधिकाऱ्यांना बोलावता येऊ शकेल. त्यांच्याकडील नवीन संकल्पना जाणून घेता येतील. त्याशिवाय इतर राज्यात जेथे वन विभागाचे काम उत्तम आहे, तेथील एखाद्या अधिकाऱ्यास बोलावून त्यांचे मार्गदर्शन घेण्याबाबत विचार करता येईल. अशा बैठकीचे यजमान पद कोणाकडे राहील हे आगाऊरित्या निश्चित करावे. दिनांक २० व २१ नोव्हेंबर २०१५ मध्ये चंद्रपूर येथे झालेल्या परिषदेचा अनुभव विचारात घेऊन पुढील परिषदांमध्ये अधिक सुधारणा कशी करता येईल हे देखील ठरवावे.

अशा बैठकांमध्ये एकाच वेळी अनेक विषयांना स्पर्श न करता काही ठराविक व मर्यादित विषय घेऊन त्यावर सांगोपांग चर्चा व्हावी. त्या विषयाबाबत धोरणात्मक बाबी आणि अंमलबजावणी संदर्भात निश्चित निर्ष्कषाप्रत यावे. जेणेकरुन अशा परिषदांचा सकारात्मक परिणाम दिसून येईल.

## २) उच्च अधिकाऱ्यांच्या बैठकांमध्ये झालेल्या निर्णयांचे सनियंत्रण करणे:-

उच्च अधिकाऱ्यांची परिषद सुरु असताना, त्या विषयातील जाणकारांनी, बैठकीत चर्चेला आलेले विषय, विविध अधिकाऱ्यांनी मांडलेले मुद्दे यांचे व्यवस्थित टिप्पण घेणे आवश्यक राहील. त्यानंतर बैठकीचे इतिवृत्त तयार करुन त्यामध्ये अंमलबजावणी अधिकारी आणि कालमर्यादा याचे देखील नोंद करण्यात यावी. त्यानंतर संबंधित निर्णयांची अंमलबजाणी होण्यासाठी आवश्यक असल्यास प्रस्ताव तयार करुन शासनाच्या मान्यतेसाठी विहित कालमर्यादेत सादर करणे आवश्यक राहील. शासनस्तरावर मंत्रीमंडळाची मान्यता किंवा अन्य उच्चस्तरावरील मान्यता गरजेची असेल तर त्या अनुरुप प्रस्ताव तातडीने सादर करण्याबाबत विशेष काळजी घेण्यात यावी. शासन निर्णय निर्गमित झाल्यावर त्या विषयांबाबत अंमलबजावणी परिणामकारकरित्या होण्यासाठी आवश्यक त्या निधीची उपलब्धता, आस्थापना इत्यादी बाबींसंदर्भात वेळीच कार्यवाही होईल याकडे कटाक्षाने पहावे. अंमलबजावणी अतिशय

वेगाने, अचूक आणि कालमर्यादेचे भान ठेऊन केली जाईल, याबाबत दक्षता घ्यावी. शासनाचा निधी कोणत्याही परिस्थितीत वाया जाणार नाही आणि निधीचा विनियोग अत्यंत चांगल्याप्रकारे होईल, याबाबत देखील गांभिर्याने कार्यवाही अपेक्षित आहे. असे झाल्यास आपण खरोखरच जनतेला उत्तम सेवा आणि सुविधा पुरविण्यामध्ये अग्रस्थानी राहू. त्यातून जनमाणसामध्ये वन विभागाची प्रतिमा अतिशच उच्च स्तरावर राहण्यास मदत होईल.

### ३) <u>प्रत्येक महिन्यात किमान एकदा व्हिडिओ कॉन्फरसिंगद्वारे संवाद साधणे:-</u>

माहिती व तंत्रज्ञानातंर्गत व्हिडीओ कॉन्फरसिंगद्वारे थेट संवादाचे प्रभावाशाली माध्यम उपलब्ध झाले आहे. अधिकारी/कर्मचाऱ्यांना विकास कामांची अंमलबजावणी करताना येणाऱ्या अडचणी आणि त्यामध्ये सातत्याने सुधारणा करण्यासाठी असलेला वाव या संदर्भात विचारविनिमय व संवाद आवश्यक आहे. त्यामुळे तळ स्तरावर येणाऱ्या अडचणी लगेचच समजू शकतील. त्यासाठी उपविभाग, विभाग, जिल्हा व प्रादेशिक स्तरावरील अधिकारी यांनी आपल्या अधिपत्याखालील अधिकारी/कर्मचाऱ्यांना वारंवार बैठकांस बोलविण्याची आवश्यकता असू नये. त्यामुळे कर्मचारी/अधिकारी यांचा प्रवासात नाहक वेळ जातो. शासकीय खर्च होतो. तसेच योजना/कार्यक्रम यांच्या अंमलबजावणीसाठी वेळ कमी पडतो. हे टाळण्यासाठी व्हिडीओ कॉन्फरसिंगद्वारे नियमित व महिन्यातून किमान एकदा संवाद होणे आवश्यक आहे. त्या दृष्टीने प्रत्येक कार्यालय प्रमुखांनी ठराविक वेळ निश्चित करुन त्या दिवशी व्हिडीओ कॉन्फरसिंगद्वारे योजनांच्या अंमलबजावणीबाबत आणि इतरही मुद्यांबाबत आपल्या अधिपत्याखालील अधिकाऱ्यांशी संवाद साधावा आणि निर्णय प्रक्रिया गतिमान करावी.

### ४) <u>वन विभागांतर्गत संशोधन संस्थेची निर्मिती: -</u>

कोणत्याही राज्याची आणि देशाची प्रगती ही संशोधन क्षेत्रातील कामगिरीवर अवलंबून असते. सातत्यपूर्ण संशोधनाचा उपयोग प्रत्यक्षात कृतीमध्ये आणल्यास त्याचा भरीव लाभ विभागाला आणि जनतेला होत असतो. वन विभागांतर्गत स्वतंत्र संशोधन संस्था नाही. त्यामुळे भौगोलिक परिस्थिती, हवामान, पर्जन्यमान, पाण्याची उपलब्धता आणि मातीचा स्तर इत्यादी बाबी विचारात घेऊन नवीन वृक्ष व वनस्पतींच्या प्रजाती विकसित करण्यास मर्यादा येत आहेत. तसेच दुर्मिळ आणि नष्ट होत चाललेल्या वृक्ष प्रजातींचे संवर्धन करण्यास देखील अडचणी येत आहेत. दुर्मिळ अशी वृक्षसंपदेचे संवर्धन करणे आणि त्याच बरोबर नवनवीन वृक्ष प्रजातींचा शोध घेणे ही देखील अतिशय महत्वपूर्ण बाब आहे.

वरील बाबींचा विचार करता वन विभागासाठी स्वतंत्र संशोधन संस्थेची स्थापना करणे ही काळाची गरज आहे. त्यादृष्टीने तातडीने कार्यवाही सुरु करण्यात यावी. अशा संशोधन संस्थेमार्फत स्थानिक व देशी वृक्ष व वनस्पतींचे संवर्धन होण्यासाठी संशोधन प्रकल्प हाती घेण्यात यावेत. त्याचबरोबर परदेशामधील वृक्ष/वनस्पतींचे विकसन आपल्या राज्यात करुन जैवविविधता कशारितीने वाढविता येईल याबाबत सातत्यपूर्ण संशोधन व्हावे. त्याचबरोबर साग, बांबू इत्यादी वृक्षांचे क्लोन संग्रहित करुन त्यांचा

उपयोग अधिकचे उत्पादन देणाऱ्या प्रजाती म्हणून वृक्षारोपण कार्यक्रमात करण्याबाबत देखील संशोधन कार्यक्रम घेता येतील. त्याशिवाय गौण वनोपज (Minor Forest Produces) उदा. लाक, डिंक यांचे उत्पादन वाढविण्यासाठी देखील संशोधन होणे गरजेचे आहे. सदर बाबी उदाहरणादाखल दिल्या असून इतरही वन आणि वन्यजीव क्षेत्रात मोठ्या प्रमाणात संशोधनास वाव आहे.

५) <u>नागरी क्षेत्रात वन उद्यानांची (Urban Green Park) निर्मिती करणे:-</u>

मॉन्सून २०१५ पासून नागरी भागात वन विभागाच्या पुढाकाराने " हरित शहर" योजनेची अंमलबजावणी करण्याचा निर्णय नगर विकास विभागाने दि.३१.०७.२०१५ रोजीच्या शासन निर्णयान्वये घेतला आहे. त्यातून उद्यान निर्मिती व वृक्ष लागवड करुन शहरांचे सौंदर्य खुलविणे आणि पर्यावरण संतुलन साधणे हा उद्देश आहे.

वन आणि सामाजिक वनीकरण विभागाने या कार्यक्रमांतर्गत वृक्ष प्रजातींची निवड, रोपांची उपलब्धता, रोपांची निगा व संगोपन, योग्य ती खते व किटकनाशकांचा वापर इत्यादी संदर्भात नागरी क्षेत्रातील स्थानिक स्वराज्य संस्थांना प्रशासकीय व तांत्रिक सल्ला पुरविणे अपेक्षित आहे. वन आणि सामाजिक वनीकरणाची भूमिक ही सातत्याने प्रेरक (Stimulator ) अशी असली पाहिजे. नागरी क्षेत्रामध्ये मोकळ्या जागा, रस्ते आणि इतर सामुहीक जागांचा शोध घेऊन त्याठिकाणी सुयोग्य अशा वृक्ष प्रजातींची लागवड करण्यासाठी नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना प्रवृत्त केले पाहिजे. त्यातून "हरित शहर आणि हरित महाराष्ट्र" ही संकल्पना प्रत्यक्षात येण्यासाठी व ३३ टक्के वनक्षेत्र निर्मितीचे उद्दिष्ट साध्य करण्यास हातभार लागू शकेल.

**६) <u>ज्या शेतकरी कुटुंबामध्ये मुलगी जन्माला येईल अश्या शेतकरी दांम्पत्याने मुलीच्या नावे शासनाच्या मदतीने १० वृक्षांची लागवड करणे. :-</u>**

राज्यातील वनक्षेत्र वाढविण्याबरोबरच मुलींचे घटते प्रमाण रोखण्यासाठी ही योजना अत्यंत प्रभावी ठरणार आहे. त्यादृष्टीने या योजनेतंर्गत खालील बाबींचा समावेश असावा :-

१) ज्या शेतकरी दांपत्यास मुलगी होईल, त्या कुटुंबाला सामाजिक वनीकरण विभागामार्फत १० रोपे विनामुल्य / सवलतीच्या दरात दिली जातील. त्यामध्ये साग-५, आंबा-३, फणस-१ व जांभूळ-१ अशा किंवा अन्य उपयुक्त १० झाडांच्या प्रजातींचा समावेश राहील.
२) मुलगी १८ वर्षाची झाल्यानंतर सागापासून मिळणारे सर्वसाधारणपणे रु. १ लक्ष उत्पन्न मुलीच्या उच्च शिक्षणासाठी, विवाहाच्या वेळी आणि वैवाहिक जीवनासाठी अर्थसहाय्य म्हणून दिले जाईल.
३) झाडांची निगा, रक्षण,संगोपन आणि झाडे जिवंत राहण्याचे प्रमाण उच्च रहावे, याकरिता शेतकऱ्यांना तांत्रिक सल्ला दिला जाईल.

## ७) वर्तमानपत्रातील/इलेक्ट्रॉनिक मिडियामधील चुकीच्या बातम्यांचे खंडण करणे तसेच वन व वन्यप्राणी सृष्टी यांच्याबद्दल वर्तमानपत्रातून लोक जागरण करणे:-

राज्य व जिल्हास्तरावर प्रसिद्ध होणाऱ्या महत्वाच्या वर्तमानपत्रातील वन विभागासंदर्भात प्रसिध्द होणाऱ्या चूकीच्या व टिकात्मक बातम्यांची कात्रणे वन विभागाच्या जाहिरात आणि प्रसिध्दी विभागाने तात्काळ संबंधित क्षेत्रीय अधिकाऱ्यांना पाठवावित. त्याबाबतचा वस्तुस्थितीदर्शक अहवाल/खुलासा २४ तासाच्या आत सादर करण्याबाबत त्यांना कळवावे. त्यानंतर सक्षम प्राधिकाऱ्याच्या मान्यतेने संबधित वृत्तपत्र/इलेक्ट्रॉनिक मिडिया यांच्याकडे तात्काळ खुलासा करावा. कोणत्याही परिस्थितीत वन विभागाच्या कामाबद्दल जनतेच्या मनामध्ये संभ्रम किंवा संशय राहणार नाही याची सातत्याने काळजी घ्यावी. त्याचबरोबर चुकीच्या माहितीच्या आधारावर किंवा कोणाचे हितसंबंध जपण्यासाठी दिल्या जाणाऱ्या बातम्यांद्वारे विभागाची प्रतिमा मलीन होणार नाही याची दक्षता घ्यावी.

वन, वन्यप्राणी, जैवविविधता, पर्यावरण आणि वृक्षाच्छादन या संदर्भात, प्रिन्ट आणि इलेक्ट्रॉनिक मिडिया, बस/रेल्वे इत्यादी सार्वजनिक वाहतुकीची साधने आणि सार्वजनिक जागा याठिकाणी आकर्षक आणि लोकांना तात्काळ भावतील अशा जाहिरातीद्वारे लोकांच्यात जागृती करण्यासाठी सतत प्रयत्न व्हावा. तसेच चित्रफिती (Video Films), लहान स्वरुपातील चित्रपट, लेख , भित्तीपत्रे, छोटया पुस्तिका याव्दारे मोठया प्रमाणात जनजागृती घडवून आणणे गरजेचे आहे.

वन, वन्यप्राणी, जैवविविधता, पर्यावरण आणि वृक्षाच्छादन वाढविण्याच्या दृष्टीने या क्षेत्रातील संशोधन, शिक्षण आणि प्रशिक्षण या माध्यमातून केलेले काम देखील जाहिरातीव्दारे लोकांसमोर येणे अपेक्षित आहे. तरच स्थानिक हवामान आणि मातीचा स्तर याच्याशी समरूप अशा वृक्षांच्या आणि प्राण्याच्या नविन प्रजाती लोकांना माहिती होतील. त्यातून जैवविविधतेच्या विकासाला अधिक चालना मिळू शकेल.

निसर्गाने मुक्तहस्ते उधळण केलेल्या वन आणि वनसृष्टीच्या सुंदरतेबाबत आणि वन्यप्राण्यांबाबत लोकांमध्ये आपुलकी आणि प्रेम निर्माण झाल्यास मानव-वन्यप्राणी यांच्या संघर्षाची धार कमी होण्यास मदत होऊ शकेल. वन आणि वन्यप्राणी यांचे अस्तित्व माणसाच्या जगण्यात वैविध्य येण्यासाठी आवश्यक असल्याबाबत लोकांच्या मनामध्ये बिंबविणे गरजेचे आहे. जीवसृष्टीचे चक्र त्यातूनच अबाधित राहणार आहे याची जाणीव करुन देणे महत्वाचे आहे.

## ८) वनदर्शिका -२०१६ या कॅलेंडरच्या २ लाख प्रती सर्व शाळा, ग्रामपंचायती व वन कर्मचारी यांना वाटप करणे. तसेच वन आणि पर्यावरणासंदर्भात शाळा, महाविद्यालये, विद्यापीठे यांनी घेतलेले कार्यक्रम वेबसाईटवर टाकणे. तसेच त्यातील कार्यक्रमांची निवड करुन बक्षीस देणेबाबत.

वन आणि पर्यावरणाबाबत जागतिक स्तरावर लोकशिक्षण, प्रबोधन आणि जनजागृती होण्यासाठी विविध दिन साजरे केले जातात. यासंदर्भातील माहिती राज्यातील सर्व लोकांना होण्याच्या व्यापक उद्देशाने मा.मंत्री (वित्त, नियोजन व वने ), याच्या संकल्पनेतून आणि पुढाकाराने पर्यावरण दिनविशेष ही

पुस्तिका काढण्यात आली आहे. त्यामध्ये वर्षभरात वन आणि पर्यावरण विषयक साजरे होणारे दिवस यांचे महत्व आणि या दिवशी सामूहिक आणि वैयक्तिक पातळीवर कोणते कार्यक्रम/उपक्रम हाती घेतले जाऊ शकतात, याबाबत अतिशयक उद्‌बोधक आणि रंजक अशी माहिती देण्यात आली आहे.

त्याचबरोबर वन आणि पर्यावरण दिनविशेषांसंदर्भात विस्तृत प्रसिध्दी होण्यासाठी कालनिर्णयासारखी वनदर्शिका-२०१६ ही वार्षीक दिनदर्शिका (कॅलेंडर) मा. मंत्री (वने) यांच्या संकल्पनेतून काढण्यात आली आहे. या वनदर्शिकेच्या मागील बाजूस वर नमूद वन आणि पर्यावरण दिनाबाबतची अतिशय विस्तृत माहिती छापण्यात आली आहे. तसेच वनऔषधी वनस्पतींचे महत्व आणि उपयोग याबाबत देखील माहिती दिली आहे. त्याचबरोबर पर्यावरणरक्षणासाठी पर्यावरणस्नेही वस्तुंचा वापर, वीज, पाणी यांची बचत यासंदर्भात घरच्या घरी करावयाच्या बाबींसंदर्भात अतिशय मौलिक माहिती देण्यात आली आहे. त्याशिवाय महाराष्ट्र शासनाचे वनासंदर्भातील निर्णय हे “वनहित -जनहित” या शिर्षकाखाली अतिशय सोप्या व प्रवाही भाषेत दिले आहेत. त्याशिवाय “अरण्यसूक्त” या शिर्षकाखाली वनाचे महत्व व निर्मिती यासंदर्भातील पौराणिक काळापासूनची ऐतिहासिक माहिती आकर्षकपणे मांडली असून ती वाचणाऱ्यांची उत्सुकता वाढविणारी आहे.

सदर कॅलेंडर सर्व शाळा,महाविद्यालये, विद्यापीठे आणि ग्रामपंचायती यांना पाठवावे. तसेच सर्व शासकीय कार्यालयांमध्ये आणि प्रमुख अधिकाऱ्यांच्या दालनात हे कॅलेंडर ठेवण्याबाबत त्यांना विनंती करण्यात यावी.

तसेच वर नमूद वन व पर्यावरण संदर्भातील विशेषदिनी कोणते कार्यक्रम आणि उपक्रम घेता येवू शकतील याची उदाहरणादाखल यादी “वनदर्शिकेत” आणि “पर्यावरण दिनविशेष” या पुस्तिकेत देण्यात आली आहे. त्यामध्ये प्रसंगानुरूप आणखी काही कार्यक्रम किंवा नवीन उपक्रमांची सुरूवात अशा दिवशी करता येऊ शकेल. या संदर्भात हाती घेतलेले कार्यक्रम /उपक्रम याची माहिती संबंधितांनी वन, पर्यावरण, शालेय शिक्षण, उच्च व तंत्र शिक्षण, कृषी व पदुम आणि वैद्यकिय शिक्षण इत्यादी विभागांच्या संकेतस्थळावर अपलोड करावी. तसेच महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळावर देखील ही माहिती देण्यात यावी. जेणेकरून विविध उपक्रमांबाबत जनतेस विस्तृत माहिती आणि प्रसिध्दी मिळेल.

संकेस्थळावर उपलब्ध झालेल्या माहितीवरून, पर्यावरण दिनविशेष/वनदर्शिकेत नमूद केलेले कार्यक्रम/उपक्रमांपैकी ज्या शाळा, महाविद्यालये, विद्यापीठे आणि ग्रामपंचायती वर्षभरात त्या-त्या विशेषदिनी सर्व कार्यक्रम घेतील त्यांना प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात यावे.

त्याचप्रमाणे वेबसाईटवरील अशा उपलब्ध माहितीमधून उत्तम कार्यक्रमांची निवड करण्यात यावी. त्यानंतर संबधितांना रोख रक्कम देऊन गौरविण्यात यावे. रोख रकमेऐवजी संबंधित शाळा आणि ग्रामपंचायती यांना बगिच्यासाठी किंवा प्रशासकीय इमारत बांधून देण्याचा खर्च शासनामार्फत देण्याचा पर्याय देखील ठेवता येऊ शकेल.

९) **उत्तमराव पाटील वन उद्यान याबाबत टाईप प्लान तयार करणे, वृक्षसूची तयार करणे आणि ५ वर्षात सर्व जिल्ह्यात राबविणे. तसेच योजनेत सर्वदूर एकसारखेपणा आणणे :-**

वन व वनेतर जमिनीवरील जैवविविधतेचे व निसर्गाचे संरक्षण करणे याबरोबरच तेथील क्षेत्राचे सौंदर्यीकरण करून विकास करणे हे या योजनेत अभिप्रेत आहे. यामध्ये विविध विकासाची कामे करताना पाणी पुरवठा, विद्युत, संरक्षण इ. पायाभूत सुविधा निर्माण करावयाच्या आहेत. ज्या गावाकडे गावालगत किमान ५ ते ६ हेक्टर सलग क्षेत्र उपलब्ध असेल अशा गावांमध्ये ही योजना राबविणे प्रस्तावित आहे. या योजनेमध्ये विविध प्रकारची वृक्ष लागवड करणे, यामध्ये विविध ऋतूमध्ये विविध रंगाची फुले असणाऱ्या वृक्ष प्रजाती व फुलझाडांची लागवड करणे, सावली देणाऱ्या प्रजातींची लागवड करणे, मुलांसाठी उद्यानामध्ये खेळणी बसविणे, कारंजे निर्माण करणे, ज्येष्ठ नागरिकांना फिरण्यासाठी पायवाट (जॉगींग पार्क) तयार करणे, जनजागृती करणे आणि पर्यावरणाचा समतोल राखण्यास मदत होईल अशी कामे प्रस्तावित आहेत.

ह्या योजनेची अंमलबजावणी २०१५-१६ पासून सुरु झाली असून प्रत्येक जिल्ह्यात किमान दोन ठिकाणी वन-उद्यान निर्मिती करण्याची प्रक्रिया अंमलबजावणीखाली आहे. सदर योजना पुढील चार वर्षात सर्व जिल्ह्यांमध्ये आणि तालुक्यांमध्ये लागू करण्यासाठीचा महत्वाकांक्षी कार्यक्रम हाती घ्यावयाचा आहे. त्याकरिता जागेच्या उपलब्धतेबाबत आतापासूनच माहिती आणि आवश्यक डेटाबेस तयार करणे अपेक्षित आहे. त्याचबरोबर उद्यान निर्मिती करताना वेगवेगळ्या संकल्पना व प्रमाण न ठेवता ह्या संदर्भातील करावयाच्या कामांचे प्रमाणिकरण (Standardization) करणे आवश्यक आहे. त्यानुसार उत्तम अशा वास्तु विशारद आणि लॅड स्केपिंग तज्ञ यांच्यामार्फत टाईप प्लान तयार करुन घेण्यात यावे. त्यामुळे वन उद्यान निर्मितीमध्ये एकसारखेपणा राहील व राज्यात उत्तम वन उद्यान निर्मिती हा भविष्यकालीन ठेवा म्हणून कायमस्वरुपी जतन करता येईल.

१०) **ताडोबा, गोरेवाडा, संजय गांधी राष्ट्रीय उद्यान यांना आंतरराष्ट्रीय स्तरावरील पर्यटन क्षेत्र करण्याबाबत नियोजन करण्याबाबत:-**

ताडोबा- अंधारी व्याघ्र प्रकल्प व संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाचे अनन्य साधारण महत्त्व विचारात घेऊन सन २०१५-१६ मध्ये या दोन प्रकल्पात आंतरराष्ट्रीय दर्जाच्या पर्यटन सुविधा निर्माण करण्याचे प्रस्तावित आहे. त्यासाठी आंतरराष्ट्रीय दर्जाच्या उत्तम सल्लागाराची स्पर्धात्मक निविदेद्वारे नेमणूक करणे नियोजित आहे.

त्याचप्रमाणे नागपूर शहर व परिसरात पर्यटनाला चालना देऊन रोजगाराच्या संधी वाढवणे, दुर्मिळ आणि विलुप्त होत असलेल्या प्राण्यांचे प्रजनन करून त्यांना त्यांच्या नैसर्गिक अधिवासात पुनर्स्थापित करण्याच्या दृष्टीने नागपूर येथे गोरेवाडा आंतरराष्ट्रीय दर्जाचे प्राणीसंग्रहालय उभारण्याचे काम प्रगतीपथावर आहे. त्यासाठी आंतरराष्ट्रीय दर्जाच्या उत्तम सल्लागाराची स्पर्धात्मक निविदेद्वारे नेमणूक करणे प्रस्तावित आहे.

वर नमूद दोन्ही कामांना गती देऊन नियोजनबध्द पध्दतीने आणि कालमर्यादा ठरवून या संदर्भात आवश्यक असलेल्या बाबींची अंमबजावणी करण्यासाठी कृती आराखडा तयार करण्यात यावा.

## ११) <u>ताडोबा पर्यटन उत्सव :-</u>

वन आणि पर्यटन विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्प, चंद्रपूर येथे निसर्ग/वन पर्यटन व सांस्कृतिक महोत्सव मार्च २०१६ मधील पहिल्या आठवडयात मुंबई येथे प्रेक्षणीय आणि उत्तम अशा ठिकाणी साजरा करण्याबाबत पर्यटन विभागास विनंती करण्यात आली आहे. तसेच मा. मुख्यमंत्री (पर्यटन) आणि मा. राज्यमंत्री (पर्यटन) यांना देखील या संदर्भात अवगत करण्यात आले आहे. महोत्सव आयोजनाची मुख्य जबाबदारी पर्यटन विभागाची असून त्यासाठी वन विभाग सर्व सहकार्य करेल.

तसेच या उत्सवाची संकल्पना आणि संरचना (Theme & Design) अतिशय कल्पक असावी आणि त्यादृष्टीने या क्षेत्रातील तज्ञ किंवा इव्हेंट मॅनेजमेंट कंपनीशी संपर्क साधावा. या महोत्सवामध्ये जंगल, निसर्ग, वन, वन्यप्राणी, जैवविविधता, पर्यावरण आणि सामाजिक वनीकरण या क्षेत्रांचा कृत्रिमरित्या आभास निर्माण करणाऱ्या थिम्संचा सामावेश असावा. त्यातून या क्षेत्रांचे संरक्षण आणि संवर्धन करण्यासाठी व्यापक जनजागृती होण्यास नक्कीच मदत होऊ शकते.

हा महोत्सव कमीत कमी एक आठवडा चालेल अशारितीने कार्यक्रमांचा आराखडा तयार करण्यात यावा. प्रत्येक दिवशी विविध क्षेत्रातील नामवंत आणि ख्यातनाम व्यक्तींना (Celebrities) कार्यक्रमासाठी निमंत्रित करण्यात यावे. त्यांची उपस्थिती आणि सहभाग यामुळे या कार्यक्रमांची शोभा व रंगत तर वाढेलच पण त्याबरोबरच वर नमूद क्षेत्रांचे महत्व ,संरक्षण आणि संवर्धन यास व्यापक प्रसिध्दी मिळेल. त्यातून जनजागृजी होण्यास मदत होईल.

अशा नामाकिंत व्यक्तींमध्ये वन आणि वन्यप्राण्यांविषयी, प्रेम, जिव्हाळा आणि आस्था बाळगणाऱ्यांपैकी एखाद्या देशाच्या राष्ट्राध्यक्षांना निमंत्रित करण्यात यावे. त्यानुसार मॉरिशसचे राष्ट्राध्यक्ष यांना निमंत्रित करता येईल. त्याशिवाय अमिताभ बच्चन, सचिन तेंडूलकर, लता मंगेशकर आणि अन्य नामांकित आणि ख्यातनाम व्यक्तींना देखील नियोजित कार्यक्रमाच्या संभाव्य (Tentative) तारखा देऊन या कार्यक्रमास उपस्थित राहण्याविषयी आतापासूनच पत्र पाठविण्यास सुरूवात करावी. त्यामुळे या महोत्सवाच्या वेळी उपस्थित राहता यावे यादृष्टीने त्यांना आपल्या व्यग्र कार्यक्रमातून नियोजन करता येईल.

त्याचबरोबर या महोत्सवास मा. पंतप्रधान श्री नरेंद्र मोदी यांना देखील निमंत्रित करण्यासाठी संभाव्य तारखा देवून पत्र पाठविण्यात यावे. त्याचबरोबर केंद्रीय मंत्री श्री. नितीन गडकरी, श्री. प्रकाश जावडेकर, श्री. महेश शर्मा संबंधित आमदार/खासदार यांना देखील निमंत्रित करण्यात यावे. जेणेकरून या सर्व अतिमहत्वाच्या व्यक्तिंना त्यांच्या सोयीनुसार कार्यक्रमास उपस्थित रहाण्याविषयी नियोजन करता येईल.

सदर महोत्सवात खालील बाबींचा देखील समावेश असावा. :-

१) सदर महोत्सवापूर्वी व्याघ्र प्रकल्पांतर्गत बफर आणि कोअर क्षेत्रातील गावांमध्ये व्याघ्र संवर्धनाविषयी जनजागृती करण्यासाठी विविध स्पर्धांचे आयोजन करावे. त्यातून प्रत्येक व्याघ्र प्रकल्पातंर्गत एका विजेत्याची निवड करून महोत्सवात सत्कार करावा.

२) राज्यातील व्याघ्र प्रकल्पातंर्गत हस्तकलेद्वारे तयार केलेल्या वस्तुंचे प्रदर्शन/विक्रीकरिता आणि वनामध्ये उपलब्ध वस्तुंचे स्टॉल्स लावण्यात यावे.

३) महोत्सवात प्रत्येक व्याघ्र प्रकल्पामधील सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करावे. त्यात त्या भागातील पंरपरा, संस्कृती, नृत्य, गायन आणि इतर वैशिष्ट्यपूर्ण कार्यक्रमाचा समावेश असावा. खाद्यपदार्थ आणि जंगली मेव्याचे स्टॉल्स लावावेत.

**१२) एमजीनरेगाच्या (MGNREGS) माध्यमातून सर्व राज्य महामार्ग (SH) आणि प्रमुख जिल्हा मार्ग (MDR) याच्या आजूबाजूला झाडे लावण्याचा महत्वाकांक्षी कार्यक्रम तयार करणे:-**

वन विभागांतर्गत विविध कामे उदा. वन आणि वनेत्तर जमिनीवर वृक्षारोपन, संरक्षण व संगोपन व रोपवाटिकांची निर्मिती व सामाजिक वनीकरणांतर्गत, रस्त्यांच्या दुतर्फा वृक्ष लागवड, खाजगी आणि सामुहिक जमिनीवर वृक्षारोपन इत्यादी कामे हाती घेतली जातात.

तथापि, या सर्व कामांसाठी राज्य शासनाच्या योजनांतर्गत, योजनेत्तर आणि जिल्हा विकास योजनांमधून निधी उपलब्ध होण्यास मर्यादा आहेत. या उलट रोजगार हमी योजनेंतर्गत गरीब आणि दुर्बल घटकांना विशेषत: दारिद्रयरेषेखालील व्यक्तींना दैनंदिन उपजिविकेचे साधन म्हणून रोजगाराच्या संधी उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी आणि बांधिलकी शासनाने स्विकारली आहे. त्यामुळे महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजनेमधून निधी उपलब्ध होण्यासाठी फारशा अडचणी नाहीत.

ज्या प्रदेशात मानवी वसाहतीसाठी अनुकुलता आहे, तेथील शेती, उद्योगधंदे, कुटीर उद्योग आणि युध्दसामुग्रीची वाहतूक यासाठी दळणवळणाचे अनेक पर्याय आहेत. त्यापैकी रस्ता हा प्रमुख पर्याय आहे. महाराष्ट्र राज्याचा विचार करता महाराष्ट्र राज्य आर्थिक पहाणी अहवालानुसार राज्य महामार्ग जवळपास ३४,१०२ कि.मी. व प्रमुख जिल्हा मार्ग अंदाजे ४९,९०१ कि.मी. इतक्या लांबीचे आहेत.

दळणवळणाच्या दृष्टीने एकदा बांधलेले रस्ते सुस्थितीत ठेवणे अत्यंत गरजेचे असते. तसेच दळणवळणाचा लाभ घेणा-या व्यक्ती,जनावरे आणि वाहने यांना रस्त्याचा परिसर आल्हाददायक व सावलीमय असणे गरजेचे आहे. यासाठी रस्त्याच्या कडेला विविध प्रकारच्या वृक्ष प्रजातींची रोपे लावणे आणि त्यांची जोपासना करणे अनिवार्य आहे. विशेषत: फळफळाव आणि सावली देणारे मोठे वृक्ष उदा. वड, पिंपळ, नीम, आंबा, चिंच, कवठ, बोर, जांभूळ, फणस, काजू, आवळा, बेहडा इत्यादी प्रकारची झाडे लावणे गरजेचे आहे. त्यातून जैवविविधता आणि नैसर्गिक अन्न साखळी टिकून राहण्यास मदत होईल. त्याचबरोबर हरितीकरण कार्यक्रमास चालना मिळेल.

उपरोक्त बाबी विचारात घेता वन आणि सामाजिक वनीकरणामार्फत राष्ट्रीय महामार्ग आणि प्रमुख जिल्हा मार्ग यांच्या दुतर्फा वृक्षलागवडीचा कार्यक्रम मोठया प्रमाणात हाती घेण्यास वाव आहे. त्यानुसार एमजीनरेगा मार्फत वृक्षरोपणाची कामे हाती घेण्याबाबत नियोजनबध्द आणि कालबध्द कार्यक्रम तयार करण्यात यावा. त्यानुसार या कार्यक्रमांची अतिशय धडाडीने व मिशनमोड पध्दतीने अंमलबजावणी व्हावी. रोपांचे संरक्षण, संगोपन आणि निगा राखण्यासाठी योग्य त्या उपाय योजना व्हाव्यात. त्यातुन वृक्ष जगण्याचे प्रमाण किमान ८० ते ९० टक्के राहील याबाबत कटाक्ष ठेवावा. त्याशिवाय लोकसहभागातून वृक्षांचे संगोपन आणि निगा राखण्यसाठी त्यांना प्रवृत्त करावे. फळफळावळ जातीच्या वृक्षापासून मिळणारे उत्पन्न व वृक्षांची देखभाल असा एकत्रित कार्यक्रम राबविल्यास वृक्ष जगण्याची यशस्वितता मोठी असेल.

त्याचबरोबर राज्यातील पाठबंधारे विभागातंर्गत कालव्यांच्या दुतर्फा आणि रेल्वे लाईनच्या दोन्ही बाजूने देखील मोठया प्रमाणात वृक्ष लागवडीस संधी आहे. त्याचा देखील उपयोग करुन घेण्याबाबत नियोजन करावे.

त्यासाठी सार्वजनिक बांधकाम, जलसंपदा आणि रेल्वे विभाग यांचेकडून वृक्षरोपनासाठी ना-हरकत मिळण्यासाठी त्या विभांगाशी संपर्क साधून कार्यपध्दती वेगवान व सुलभ होण्याच्या दृष्टीने उपाययोजना कराव्यात.

### १३) वन-धन योजनेतर्गत पुढील ३ वर्षात किमान ३०० कोटींचा व्यवसायवृध्दी कार्यक्रम राबविणे त्यासाठी जिल्हानिहाय टाईप प्लॅन तयार करणे. त्याबरोबरच वस्तु निर्मितीची योजना तयार करणे:-

वन विभागांतर्गत वन धन योजनेतंर्गत संयुक्त वन व्यवस्थापन समित्यांनी वन उत्पादनापासून तयार केलेल्या कलाकुसरीच्या हस्तकला वस्तु, औषधी वनस्पती आणि गौण वन उत्पादने (उदा. मध, लाख, डिंक मोहापासून तयार केलेले तेल,सरबत, जाम इत्यादी) यांची विक्री करण्यासाठी वन विभागाने सहाय्यभूत भुमिका बजावणे गरजेचे आहे. तरच संयुक्त वन व्यवस्थापन समित्या सक्षम होतील. त्यातून वन, वन्यप्राणी,जैवविविधता आणि पर्यावरण यांचे संरक्षण , संवर्धन विकास आणि व्यवस्थापन करण्यात अशा समित्या महत्वपुर्ण काम करू शकतील. तसेच अशा कामातून वनक्षेत्र व वृक्षाच्छादन वाढविणे आणि संवर्धित करणे शक्य होईल.

वन विभागांतर्गत वन धन योजनेची व्याप्ती आणि उलाढाल किमान वार्षीक रुपये ३०० कोटी पर्यंत नेण्यासाठी वन औषधी व वन उत्पादनाचे (उदा. मोहा जाम आणि सरबत ) मार्केटिंग मोठया प्रमाणात वाढविण्यासाठी योजना आखण्यात यावी व त्यादृष्टीने विभागाने चिकाटीने आणि सातत्यपूर्वक प्रयत्न करावेत. त्यासाठी के.पी एम.जी कंपनीशी टाय-अप (Tie-up) करता येणे शक्य आहे. त्याचबरोबर या क्षेत्रातील तज्ञ डॉ. जामकर यांच्याशी झालेल्या बैठकीत जे मुद्दे समोर आले, त्यानुसार कार्यवाही व्हावी. तसेच आयुर्वेदिक औषधांचे पॅकेजिंग उत्तम होण्यासाठी इंडियन इनस्टिट्युट ऑफ पॅकेजिंग या संस्थेबरोबर संपर्क साधावा.

नागपूर येथील झिरो माईल येथील विक्री केंदाच्या धर्तीवर मंत्रालयात असे केंद्र (Counter) तात्काळ सुरू करण्याबाबत कार्यवाही व्हावी. त्यासाठी आवश्यक असलेल्या परवानग्या तातडीने मिळवाव्यात. तसेच मंत्रालयात हर्बल शुगर फ्रि टी सेंटर सुरू करण्याबाबत देखील कार्यवाही व्हावी.

**१४) सेल्फी काढणेसाठी मंत्रालयात वाघ ठेवणे. तसेच घोषवाक्य तयार करणे :-**

जुलै हा जागतिक व्याघ्र दिन म्हणून साजरा केला जातो. वाघांचे संरक्षण आणि संवर्धन करण्यासाठी लोकांमध्ये जागृती निर्माण व्हावी म्हणून या दिवसाचे औचित्य साधून अलिकडेच ४ ऑगस्ट २०१५ रोजी मंत्रालयात वन विभागामार्फत भव्य कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाच्या वेळी वाघांची दुर्मिळ छायाचित्रे आणि प्रतिकृतींचे प्रदर्शन भरविण्यात आले होते. या कार्यक्रमास आणि प्रदर्शनास लोकांचा उत्तम प्रतिसाद मिळाला. विशेषत: वाघाच्या प्रतिकृतीबरोबर स्वत:ची आणि ग्रुपबरोबर अनेकांनी सेल्फी काढली. अशी सेल्फी आयुष्यभर जतन करता येते. त्यातून वन आणि वन्यप्राणी यांचे संरक्षण आणि संवर्धनाबाबत प्रत्यक्ष अप्रत्यक्षरित्या लोकजागृती होते.

मंत्रालयामध्ये जवळपास ७ हजारपेक्षा जास्त कर्मचारी काम करतात. दररोज हजारो लोक आप आपल्या कामांसाठी मंत्रालयात येतात. वन आणि वन्यजीवप्रेमींना आणि इतरांना देखील वाघासारख्या तंतोतंत दिसणाऱ्या सुंदर आणि राजबिंडया प्राण्याबरोबर फोटो घेण्याची उपजत आकर्षण असते. सबब मंत्रालयामध्ये उत्तम आणि आकर्षक अशा वाघाची प्रतिकृती कायमस्वरुपी ठेवण्यात यावी. तसेच व्याघ्र संरक्षण आणि संवर्धन या बाबीशी अनुरुप अतिशय उदबोधक आणि आकर्षक असे घोषवाक्य लिहावेत. याकरिता आवश्यक जागा सार्वजनिक बांधकाम विभागाशी संपर्क साधून निश्चित करावी.

**१५) राज्यामध्ये ९९ कोटी वृक्ष लागवड करण्याच्या दिशेने किमान २ वर्ष संपूर्ण तयारी करणे :-**

मा. मंत्रीमंडळाच्या निर्णयाप्रमाणे पुढील ३ वर्षामध्ये किमान ९९ कोटी वृक्ष लागवड करण्यासाठी मा. मंत्री (वने) यांच्या समवेत दि. २०.१०.२०१५ रोजी बैठक झाली. ह्या बैठकीत खालील महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आले :-

१) सध्या अस्तित्वात असलेल्या शतकोटी वृक्ष लागवड कार्यक्रमाचे नाव बदलून ९९ कोटी वृक्ष लागवड असे करणे.

२) सध्या अस्तित्वात असलेल्या शतकोटी वृक्ष लागवड कार्यक्रमामधील त्रुटी आणि उणिवा लक्षात घेऊन प्रस्तावित कार्यक्रम योग्य दिशेने राबविण्यासाठी व १००% यशस्विता मिळण्यासाठी हा कार्यक्रम संपूर्ण तयारीनिशी हाती घेणे.

३) सदर कार्यक्रम केवळ शासनाचा कार्यक्रम आहे असे सर्वसामान्याना न वाटता, तो लोकांच्या उत्स्फुर्त प्रतिसादातून आणि खरोखर लोकांच्या मनापासून राबविला जाणारा कार्यक्रम आहे, अशी भावना लोकांमध्ये निर्माण करावी. त्यासाठी लोकसहभाग, लोकशिक्षण आणि लोकप्रबोधन

अत्यंत महत्त्वाचे आहे. यादृष्टीने जाहिराती, कार्यशाळा, व्याख्याने, लघुपट, माहितीपत्रके, भित्तीपत्रके इ. विविध माध्यामांद्वारे या कार्यक्रमाची मोठ्या प्रमाणात प्रसिध्दी करण्यात यावी.

४) प्रस्तावित कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी मुख्य निधीचा स्त्रोत राज्य शासन राहील. त्याबरोबरच केंद्र शासन, औद्योगिक संस्था, CSR याद्वारे देखील जास्तीत जास्त निधी उपलब्ध करुन घेण्याबाबत प्रयत्न व्हावेत. त्याचबरोबर वृक्ष लागवडीसंदर्भातील वेगवेगळे कार्यक्रम/योजनांची सांगड (Convergence) घालून त्याद्वारे उपलब्ध होणाऱ्या निधीतून हा कार्यक्रम घेतल्यास त्याची यशस्विता आणि परिणामकारकता या संदर्भातील तुलनात्मक अभ्यास तातडीने व्हावा.

५) सदर कार्यक्रम विद्यार्थी, जनता व लोकप्रतिनिधी यांच्या सहभागाद्वारे राबविणे आवश्यक आहे. त्यामध्ये शासकीय आणि खाजगी शाळांमधील हरित सेनेमधील विद्यार्थी, महाविद्यालये/विद्यापीठे यामधील विद्यार्थी, शिक्षक व प्राध्यापक, स्थानिक स्वराज्य संस्थांमधील लोकप्रतिनिधी, आमदार, खासदार, पालक मंत्री व इतर मंत्री या सर्वांचे सहकार्य मिळवावे. त्याशिवाय सेवाभावी संस्था, अशासकीय संस्था, खाजगी संस्था यांची देखील मदत घ्यावी. त्यासाठी त्यांच्याशी संपर्क यंत्रणा प्रस्तापित होण्याच्या दृष्टीने नियोजन व्हावे.

६) सदर वृक्ष लागवड कार्यक्रम राबविण्यासाठी त्या-त्या वर्षाचा कृती आराखडा तयार करावा. शासनाद्वारे वृक्ष लागवड करण्याबरोबरच उदाहरणादाखल वटपौर्णिमा, गणेशोत्सव मंडळे, कुटुंबांमध्ये मुलांचे वाढदिवस साजरे करणे, विवाह समारंभानिमित्त नवविवाहितांनी झाडे लावणे इत्यादी प्रयत्नांद्वारे देखील वृक्ष लागवडीस गती देता येईल.

७) वृक्ष लागवड करण्यापूर्वी मोठ्या संख्येने ठराविक आकाराचे खड्डे घ्यावे लागतात. त्यात बराच वेळ खर्ची पडतो. आधुनिक तंत्रज्ञानाचा व छोट्या यंत्रांचा वापर करुन अशा स्वरुपाचे खड्डे मोठ्या प्रमाणात एकाचवेळी घेता येऊ शकतील. या दृष्टीने शक्यता आजमावण्यात यावी.

८) राज्यातील रस्ते, कालवे, रेल्वे यांच्या दुतर्फा वृक्ष लागवड करण्यासाठी किती वाव आहे, याचा अंदाज घ्यावा. त्याचबरोबर जलसंपदा विभागाची धरणे व सार्वजनिक बांधकाम व इतर विभागाची विश्रामगृहे आणि अन्य मोकळ्या जागांवर वृक्षरोपणासाठी किती क्षेत्र उपलब्ध होऊ शकेल, याचाही अंदाज बांधावा. या सर्व मुबलक जागांचा जास्तीत जास्त झाडे लावण्यासाठी उपयोग करण्याच्या दृष्टीने नियोजन व्हावे.

९) सदर कार्यक्रम अभियान सदृष्य (Mission Mode) धर्तीवर राबविण्यासाठी समर्पित वृत्तीने काम करणाऱ्या अधिकाऱ्यांचा गट तालुका ते राज्यस्तरावर तयार करण्यात यावा. त्यासाठी वृक्ष लागवडीचा मुख्य आणि उप आराखडा (Plan and Subplan) तयार करण्यात यावा. सदर कार्यक्रम जलद गतीने आणि दर्जेदाररित्या, गुणवत्तापुर्वक राबविण्यासाठी या क्षेत्रातील चांगल्या खाजगी यंत्रणांची देखील मदत घेण्याबाबत विचार व्हावा.

१०) त्याचबरोबर हा कार्यक्रम यशस्वीपणे राबविण्यासाठी ग्राम, तालुका, जिल्हा, विभाग आणि राज्यस्तरावर संगणक सनियंत्रण प्रणाली (Computer Monitoring System) विकसित करण्यात यावी.

११) महात्मा गांधी ग्रामीण रोजगार हमी योजनेद्वारे (Mahatma Gandhi Rural Employment Guarantee Scheme) वृक्ष लागवड व रोपवाटीकांची निर्मिती हा कार्यक्रम राबविण्याबाबत मोठ्या प्रमाणात वाव आहे. लोकसहभागातून वृक्षलागवड करण्याचे काम अधिक गतीने आणि गुणवत्तापूर्ण होईल. तसेच झाडांचे जगण्याचे प्रमाण किमान ८० ते ९० % राहील.,

१२) वन विभागाच्या पुढाकाराने आणि संकल्पनेतून नगरपालिका आणि महानगरपालिका क्षेत्रात हरित शहर योजना राबविण्याबाबत नगर विकास विभागाच्या क्र.संकीर्ण-२०१५/प्र.क्र.२२१/नवि-२०, दि. ३१.०७.२०१५ रोजीच्या शासन निर्णयान्वये सविस्तर सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत. तेथे वृक्ष लागवडीचा कार्यक्रम मोठ्या प्रमाणात हाती घेण्याबाबत वन तसेच सामाजिक वनीकरण विभागाने पुढाकार घेऊन आवश्यक ते तांत्रिक व प्रशासकीय सल्ला संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांना द्यावा.

१३) ज्याप्रमाणे फलोत्पादन योजना म.ग्रा.रो.ह.यो. आणि महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेशी निगडीत करण्यात आली आहे, त्याच धर्तीवर वृक्षलागवड योजना देखील रोजगार हमी योजनेशी निगडीत करण्याबाबत शक्यता तपासून त्याप्रमाणे कार्यवाही करणे.

१४) वृक्षलागवडीचा कार्यक्रम येत्या ३ वर्षात अत्यंत यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी उंच, दर्जेदार आणि गुणवत्तापुर्ण रोपे तयार करण्यासाठी मोठ्या संख्येने रोपवाटिकांची निर्मितीचा कार्यक्रम आतापासूनच सुरु करावा. किमान २ वर्षे वयाची रोपे लावण्यात यावीत. लहान रोपे लावू नयेत.

१५) वृक्ष लागवडीचा कार्यक्रम उद्योगपती, खाजगी संस्था यांच्या सहभागातून राबविण्यासाठी व त्यांना देखील या कार्यक्रमात सामावून घेण्यासाठी त्रिसदस्यीय करार करावयाच्या दृष्टीने त्या संदर्भातील कायदेशीर मसूदा तातडीने तयार करण्याबाबत कार्यवाही व्हावी.

वरील निर्णयांची अंमलबजावणीसाठी विभागाने जी तयारी सुरु केली आहे, ती अधिक जलदगतीने व्हावी.

**१६) वन अतिथी ही संकल्पना विकसित करणे. सन्माननीय व्यक्तींना वाहनव्यवस्था, उत्तम निवास आणि <u>भोजन, गाईड व भेटवस्तू यांची व्यवस्था करणे :-</u>**

राज्याला उत्तम असे वनवैभव आणि निसर्गसंपदा लाभलेली आहे. त्यामध्ये राष्ट्रीय उद्याने, अभयारण्ये, व्याघ्र प्रकल्प, थंड हवेची ठिकाणे, धार्मिक स्थळे, इत्यादींचा सामावेश आहे. नेहमीच्या धकाधकीच्या जीवनातून काही काळ विरंगुळा मिळावा आणि निसर्ग सौंदर्याचा निर्भेळ आनंद लुटता यावा म्हणून अशा ठिकाणी वन, वन्यजीव, पर्यावरण आणि निसर्ग प्रेमी भेट देत असतात. विशेषत: नामांकित व ख्यातनाम व्यक्ती (Celebrities), जनतेच्या मनामध्ये सर्वोच्च स्थान प्राप्त केलेले कलावंत व अभिनेते, नावाजलेले साहित्यिक, नामांकित उद्योगपती, शास्त्रज्ञ, इतिहासतज्ञ, अर्थशास्त्रज्ञ, विचारवंत, विविध वृत्तपत्रांचे आणि वृत्त वाहिन्यांचे संपादक इत्यादींनी अशा ठिकाणी भेटी दिल्यास या स्थळांची जनमाणसांत प्रत्यक्ष व अप्रत्यक्षरित्या व्यापक प्रचार आणि प्रसिध्दी होते.

मान्यवर लोकांच्या अशा ठिकाणांच्या भेटींमुळे या जागा पर्यटन स्थळे म्हणून अधिक नावारूपाला येवू शकतात. त्यातून वन्य, वन्यजीव, निसर्ग आणि एकंदरीतच जैवविविधतेबद्दल लोकांच्या मनामध्ये अधिक आस्था, प्रेम आणि जिव्हाळा निर्माण होण्यास मदत होते. पर्यावरण आणि परिस्थितीकीय (Eco System) समतोल आणि संतुलन यासंदर्भात देखील जागृती होते. निसर्गाने मुक्तहस्ताने उधळण केलेल्या अशा नाविण्यपूर्ण ठिकाणांकडे सर्वसामान्य लोक देखील मोठ्या संख्येने आकर्षित होऊ शकतात. अशा ठिकाणी भेटी देणाऱ्या पर्यटकांना येणारा अनुभव त्यांच्यासाठी पर्वणी असते. त्यातून राज्याचे महसुली उत्पन्न वाढण्यास मदत होऊ शकते. त्याच बरोबर तरूणांना आणि स्थानिक लोकांना रोजगाराच्या विविध संधी उपलब्ध होतील. राज्याच्या विकासाला व प्रगतीला त्यातून हातभार लागेल.

वरील बाबींचा विचार करुन “वन अतिथी” ही संकल्पना विकसित करण्याचा विचार समोर आला आहे. अशाप्रसंगी खालील बाबींवर कार्यवाही अपेक्षित आहे :-

१) सन्माननीय व्यक्तींना प्रवासासाठी उत्तम वाहन, निवास व भोजनाची व्यवस्था करणे.
२) त्यासाठी राज्यातील वन विभागांतर्गत महत्त्वाच्या ठिकाणी असलेल्या विश्रामगृहांचे आधुनिक पध्दतीने आणि पर्यावरणस्नेही नूतनीकरण करणे.
३) विश्रामगृहात उत्तम आणि प्रशिक्षित कुक (खानसामा) ठेवणे.
४) सन्माननीय व्यक्तींचे स्वागत, निर्गमन व अन्य व्यवस्था यासाठी किमान वनक्षेत्रपाल दर्जाच्या अधिकाऱ्याची नेमणूक करणे. अशा अधिकाऱ्यांना राजशिष्टाचार आणि आदरातिथ्य (Protocol and Hospitality) संदर्भातील प्रशिक्षण दिलेले असावे.
५) वनघटकांशी संबंधित आकर्षक भेटवस्तू सन्माननीय व्यक्तींना देण्यात याव्यात, जेणेकरुन अशा व्यक्तींना ही भेट संस्मरणीय आणि चिरंतर स्मृतीत राहील.
६) महत्त्वाच्या स्थळांची माहिती देण्यासाठी त्यांच्या समवेत मार्गदर्शकाची (Guide) व्यवस्था असावी.

यासंदर्भातील प्रस्तावावर शासनाचा निर्णय लवकर व्हावा.

### १७) <u>रिक्त पदांची भरती:-</u>

कार्यक्षम मनुष्यबळाची उपलब्धता विभागाच्या कामकाजाच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाची बाब आहे. वन विभागांतर्गत तांत्रिक संवर्गातील वनरक्षक, वनपाल, वनक्षेत्रपाल, सहायक वनसंरक्षक आणि विभागीय वन अधिकारी ही पदे महत्त्वाची आहेत. त्यांना सहाय्यभूत असणारी लिपीक, लेखापाल आणि अन्य संवर्गातील पदे आहेत. रिक्त होणारी पदे नियोजनबध्द कार्यक्रमाद्वारे वेळीच भरणे गरजेचे आहे. सरळसेवा पध्दतीने पदे भरताना पुढील वर्षी रिक्त होणाऱ्या पदांचा आधीच अंदाज घेऊन त्यादृष्टीने बिंदूनामावली निश्चित करुन जाहिरात देण्यापासून उमेदवारांच्या निवडीपर्यंतची प्रक्रिया कालमर्यादेत होणे आवश्यक आहे. हेच तत्त्व जाहिरात वगळता पदोन्नतीने रिक्त पदे भरण्यासाठी लागू होईल. तथापि, यासंदर्भात वेळीच कार्यवाही न झाल्याने अनेक पदे रिक्त राहतात. त्याचा प्रशासकीय कामकाजावर प्रतिकूल परिणाम होतो.

तांत्रिक आणि अतांत्रिक मनुष्यबळ वेळीच उपलब्ध होण्यासाठी यापुढे रिक्त पदे भरण्याचा कालबध्द कार्यक्रम आगाऊरित्या आखण्यात यावा आणि त्यानुसार कार्यवाही करण्यात यावी.

**१८) <u>निवासस्थानांचे नूतनीकरण कार्यक्रम:-</u>**

वनरक्षक, वनपाल, वनमजूर आणि वनक्षेत्रपाल हे आघाडीवर काम करणारे अधिकारी कर्मचारी आहेत. त्यांच्याकरिता शासकीय निवासस्थाने उपलब्ध करुन दिली जातात. बहुतांशी निवासस्थाने अतिदूर्गम, दूर्गम, नक्षलग्रस्त आणि डोंगरी भागात आहेत. तेथील निवासस्थांनाची देखभाल आणि दुरूस्ती निट आणि नियमित होत नाही असा अनुभव आहे. त्यामुळे सदर निवासस्थाने राहण्यासाठी योग्य त्या दर्जाची राहत नाहीत. परिणामत: क्षेत्रीय स्तरावर मुख्यत: काम करणारे कर्मचारी आपल्या कुटूंबियांसह तिथे राहण्यास नाखूष असतात. त्यामुळे वन आणि वन्यजीव यांच्या संरक्षण आणि संवर्धनाच्या कामात शिथिलता येते. त्यासाठी वन विभागाची निवासस्थाने अत्यंत चांगली आणि राहण्यायोग्य असणे गरजेचे आहे.

त्यानूसार वन घनता जास्त असलेल्या अतिदूर्गम/दूर्गम, नक्षलग्रस्त आणि आदिवासीबहूल जिल्हे/तालुके उदा. गडचिरोली, चंद्रपूर, गोंदिया, चिखलदरा इत्यादी ठिकाणांची प्रथम टप्प्यात निवड करण्यात यावी. तेथील निवासस्थानांची दुरूस्ती/विशेष दुरूस्तीची कामे हाती घेण्यात यावी. अशाप्रकारे टप्प्या टप्प्याने सर्व निवासस्थांनाचा दर्जा उत्तम होईल अशारितीने बृहत् आराखडा (Master plan) तयार करण्यात यावा. त्यानुसार कामे पूर्ण करण्यात यावीत. त्यासाठी दरवर्षी आवश्यक असलेला निधी वेळीच अर्थसंकल्पात उपलब्ध करून घेण्यासाठी दक्षता घेणे.

**१९) विश्रामगृहांचे नूतनीकरण :-**

राज्यामध्ये व्याघ्र प्रकल्प, थंड हवेची ठिकाणी, पर्यटन आणि धार्मिकस्थळे मोठया प्रमाणात आहेत. अशा ठिकाणी राज्यातील, देशातील आणि आंतरराष्ट्रीय पर्यटक मोठया संख्येने भेटी देत असतात. अशा बऱ्याच ठिकाणी वन विभागाची विश्रामगृहे आहेत. परंतु त्यांची डागडुजी आणि दैनंदिन देखभाल योग्यरितीने होत नसल्याचा अनुभव आहे. अशा विश्रामगृहांची पर्यावरणस्नेही घटकांचा वापर आणि विचार करुन उत्तमरितीने आधुनिकीकरण व श्रेणीवाढ करणे आवश्यक आहे. त्यामुळे याठिकाणी येणारे पर्यटक वन विभागाच्या विश्रामगृहामध्ये राहण्यास प्राधान्य देतील. महाबळेश्वर, खंडाळा, पेंच, नाशिक येथे किंवा इतर ठिकाणी असलेल्या त्रि आणि पंचतारांकित हॉटेल समवेत टायअप (Tie-up) करता येईल. त्यामुळे तेथे येणारे वन व पर्यावरणप्रेमी पर्यटक वन विभागाच्या विश्रामगृहात राहण्यास उत्सुक राहतील. त्यातून पर्यटन विकासाबरोबरच वन खात्याला महसूल मिळेल आणि रोजगाराच्या संधी देखील उपलब्ध होतील.

त्याअनुषंगाने राज्यातील वन विभागांतर्गत विश्रामगृहांचे आधुनिकीकरण व श्रेणीवाढ करण्याबाबतचा बृहत आराखडा (Master plan) तयार करण्यात यावा. तसेच यासाठी खाजगी क्षेत्रातील

उत्तम, विशेषत: पर्यावरणस्नेही वास्तुरचनाकार (Architect) व सल्लागार यांची निवड करण्यात यावी. यांच्या मदतीने अंदाजपत्रके व नकाशे व डिपीआर बनवावेत. त्यानंतर टप्याटप्याने या कामांची अंमलबजावणी व्हावी. अर्थसंकल्पात आवश्यक निधीची वेळीच तरतूद करण्यासंदर्भात काळजी घ्यावी. यासंदर्भात आर्किटेक्चर म्हणून सार्वजनिक बांधकाम विभागामधील तज्ञ वास्तुविशारदाची सेवा घेता येईल. वन विभागांतर्गत विश्रामगृहे, प्रशासकीय इमारती व निवासस्थाने इत्यादी पर्यावरणपूरक पध्दतीने व ग्रीन बिल्डींग संकल्पना विचारात घेऊन तयार करण्याबाबत आराखडा बनविण्यासंदर्भात विचारविनिमय करुन पुढील कार्यवाही व्हावी.

२०) <u>मुख्य वनसरंक्षक कार्यालयात पुस्तकांची डिजिटल लायब्ररी :-</u>

माहिती आणि तंत्रज्ञानाचा वापर करुन वन, वन्यजीव, पर्यावरण, जैवविविधता, जल, अन्न आणि पर्यावरण सुरक्षितता या क्षेत्रातील राज्य, देश आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरील उत्तम पुस्तकांची डिजिटल लायब्ररी तयार करणे अतिशय उपयुक्त ठरेल. तसेच वन विभागांतर्गत वेगवेगळे कायदे, नियम व अधिनियम यांचे देखील डिजिटायजेशन करण्यात यावे. अशी डिजिटल लायब्ररी मुख्य वनसंरक्षक यांच्या कार्यालयात अशी लायब्ररी तयार झाल्यास अतिरिक्त जागेचा प्रश्न राहणार नाही. वन विभागांतर्गत अधिकारी/कर्मचारी, अभ्यागत यांना संदर्भासाठी अशा लायब्ररीचा चांगला उपयोग होऊ शकतो. धोरणविषयक बाबी ठरविण्यामध्ये आणि नवीन संकल्पना विभागामध्ये रुजविण्यासाठी अशा पुस्तकरुपी संग्रहाचा फायदा होईल. त्यादृष्टीने अशी लायब्ररी मुख्य वनसंरक्षक कार्यालयांमध्ये तयार करण्याबाबत कार्यवाही सुरु करण्यात यावी.

२१) <u>व्याघ्र प्रकल्प A+ करण्याची योजना:-</u>

भारत सरकारच्या राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरणाने (NTCA) मॅनेजमेंट इफेक्टिव्हनेस इव्हॅल्युएशन ऑफ टायगर रिझर्व्ह इन इंडिया बाबत केलेल्या अभ्यासात राज्यातील मेळघाट, पेंच आणि ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पाला “व्हेरी गुड” तर सह्याद्री व्याघ्र प्रकल्पाला “गुड” असा दर्जा मिळाला आहे.

महाराष्ट्रात सन २०१० मध्ये वाघांची संख्या अंदाजे १६९ होती. राज्य शासनाने सातत्याने केलेल्या प्रयत्नामुळे आज ही संख्या जवळ १९० झाली आहे. म्हणजे जवळपास १२.५% वाढ आहे.

चांगल्या प्रतीची कामे झाल्याबद्दल देशातील चार व्याघ्र राखीवांना पुरस्कार देण्यात आले. यापैकी राज्यातील मेळघाट व्याघ्र प्रकल्प संरक्षण, संवर्धन राखीव क्षेत्रातील गावांच्या पुनर्वसनाबाबत झालेल्या उत्कृष्ट कामासाठी एनटीसीए कडून महाराष्ट्राला पारितोषिक मिळाले.

तथापि, या संदर्भात वर नमूद घटकांबाबत आणखी उत्कृष्ट काम अपेक्षित आहे. राज्यातील सर्व व्याघ्र प्रकल्प A+ या दर्जाचे होण्यासाठी सातत्यपूर्ण आणि निरंतन काम होणे आवश्यक आहे. त्यादृष्टीने विभागाकडून काम व्हावे.

## २२) बल्लारपूर येथे बोटॅनिकल गार्डन:-

विदर्भ प्रदेश विशेषत: चंद्रपूर जिल्हा वन, वन्यजीव आणि जैव विविधतेने अत्यंत समृध्द व वनसंपदेने नटलेला आहे. अनेक वनस्पती व पशुपक्षी याच्या अनुवंशिकता वाहकाचे जतन, संरक्षण व संवर्धन करणे आवश्यक आहे. याची माहिती देश-विदेशातील पर्यटकांना होणे अत्यंत गरजेचे आहे. तसेच अशी समृध्द आणि दुर्मिळ जैवविविधता नष्ट होणार नाही याची काळजी घेणे आवश्यक आहे. चंद्रपूर जिल्ह्यात सर्वात जास्त वाघ आहेत. ही बाब राज्याच्यादृष्टीने भुषणास्पद आहे. चंद्रपूर जिल्ह्यामध्येच ताडोबा-अंधारी सारखे नावाजलेले व्याघ्र राखीव क्षेत्र आहे. त्याजवळपास इतरही व्याघ्र प्रकल्पांचा कॉरीडोअर विकसित होत आहे. भविष्यातील पिढ्यांना जैवविविधतेची माहिती होण्यासाठी आणि त्यांचे जतन होण्यासाठी चंद्रपूर जिल्ह्यातील चंद्रपूर- बल्लारपूर मार्गावर विसापूर येथे जवळपास १०० हेक्टर जागेवर बोटॅनिकल गार्डनची निर्मिती करण्यात येणार आहे.

चंद्रपूर जिल्ह्यातील व्याघ्र प्रकल्पास भेट देणाऱ्या देशी-विदेशी पर्यटक प्रस्तावित बोटॅनिकल गार्डनला देखील भेट देतील याची खात्री आहे. त्यादृष्टीने बंगलोरच्या धर्तीवर या जैवविविधता उद्यानाचा विकास प्रस्तावित आहे. त्यादृष्टीने प्रकल्पाचा सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) तयार करण्यासाठी आंतरराष्ट्रीय स्तरावरील सल्लागाराची नेमणूक करण्याबाबत RFP वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात आली आहे. सदर सल्लागार प्रकल्पाच्या अंमलबजावणीमध्ये मार्गदर्शन आणि मदत करेल.

त्याचप्रमाणे प्रस्तावित उद्यानाच्या पहिल्या टप्प्यात संरक्षक भिंत बांधण्याच्या प्रस्तावास प्रशासकीय मान्यता देवून निधी उपलब्ध करुन दिला आहे. सदर काम अधिक वेगाने आणि पुढील दोन वर्षात पूर्ण करण्याच्यादृष्टीने आवश्यक ते नियोजन व्हावे व त्यानुसार निधीची उपलब्धता होण्यासाठी देखील काळजी घ्यावी. प्रकल्प कुठल्याही परिस्थितीत पूर्णत्वाकडे जाण्यास विलंब होणार नाही याची दक्षता घ्यावी.

## २३) वनक्षेत्रातील गावांमध्ये जलयुक्त शिवार योजना:-

राज्यातील भुगर्भातील पाण्याचे पुर्नभरण होवून दुष्काळी आणि टंचाई परिस्थितीवर कायमस्वरुपी मात करण्यासाठी एकात्मिक पध्दतीने नियोजनबध्दरित्या कृती आराखडा तयार करुन पाण्याची उपलब्धता वाढविण्यासाठी शासनामार्फत “जलयुक्त शिवार अभियान” मोठया प्रमाणावर राबविले जात आहे. त्याचा परिणाम उत्तम रितीने दृष्टिपथात आला आहे.

त्याचप्रमाणे लोकसहभागातून वनांचे रक्षण आणि संवर्धन या संकल्पनेतून वनक्षेत्र असलेल्या गावांमध्ये संयुक्त वन व्यवस्थापन समित्यांची स्थापना करण्यात आली आहे.

त्याचबरोबर ज्या गावांलगत राखीव वनक्षेत्र आहे अशी गावे शासन, महसूल व वन विभाग अधिसूचना दि. १३.५.२०१४ आणि शासन निर्णय, महसूल व वन विभाग दि. २०.५.२०१४ अन्वये ग्रामवने म्हणून घोषित करण्यात आली आहेत. त्या ठिकाणी वनक्षेत्रावरील शासनाचे हक्क ग्रामवन म्हणून संबंधित

ग्रामपंचायतीस प्रदान केले आहेत. त्यानुसार ग्रामवनाचे व्यवस्थापन, वनक्षेत्राचे संरक्षण, सवंर्धन, विकास आणि व्यवस्थापन यासंदर्भात सुक्ष्म आराखडा तयार करणे, समितीच्या खर्चाचे लेखापरिक्षण व नियंत्रण इत्यादी बाबी ग्रामवन समितीस देण्यात आल्या आहेत.

ग्रामवन व संयुक्त वनव्यवस्थापन समित्या कार्यरत असलेल्या गावांमध्ये जल व मृद संधारणाची कामे पाणलोट क्षेत्रात हाती घेतल्यास त्या भागातील गावांमध्ये भूगर्भातील पाणी पातळी वाढण्यास मदत होईल. त्यातून या परिसरातील शेतकऱ्यांना शेती उत्पादनातून उपजिविकेच्या व रोजगाराच्या चांगल्या संधी उपलब्ध होतील. त्यामुळे गावातील नागरिकांचे वनावरील अवलंबित्व कमी होईल. त्याचप्रमाणे पाण्याच्या शोधार्थ मानवी वस्तीमध्ये येणाऱ्या वन्यजीवांना त्यांच्या अधिवासाच्या ठिकाणी (Wild Life Habitation) पाण्याची उपलब्धता झाल्यास मानव-वन्यप्राणी संघर्षाची तीव्रता कमी होण्यास हातभार लागेल. या सर्व बांबीमधून वन, वन्यजीव व जैवविविधता यांचे संरक्षण आणि संवर्धन होण्यास मदत होईल. त्याचबरोबर वनक्षेत्र आणि वृक्षाच्छादन वाढण्यास आणि टिकविण्यास देखील याचा महत्वपूर्ण उपयोग होईल. त्याचप्रमाणे मानव, वन आणि वन्यजीव यांचे त्रिकोणी सहजीवन अधिक वृध्दिंगत होईल. त्यातून जैवविविधता अधिक बहरल्यास वन/निसर्ग पर्यटनास चालना मिळून रोजगाराच्या संधी त्या भागातील नागरिकांना उपलब्ध होतील.

वरील बाबींचा विचार करता वन क्षेत्रालगतच्या गावांमध्ये जलयुक्त शिवार अभियानांतर्गत समाविष्ट करुन जल व मृदसंधारणाशी संबंधित अनुज्ञेय कामे हाती घेण्याबाबत मान्यता देण्यासंदर्भात प्रस्ताव मान्य करण्याबाबत सचिव ( जलसंधारण ) यांना विनंती करण्यात आली आहे. त्या प्रस्तावाचा पाठपुरावा होवून लवकर अंमलबजावणी होण्यासाठी कार्यवाही करावी.

## २४) <u>स्मृती वन योजना</u> :-

वन व वनेतर जमिनीवरील वृक्ष, वनस्पती, पशु-पक्षी आणि कृमी-किटक इत्यादि जैवविविधतेचे व निसर्गाचे संरक्षण व संवर्धन करणे व तेथील निसर्ग सौंदर्यात भर घालण्याच्या दृष्टीने स्व. उत्तमराव पाटील वन उद्यानाची निर्मिती राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये करण्याचा महत्त्वाकांक्षी कार्यक्रम वन विभागामार्फत राबविला जात आहे. आपल्याला प्रिय असलेल्या व्यक्तींची स्मृती आपण आयुष्यभर जपतो. त्याप्रित्यर्थ त्या व्यक्तींच्या नांवे वृक्षारोपण करुन स्मृतीवन तयार केल्यास त्या व्यक्तीच्या आठवणी आपण वर्षानुवर्षे ठेऊ शकतो.

निरनिराळया वनस्पतींचे समूह तयार करण्यासाठी स्मृती उद्यानात वेगवेगळी उपवने निर्माण करता येतात. जसे फळवृक्ष रोपवाटिका, चंपकवन, कदम्बवन, कटककांतारवन, अशोकवन, आम्रवन, जंबुवन, वंशवन, मदनवृक्षवन, चरकवन, लतावृक्षवन, उपलीयवन,सारिकावन,मृगसंचारवन,अतिथीवन इत्यादी. त्यादृष्टीने वन विभागामार्फत नियोजन आराखडा तयार करुन त्याची अंमलबजावणी विशिष्ट वेळेमध्ये करण्याबाबत कार्यवाही करण्यात यावी.

## २५) व्याघ्र प्रकल्प व अभयारण्यातील गावांच्या पुनर्वसनाचा कालबध्द कार्यक्रम :-

वाघ या सुंदर आणि राजबिंडया प्राण्याचे अस्तित्व धोक्यात आले असल्यामुळे त्यांचे संरक्षण आणि संवर्धनासाठी राज्यामध्ये ६ व्याघ्र प्रकल्पांची निर्मिती करण्यात आली आहे.

१. ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्प, चंद्रपूर
२. नवेगाव- नागझिरा, व्याघ्र प्रकल्प, गोंदिया
३. पेंच व्याघ्र प्रकल्प, पेंच, जिल्हा, नागपूर.
४. मेळघाट व्याघ्र प्रकल्प, जिल्हा, अमरावती.
५. बोर व्याघ्र प्रकल्प, जिल्हा, नागपूर.
६. सह्याद्री व्याघ्र प्रकल्प, जिल्हा, कोल्हापूर.

त्याचबरोबर राज्यामध्ये जवळपास ४७ अभयारण्ये आहेत. राज्यातील वन्यजीवांना त्यांच्या अधिवासात एकांतपणे कोणत्याही त्रासाविना राहण्याची संधी मिळाल्यास जैवविविधतेमध्ये प्रचंड वाढ होण्यास वाव आहे. त्यासाठी वने सुरक्षित राहिली पाहिजेत. वनावरील लोकांचे अवलंबित्व संपूर्ण दूर झाले पाहिजे. त्यासाठी व्याघ्र प्रकल्प आणि अभयारण्य यांच्या कोअर आणि बफर क्षेत्रांतील गावांचे नियोजनपूर्वक पुनर्वसन झाले पाहिजे. त्यादृष्टीने कालबध्द कार्यक्रम हाती घेऊन पुनर्वसनाचे काम पूर्ण करण्यात यावे.

## २६) वन विभागातील, मा. मंत्री, सचिव, प्रधान मुख्य वनसरंक्षक, मुख्य वनसंरक्षक, विभागीय वन अधिकारी यांच्या कार्यालयाचे आयएसओ करणेसाठी कालबध्द कार्यक्रम :-

वन विभागांतर्गत विविध कार्यक्रम, योजना आणि उपक्रम यांची जलदगतीने, पारदर्शकपणे, गुणवत्तापूर्वक अंमलबजावणी अपेक्षित आहे. जनतेमध्ये वन विभागाच्या कामाबद्दल जिव्हाळा आणि आत्मियता निर्माण होणे आवश्यक आहे. त्यातून जनतेच्या हृदयामध्ये वन विभाग आपले स्थान निर्माण करु शकतो. त्यासाठी लोकांना उपलब्ध सोयी-सुविधा देण्यासाठी सातत्यपूर्ण आणि चिकाटीने प्रयत्न व्हावेत. हे होण्याच्या दृष्टीने आय.एस.ओ. प्रमाणिकरण करणाऱ्या बी. एस. आय. या नामांकित संस्थेकडून आपल्या कामांचे परीक्षण करून आय. एस. ओ. ९००१-२००८ संदर्भातील सर्व मानके पूर्ण करुन घेणे गरजेचे आहे. कामकाजाचे आय.एस.ओ. प्रमाणिकरण व सर्टिफिकेशन प्रक्रियेमुळे प्रशासकीय कामकाजाचा वेग वाढणार आहे.

त्यादृष्टीने वन विभागातील, मा. मंत्री, सचिव, प्रधान मुख्य वनसरंक्षक, मुख्य वनसंरक्षक, विभागीय वन अधिकारी यांची कार्यालये आयएसओ प्रमाणित होण्यासाठी कालबध्द कार्यक्रम आखण्यात यावा.

## २७) वन विभागात संगणकीकरण कार्यक्रम :-

वन विभागाच्या संगणकीकरण कार्यक्रमांतर्गत विविध घटकांच्या कार्यवाहीसंदर्भात शासन निर्णय, क्र. एमएससी-२००४/प्र.क्र.२१/फ-२, दि. ५.१०.२०११ अन्वये सविस्तर सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत. संगणकीकरणांतर्गत १३वा वित्त आयोग, माहिती व तंत्रज्ञान विभाग आणि कॅम्पामधून निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे. सन २०१५-१६ मध्ये संगणकीकरण कार्यक्रमांतर्गत मध्यप्रदेश शासनाच्या धर्तीवर प्रधान मुख्य वनसंरक्षक यांच्या कार्यालयात कमांड रुम स्थापित करावयाची आहे. त्याचबरोबर मानव-वन्यप्राणी संघर्ष याची तीव्रता कमी करण्यासाठी प्रायोगिक तत्त्वावर प्रथमत: चंद्रपूर वनवृत्तामध्ये ई-सर्वेलन्स उपक्रम हाती घेणे प्रस्तावित आहे. त्याशिवाय वनरक्षक संवर्गातील कर्मचाऱ्यांना P.D.A. पुरविण्याचा व्यापक कार्यक्रम राबविण्यात येत आहे. त्यामुळे अवैध वृक्षतोड, चराई, वनवणवा आणि अतिक्रमण व वनप्राण्यांची अवैध शिकार यासंदर्भातील वन गुन्ह्यांबाबत Real Time माहिती तात्काळ वरिष्ठ कार्यालयांना पाठविणे शक्य होत आहे. त्यातून वन गुन्ह्यांना प्रतिबंध आणि आवश्यक तात्काळ उपाययोजना हाती घेणे शक्य होत आहे. या कार्यक्रमाची व्याप्ती वाढवून सर्व वनरक्षकांना P.D.A. द्यावयाचे आहेत.

संगणकीकरणांतर्गत विविध घटकांची पुर्तता होऊन वन व वन्यजीव संरक्षणामध्ये अतिशय जलदगतीने आणि कार्यक्षमतेने काम होणे अपेक्षित आहे. त्यादृष्टीने संगणकीकरणाचा कार्यक्रम ठराविक मुदतीत पूर्ण होण्यासाठी कसोशीने प्रयत्न होणे आवश्यक आहे.

## २८) वन्य प्राण्यांपासून पिकांचे संरक्षण करण्यासाठी संशोधन करणे :-

वन आणि वनेतर क्षेत्राजवळील शेतांमधील पिकांचे वन्यप्राण्यांपासून होणारे नुकसान ही शेतकऱ्यांच्या दृष्टीने मोठी समस्या आहे. काही वेळा उभी पिके वन्यप्राण्यांकडून नष्ट केली जातात. मोठे काबाडकष्ट करुन पिकविलेली शेतीचे एका रात्रीत वन्यप्राण्यांकडून नुकसान केले जाते. नुकसान भरपाई म्हणून पुर्वीच्या रकमेत भरीव वाढ केली असून ही रक्कम पूर्वीपेक्षा जवळपास दुप्पट केली आहे. परंतू, केवळ काही आर्थिक मदत देऊन शेतकऱ्यांचे समाधान करणे अवघड होते. शेतकऱ्यांच्या भावना ह्या बाबतीत अतिशय तीव्र आहेत. त्यामुळे मानव आणि वन्यप्राणी यांच्या संघर्षाच्या घटना वाढत आहेत. त्यातून वन्यप्राण्यांचे जीव धोक्यात आले आहेत. अंतिमत: जैवविविधतेवर मोठे संकट संभवत आहे.

याबाबत तातडीने उपाययोजना करण्यासाठी वन्यप्राणी उभ्या पिकांचे नुकसान करणार नाहीत, यासाठी संशोधन होणे गरजेचे आहे. त्यादृष्टीने संशोधन प्रकल्प हाती घेऊन काही निष्कर्षाप्रत येण्यासाठी विभागाने तातडीने कार्यवाही करावी.

## २९) कायद्यात सुलभता व आवश्यकतेनुसार नवीन कायदे करणे.

वन आणि वन्यप्राणी यांचे प्रभावीपणे संरक्षण, संवर्धन आणि अतिक्रमणापासून प्रतिबंध करणे व संघटीत गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी अस्तित्वातील वनविषयक कायद्यांमध्ये सुधारणा करणे ही

काळाची गरज आहे. वन गुन्ह्यांचा तात्काळ आणि जलदगतीने तपास होऊन सक्षम न्यायालयाकडून गुन्हेगारांना जबर शिक्षा होण्यासाठी कायद्यामध्ये आवश्यक त्या उपाययोजना करणे आवश्यक आहे. त्यादृष्टीने काही सुधारणा झाल्या आहेत. यापुढे सुधारणा करण्यास आणखी वाव आहे. सबब, अस्तित्वातील कायद्यांचा अभ्यास करुन जिथे सुधारणा आवश्यक आहे किंवा नवीन कायदे बनविणे गरजेचे आहे त्यानुरुप तात्काळ प्रस्ताव हाती घेण्यात यावेत.

## ३०) <u>वनऔषधी संशोधन, लागवड, उत्पादन, प्रशिक्षण व विक्री यांचा अभ्यास करणे.</u>

देशाला आयुर्वेद चिकित्सेद्वारे आजार बरे करण्याची वर्षानुवर्षाची परंपरा आहे. आयुर्वेदामध्ये वनौषधी वनस्पतींच्या निरनिराळ्या भागांचा मोठ्या प्रमाणात वापर होतो. ह्या वनस्पतींचा स्रोत वन हा आहे. त्यासाठी वनौषधी वनस्पतींची शास्त्रोक्त पध्दतीने लागवड करुन व्यापारी उत्पादन करण्यासाठी मोठा वाव आणि व्याप्ती आहे. त्यादृष्टीने संशोधन होणे अत्यंत गरजेचे आहे. त्याचबरोबर अशा वनौषधींची विक्री करण्यासाठी प्रशिक्षित मनुष्यबळ तयार करावे लागेल. या सर्व दृष्टीने अभ्यास आणि संशोधन प्रकल्प हाती घेऊन या उपक्रमाला चालना देण्यात यावी.

## ३१) <u>रानडुक्कर व रोही मारण्याची योजना :-</u>

शेतपिकास धोकादायक ठरलेल्या रानडुक्कर व रोही ह्या वन्यप्राण्यांचा बंदोबस्त करण्याची यापूर्वीची कार्यपध्दती व्यवहार्य ठरत नसल्याने त्यांची पारध करण्याची पद्धती सुलभ करण्याच्या दृष्टीने दि. २२.७.२०१५ रोजीच्या शासन परिपत्रकान्वये निर्णय घेतला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळणार आहे. तथापि, या वन्यप्राण्यांची पारध करताना त्याचा दुरुपयोग केला जाणार नाही, याबाबत अत्यंत काळजी घेणे गरजेचे आहे. अन्यथा, हे प्राणीच नष्ट होतील. जैवविविधतेस त्याचा मोठा धोका संभवेल. त्यासाठी शस्त्र परवानाधारकांमार्फत त्रासदायक प्राण्यांचा बंदोबस्त करणे, त्यानंतर मृत प्राण्याच्या शरीराची योग्यरितीने विल्हेवाट लावणे आणि परवानाधारक शिकाऱ्यांची उपलब्धता इ. संदर्भात आणखी सखोल अभ्यास होणे गरजेचे आहे. जेणेकरुन, पिकांच्या नुकसानीचा आधार घेऊन वन्यप्राण्यांची शिकार करण्याच्या प्रवृत्तीस आळा बसेल.

## ३२) <u>आरएफओ परिषदेचे आयोजन करणे :-</u>

वन विभागांतर्गत आघाडी स्तरावर काम करणारा घटक म्हणून वनक्षेत्रपाल या संवर्गातील अधिकाऱ्यांकडे पाहिले जाते. किंबहुना, वन विभागाच्या कामगिरीतील तो महत्त्वाचा कणा आहे. वन विभागांतर्गत विकासात्मक कामांची आखणी करुन अंमलबजावणी करण्याची जबाबदारी देखील वनक्षेत्रपालावर आहे. त्याचबरोबर काही ठराविक प्रकरणात वन गुन्ह्यांची तपासणी करुन आरोपींना अटक करणे आणि त्यांना जबर शिक्षा होण्याच्या दृष्टीने सक्षम न्यायालयासमोर प्रकरण प्रभावीपणे मांडण्याच्या दृष्टीने प्रकरण तयार करण्याची जबाबदारी वनक्षेत्रपालांकडे आहे.

वनक्षेत्रपाल संवर्गातील अधिकाऱ्यांची काही ठराविक अंतराने उच्चस्तरावर परिषदा आयोजित करणे उपयुक्त ठरेल. अशा परिषदांमधून त्यांना भेडसावत असलेल्या समस्या आणि त्यावर उपाययोजना याबाबत चर्चा आणि विचारविनिमय होऊ शकेल. येणाऱ्या समस्या सोडविण्यासाठी धोरणात्मक बदल आवश्यक असल्यास ते करता येतील. त्यातून प्रशासकीय कामकाज अधिक गतीमान करता येईल. त्याचबरोबर वरिष्ठ अधिकारी आणि आघाडी स्तरावर काम करणारे कर्मचारी यांच्यामध्ये अधिक सुसंवाद निर्माण करता येईल. त्यांना कामासाठी अधिक प्रेरणादायी आणि प्रोत्साहित करता येईल. सदर बाब प्रागतिक प्रशासनाच्या दृष्टीने योग्य राहील. यादृष्टीने आर.एफ.ओ. परिषदेचे लवकरात लवकर आयोजन करण्यात यावे. त्यासाठी स्थळनिश्चिती आणि चर्चेसाठी घ्यावयाच्या विषयांची मांडणी करावी.

### ३३) <u>विभागाचे 'Ease of doing Business' बाबत नियोजन.</u>

राज्यामध्ये उद्योग उभारणीमध्ये सध्या असलेली क्लिष्ट पध्दत आणि विविध परवाने यात बदल करुन प्रक्रिया सोपी व सुलभ करण्यासाठी "Ease of doing Business" हे धोरण राबविण्यात येत आहे. त्यातून रोजगार निर्मितीला आणि प्रगतीला चालना मिळावी हा मुख्य उद्देश आहे. वन विभागांमध्ये Ease of doing Business या धोरणांतर्गत सध्या काही विषयांबाबत आपण निर्णय घेतला आहे. परंतू, तेवढ्या बाबी अपुऱ्या आहेत. आणखी कोणकोणत्या बाबींवर उद्योग उभारणी आणि रोजगार निर्मितीसाठी प्रक्रिया सुलभ करता येईल, यासंदर्भातील क्षेत्रांची निवड करुन त्याची अंमलबजावणी करण्याबाबत नियोजन व कृती कार्यक्रम तयार करण्यात यावा.

### ३४) <u>बांबू प्रशिक्षण केंद्र :-</u>

बांबूची शास्त्रोक्त लागवड आणि औद्योगिक वापरासाठी प्रशिक्षण देण्याच्या दृष्टीने चंद्रपूर जिल्ह्यातील चिचपल्ली येथे बांबू संशोधन आणि प्रशिक्षण केंद्र स्थापन करण्यात आले आहे. राज्यात बांबू विल्हेवाटीसाठी सुधारीत बांबू धोरण निश्चित केले आहे.

या प्रकल्पाचे उद्दिष्ट साध्य होण्याकरिता बांबूवर आधारित डायरेक्टर जनरल ऑफ एम्प्लॉएमेंट ॲण्ड ट्रेनिंग या भारत सरकारच्या संस्थेमार्फत मान्यताप्राप्त अभ्यासक्रम सुरु करण्यात येत आहे..

बांबू प्रोसेसिंग, सेकंडरी बांबू प्रोसेसिंग, बांधकामासाठी बांबूचा उपयोग, बांबू हँण्डीक्राफ्ट वस्तुंची निर्मिती, बांबू फर्निचरची निर्मिती यासारख्या प्रशिक्षणाबरोबरच प्रशिक्षणार्थीच्या स्वंयरोजगारासाठी बांबू टर्निंग पॉईंट, फाईन बांबू प्रॉडक्ट हे अभ्यासक्रम देखील येथे सुरु करण्यात येतील.

या प्रशिक्षण केंद्रातंर्गत नवीन इमारती बांधल्या जाणार आहेत. या सर्व इमारतींचे बांधकाम, आकर्षक, उत्तम, दर्जेदार, पर्यावरणस्नेही आणि जास्तीत जास्त बांबुचा आणि तत्सम साहित्याचा व सामुग्रीचा वापर करुन बांधल्या जाव्यात. तसेच ग्रीन बिल्डींग संकल्पना विचारात घेऊन बांधकाम व्हावे. या संदर्भात तयार करण्यात येत असलेला प्रकल्प अहवाल अधिक गतीने तयार होईल, याबाबत लक्ष पुरवावे.

### ३५) वन अकादमी :-

वन अकादमीच्या माध्यमातून वन विभागांतर्गत कर्मचारी/अधिकारी यांना तांत्रिक, सेवांतर्गत प्रशिक्षण, पायाभूत उजळणी, पदोन्नतीनंतरचे प्रशिक्षण याबरोबरच वनविषयक पायाभूत प्रशिक्षण दिले जाणार आहे. त्याशिवाय लोक, स्वंयसेवी/सेवाभावी संस्था आणि इतर प्रशासनिक कर्मचारी/ अधिकाऱ्यांच्या प्रशिक्षणाचा देखील सामावेश आहे.

अकादमीच्या अस्तित्वातील इमारतींचे नूतनीकरण व नवीन प्रशासकीय इमारती बांधल्या जाणार आहेत. त्यासंदर्भातील प्रकल्प अहवाल तयार करण्यात आला आहे. त्यानुसार अकादमीचा अधिक विस्तार केला जाणार असून देश पातळीवर नामांकित व अग्रगण्य संस्था म्हणून पुढे येण्याच्या दृष्टीने अकादमीची नवीन संरचना करावयाची आहे. त्याचबरोबर संस्थेची भविष्यातील विस्तारित क्षमता आणि हाती घ्यावयाचे कार्यक्रम याचा विचार करता उच्चस्तरावरील मनुष्यबळ उपलब्ध करुन देणे अपेक्षित आहे. या प्रकल्पास शासनाकडून सक्षम स्तरावर जलदगतीने मान्यता देण्यासंदर्भात अंमलबजावणी प्रक्रिया गतीमान करण्याबाबत कार्यवाही व्हावी. तसेच आवश्यक निधीची तरतूद वेळीच व्हावी.

### ३६) वन विभागात सर्वस्तरावर प्रशिक्षण कार्यक्रम राबविणे :-

विभागांतर्गत अधिकाऱ्यांची कार्यक्षमता टिकून राहावी आणि संवादातून नवीन विचार व संकल्पना पुढे व्याव्यात म्हणून प्रशिक्षण कार्यक्रमांचे स्थान अतिशय महत्त्वाचे आहे. त्यासाठी तांत्रिक आणि अतांत्रिक संवर्गातील अधिकारी/कर्मचाऱ्यांचे उजळणी प्रशिक्षण, सेवांतर्गत प्रशिक्षण, कार्यशाळा, चर्चासत्रे इत्यादी माध्यमातून प्रशिक्षण कार्यक्रम राबविणे आवश्यक आहे. राज्य प्रशिक्षण धोरणानुसार प्रत्येक अधिकारी/ कर्मचाऱ्यांना त्यांच्या सेवा कालावधीतील किमान ३% कालावधी प्रशिक्षणासाठी व्यतीत करणे बंधनकारक आहे. त्या दृष्टीने वन विभागातील सर्वच स्तरावरील कर्मचारी आणि अधिकाऱ्यांना वेगवेगळ्या प्रशिक्षण संस्थांमध्ये प्रशिक्षण देण्याबाबत दरवर्षीचा कालबध्द कार्यक्रम आखून अंमलबजावणी व्हावी. वन विभागांतर्गत प्रशिक्षण संस्थांची महत्तम उपयोगिता व्हावी, म्हणून देखील दक्षता घेणे आवश्यक आहे. प्रशिक्षणासाठी आवश्यक ते शिक्षक, प्रतिनियुक्तीने, विभागांतर्गत अधिकारी किंवा बाह्य स्त्रोतातून उपलब्ध करण्याच्या दृष्टीने कार्यवाही व्हावी.

### ३७) महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळ (Maharashtra Eco Tourism Development Board) :-

राज्यामध्ये प्रचंड मोठे वनवैभव आणि निसर्गसंपदा आहे. अशा ठिकाणी अनेक महत्त्वाची पर्यटन स्थळे असून काही नव्याने उदयास येत आहेत. अशी पर्यटनस्थळे ही जैविकविविधतेची आश्रयस्थाने आहेत. या पर्यटन स्थळांचा उत्तमरितीने विकास केल्यास देशी-विदेश पर्यटक मोठ्या प्रमाणात आकर्षित होऊ शकतात. त्यातून रोजगार निर्मितीबरोबरच राज्याच्या महसूलामध्ये भर घालण्याचे योगदान होऊ शकते.

वरील बाबींचा विचार करुन राज्यामध्ये पर्यटन विकासाला गती देण्यासाठी निसर्ग पर्यटन विकास मंडळ नागपूर येथे दि. ८.१२.२०१५ रोजीच्या शासन निर्णयानुसार स्थापन करण्यात आलेले आहे. निसर्ग पर्यटन धोरणाप्रमाणे निसर्ग संवर्धन, शिक्षण, पर्यटन याबरोबरच स्थानिक लोकांच्या उपजिविकेच्या संधी वाढविणे आणि इतर सर्व शासकीय यंत्रणांसमवेत वन आणि वनेतर क्षेत्रातील कामांची प्रभावीपणे अंमलबजावणी करणे हे या मंडळाकडून अपेक्षित आहे.

या मंडळाची कार्ये आणि जबाबदाऱ्या विहित केल्याप्रमाणे पार पाडण्यासाठी कालबध्द पध्दतीने कार्यवाही करण्यात यावी.

### ३८) डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी जन-वन योजनेचे नियोजन :-

जी वन्यजीव अभयारण्ये अधिसूचित केली आहेत त्यांच्या क्षेत्राच्या बाहेर लोक सहभागातून वन व वृक्षाच्छादन वाढविणे, वृक्ष संपत्तीचे व्यवस्थापन करणे तसेच राज्याच्या ग्रामविकास विभाग, आदिवासी विकास विभाग व जलसंधारण विभागांच्या योजना एकात्मिक पद्धतीने राबविणे यासाठी डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी जन वन योजनेची अंमलबजावणी दि. ४.८.२०१५ रोजीच्या शासन निर्णयान्वये सुरु झाली आहे.

गावातील “जन-जल-जमीन-जंगल” या नैसर्गिक संपत्तीचा शाश्वत विकास करुन उत्पादकता वाढविणे, गावाची जंगलावरील अंवलबित्वता कमी करणे, शेतीला पूरक जोडधंद्यांची निर्मिती करणे, पर्यायी रोजगार उपलब्ध करुन देणे इ.मार्फत मानव-वन्यप्राणी संघर्ष कमी करणे ही या योजनेची उद्दिष्ट्ये आहेत. योजनेची अंमलबजावणी संयुक्त वन व्यवस्थापन समिती किंवा ग्राम परिस्थितीकी विकास समित्यांमार्फत होणार आहे. यासंदर्भात सविस्तर मार्गदर्शक सूचना निश्चित करण्यात आल्या आहेत. त्याप्रमाणे योजनेची यशस्वीरित्या अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने नियोजनपूर्वक कामगिरी पार पाडण्यात यावी.

### ३९) बोडक्या टेकड्या हिरव्या करण्यासाठी कालबध्द कार्यक्रम राबविणे :-

महाराष्ट्र राज्यात वृक्ष तोडीमुळे व वनस्पतीचे ऱ्हासामुळे बरेचश्या टेकड्या उघडया आणि मोकळया झालेल्या आहेत. उघडया झालेल्या टेकड्यावर सातत्याने पडलेल्या पावसामुळे मातीचे थर वाहून गेलेले आहेत. नैसर्गिकरित्या त्यांचे पुनरुज्जीवन होत नाही. त्यामुळे झाडे लावून त्यांचे पुनरुज्जीवन करणे अंत्यत गरजेचे आहे. या कारणामुळे हरित टेकडी अभियान या आशयाची संकल्पना अस्तित्वात आली. या अंतर्गत अभियान स्वरुपात विविध स्त्रोताकडून निधीचे एकत्रिकरण करुन उघडया आणि बोडक्या पडलेल्या टेकड्यांचे हरितीकरण करावयाचे आहे. त्याचबरोबर चराईबंदी, कु-हाडबंदी करुन पर्यावरण संरक्षणाची ही शेवटीची संधी ठरणार आहे.

सन २०१५-१६ पासून ही योजना कार्यान्वित करण्यात येत असून सुरुवातीला प्रत्येक महसूल विभागात म्हणजेच प्रति सामाजिक वनीकरण वृत्तात २ प्रकल्प प्रथम वर्षी राबविण्यात येत आहेत.

त्यासाठी प्रस्तावित जागा कमीत कमी २० ते २५ हेक्टर इतकी असावी आणि ही जागा जिल्हा मुख्यालयाच्या जवळ असावी. तसेच मुख्यालयापासून जागेपर्यंत पोहचण्यासाठीचे मार्ग सुस्थितीत असावा, असे निकष ठरविले आहेत.

या योजनेची व्याप्ती आणि वाव खूप मोठा असल्याने सदर योजना प्रत्येक जिल्ह्यामध्ये राबविण्याच्या दृष्टीने नियोजनबध्द आणि कृती आराखडा तयार करुन कार्यवाही करण्यात यावी. झाडे जगण्याचे प्रमाण किमान ८० ते ९० टक्के असावे. त्यासाठी रोप लागवडीनंतर संरक्षण आणि आवश्यकतेनुसार पाण्याची उपलब्धता इत्यादी सोयी कराव्यात. स्थानिक प्रजातीची व जैवविविधतेस चालना देणाऱ्या वृक्ष प्रजाती लावण्यात याव्यात.

४०) <u>तिवर संवर्धन, संरक्षण व रोजगारांसाठी Crab Oyster शिंपले व्यावसायीकरण करणे :-</u>

राज्यामध्ये समुद्र किनारे आणि काही नद्यांच्या जवळपास कांदळवन (Mangrove) क्षेत्र आहे. हे क्षेत्र समुद्र जीवांचे (Marine Life) आश्रयस्थान असून जैवविविधतेचे मोठे भांडार येथे उपलब्ध होत असते. त्याचबरोबर नैसर्गिक आपत्तीच्या काळामध्ये उदाहरणार्थ चक्री वादळ, त्सुनामी इत्यादिच्या प्रसंगी समुद्र किनाऱ्याचे संरक्षण करुन जैवविविधतेचे रक्षणामध्ये कांदळवन क्षेत्र महत्त्वाची भुमिका पार पाडत असते. त्यामुळे या क्षेत्राचे संरक्षण आणि संवर्धन अधिक परिणामकारकरित्या करणे आवश्यक आहे. त्यामुळे किनाऱ्यावरील जनतेच्या जीवनमानात सकारात्मक प्रभाव निर्माण करु शकतो. त्यादृष्टीने "तिवर संवर्धन प्रतिष्ठान" स्थापन करण्याचा निर्णय दि. २४.९.२०१५ रोजीच्या शासन निर्णयान्वये घेतला आहे.

तिवर संवर्धनाबरोबर समुद्र किनाऱ्यावरील लोकांचे जीवनमान उंचावण्यासाठी आणि उत्पन्नाची कायमस्वरुपी साधने निर्माण करण्यासाठी Crab Oyster आणि शिंपले गोळा करुन त्यांची व्यावसायिक पध्दतीने विक्री करण्यासंदर्भातील प्रकल्प तयार करुन त्याची अंमलबजावणी योग्यरितीने होण्यासाठी कृती कार्यक्रम करण्यात यावा.

४१) <u>जैवविविधता व १०१ वृक्षांचे व १४८ पक्षांच्या प्रजातींचे संवर्धन कार्यक्रम :-</u>

महाराष्ट्राच्या वैशिष्ट्यपूर्ण भौगोलिक रचनेमुळे येथील हवामानात आणि पर्यायाने येथे आढळणाऱ्या वन्यजीवांच्या प्रजातींमध्ये विविधता आढळते. या समृद्ध जैवविविधतेच्या संवर्धनासाठी राज्यात राष्ट्रीय उद्याने, अभयारण्ये, संवर्धन राखीव क्षेत्रे आणि व्याघ्र प्रकल्प आहेत. तथापि हे क्षेत्र राज्याच्या एकूण क्षेत्रफळाच्या केवळ ३.२६ टक्के भरते. राष्ट्रीय धोरणानुसार हे क्षेत्र किमान पाच टक्के असणे आवश्यक आहे. त्यामुळे राज्यात अजूनही संरक्षित क्षेत्रे निर्माण करण्याची गरज आहे. राज्यातील ६० टक्के वाघांचे आणि अनेक दुर्मिळ प्राण्यांचे अस्तित्व संरक्षित क्षेत्रात आढळते. यावरून संरक्षित क्षेत्रांचे महत्त्व लक्षात येईल.

पर्यावरण संरक्षण अधिनियमांतर्गत प्रत्येक संरक्षित क्षेत्राभोवती सुमारे १० कि.मी.च्या परिसरात इकोसेन्सिटिव्ह झोन- तयार करावयाचे आहेत. कारण या परिसरातही मोठ्या प्रमाणावर जैवविविधता असून, त्याचे संरक्षण, संवर्धन आवश्यक आहे.

त्याचप्रमाणे राज्यामध्ये वनस्पती आणि वृक्षांच्या अनेक प्रजाती आहेत. त्यातील काही प्रजाती अतिशय जुन्या आणि दुर्मिळ व नष्ट होण्याच्या मार्गावर आहेत. त्यांचे पुढील पिढीसाठी चिरंतन ठेवा हस्तांतरित करणे आवश्यक आहे. अशा एंकदरित १०१ वृक्ष प्रजातींचे वर्गीकरण झाले आहे.

त्याचप्रमाणे आपल्या आजुबाजूला सतत अस्तित्व दाखवून देणाऱ्या, परिसंस्थेचा अविभाज्य भाग असलेल्या पक्ष्यांची माहिती करून घेण्यासाठी पक्षांची गणना केली जाते. देशभरातील विविध ठिकाणी पक्षीनिरीक्षण करून देशातील पक्ष्यांच्या प्रजाती, त्यांची वाढलेली किंवा घटलेली निवासस्थाने, त्यांच्या लकबी, दुर्मिळ पक्षी आदींची माहिती यातून मिळणे शक्य होते. तथापि, पक्ष्यांबाबत भारतात फारच कमी संशोधन झाले असून या पक्षीगणनेच्या माध्यमातून पक्षीप्रेमींना प्रोत्साहन देणे व पक्ष्यांच्या संवर्धनासाठी पावले उचलणे आवश्यक आहे. राज्यामध्ये जवळपास १४८ दुर्मिळ पक्षांची गणना झाली असून त्या पक्षांच्या प्रजाती टिकविणे आणि वाढविणे हे देखील मोठे आव्हान वन विभागापूढे आहे.

उपरोक्त बाबी लक्षात घेऊन राज्यातील जैवविविधता, १०१ वृक्ष प्रजाती आणि १४८ पक्षांच्या प्रजातींचे संवर्धन होण्यासाठी ठोस कार्यक्रम तयार करुन त्याची अंमलबजावणी करण्यात यावी.

**४२) राज्य शासनाच्या जलयुक्त शिवार कार्यक्रमात सहभाग तसेच विविध क्षेत्रात गवत व बांबू लागवड करण्याची योजना तयार करणे:-**

राज्यातील भुगर्भातील पाण्याचे पुर्नभरण होवून दुष्काळी आणि टंचाई परिस्थितीवर कायमस्वरुपी मात करण्यासाठी एकात्मिक पध्दतीने नियोजनबध्दरित्या कृती आराखडा तयार करुन पाण्याची उपलब्धता वाढविण्यासाठी शासनामार्फत “जलयुक्त शिवार अभियान” मोठया प्रमाणावर राबविले जात आहे.

या अभियानांतर्गत पाणलोट क्षेत्रामध्ये माथा ते पायथा (Ridge to Valley) अशी जलसंधारण विषयक कामे केल्यास त्याचा खूप मोठा लाभ होतो असा अनुभव आहे. त्यादृष्टीने वनविभागांतर्गत विविध विकास कामांची अंमलबजावणी होताना जल व मृदसंधारणविषयक कामे हाती घेणे आवश्यक आहेत. त्यामध्ये गवत आणि बांबू लागवड याचा देखील समावेश करण्यात यावा.

**४३) महाराष्ट्र ग्रामीण रोजगार योजनेच्या माध्यमातून विविध कार्यक्रमाची आखणी:-**

राज्यात महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेबरोबरच (MGNREGS) , महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेची (MREGS) अंमलबजावणी सुरू आहे. म.ग्रा.रो.ह.यो राज्यामध्ये सन १९७२

पासून सुरू आहे. विविध शासन निर्णयाव्दारे या योजनेच्या अंमलबजावणीसाठी निकष आणि मार्गदर्शक तत्वे वेळोवेळी ठरविण्यात आली आहेत.

वन विभागांतर्गत विविध कामे उदा. वन आणि वनेत्तर जमिनीवर वृक्षारोपन, संरक्षण व संगोपन, निसर्ग/वन पर्यटन, वन हद्दीचे सर्वेक्षण व सिमांकन, जल व मृद संधारण, सामाजिक वनीकरणांतर्गत खाजगी आणि सामुहिक जमिनीवर वृक्ष लागवड इत्यादी कामे हाती घेतली जातात. तथापि या सर्व कामांसाठी राज्य शासनाच्या योजनांतर्गत, योजनत्तेर आणि जिल्हा विकास योजनांमधून निधी उपलब्ध होण्यास मर्यादा आहेत. या उलट रोजगार हमी योजनेंतर्गत गरीब आणि दुर्बल घटकांना विशेषत: दारिद्रयरेषेखालील व्यक्तींना दैनंदिन उपजिविकेचे साधन म्हणून रोजगाराच्या संधी उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी आणि बांधिलकी शासनाने स्विकारली आहे. त्यामुळे महाराष्ट्र रोजगार हमी योजनेमधून निधी उपलब्ध होण्यासाठी फारशा अडचणी नाहीत.

वरील बाबींचा विचार करुन महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेतून जास्तीत जास्त कामे हाती घेण्याबाबत आखणी करण्यात यावी आणि अंमलबजावणी व्हावी. यासंदर्भात एमआरईजीएस या योजनेच्या सध्याच्या निकषांमध्ये बदल करणे आवश्यक असल्यास या क्षेत्रातील तज्ञ अधिका-यांच्या (सेवानिवृत्त अधिकाऱ्यांसह) सल्ल्यानुसार कार्यवाही करण्यात यावी.

## ४४) <u>वन विभागाच्या मंजूर निधीचे वाटप व वितरण याबाबत नियोजन :-</u>

वन विभागांतर्गत अनेक विकास योजना, प्रकल्प आणि कार्यक्रम यांची अंमलबजावणी सुरु आहे. तथापि, निधीचे वितरण वेळेवर होण्यासाठी आवश्यक ते प्रस्ताव क्षेत्रिय कार्यालयांकडून वेळेवर प्राप्त होत नाहीत, असा अनुभव आहे. प्रस्ताव उशिरा प्राप्त झाल्यामुळे कामे विहित मुदतीत पूर्ण करता येत नाहीत. तसेच घाईगडबडीत शेवटच्या क्षणी कामे केल्यास काही त्रुटी राहण्याचा संभव असतो. हे टाळण्यासाठी विकासविषयक कामांचे प्रस्ताव तयार करताना शासनाने ठरविलेले मार्गदर्शक सूचना आणि निकष विचारात घेऊन परिपूर्ण प्रस्ताव तयार करणे आवश्यक आहे. तसेच प्रस्तावांना सक्षम प्राधिकाऱ्यांची तांत्रिक आणि प्रशासकीय मंजुरी गरजेचे आहे. जेणेकरुन, शासन स्तरावर प्रस्तावांच्या मान्यतेची प्रक्रिया जलदगतीने होईल. विलंब टाळला जाईल. त्यादृष्टीने मंजूर निधीचे वाटप आणि वितरण योग्यवेळी होण्यासाठी आधीपासूनच वरिष्ठ स्तरावरील प्रादेशिक, विभागीय व जिल्हास्तरावरील अधिकाऱ्यांनी कार्यवाही सुरु करणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे नियोजन करण्यात यावे.

## ४५) <u>वन विभागाची कार्यालये स्वच्छ अभियानात आणून त्याबाबत योग्य नियोजन करणे :-</u>

मा. पंतप्रधानांच्या संकल्पनेनुसार देशात “भारत स्वच्छता अभियान” राबविण्यात येत आहे. राज्यातील सर्व अधिकारी आणि कर्मचारी यांच्या सक्रीय सहभागातून सर्व कार्यालये, परिसर, शासकीय निवासस्थाने, विश्रामगृहे, मोकळ्या जागा आणि सार्वजनिक जागा स्वच्छ करून तेथील सौंदर्यात भर टाकण्याचा व त्यातून कार्यक्षमता वाढवण्याचा प्रयत्न या अभियानातून होणे अपेक्षित आहे. अधिकारी/कर्मचारी यांनी वर्षातून किमान १०० तास (आठवड्यातून किमान एकदा २ तास) स्वयंस्पुर्तीने

श्रमदान करणे देखील अभिप्रेत आहे. याबाबत सविस्तर सूचना वन विभागाच्या दि. २१ जानेवारी २०१५ परिपत्रकाव्दारे देण्यात आलेल्या आहेत.

तथापि, या संदर्भात आवश्यक त्या सकारात्मक बाबी फारशा समोर आल्याचे दिसत नाही. स्वच्छता अभियान हे मिशनमोड पध्दतीने मनापासून राबविले गेले पाहिजे. त्यादृष्टीने वन विभागांतर्गत सर्व कार्यालये आणि वर नमूद केलेली ठिकाणे स्वच्छता अभियानांतर्गत अंतर्भूत करुन तेथील परिसर आणि वातावरण आल्हाददायक आणि आरोग्यदायी करण्यासाठी नियोजन करण्यात यावे. तसेच या कामाचे वरिष्ठ कार्यालयामार्फत वेळोवेळी संनियंत्रण करण्याची पध्दती ठरविण्यात यावी.

४६) **<u>JFMC चे संगणकीकरण करणे :-</u>**

वनक्षेत्रालगतच्या गावातील लोकांच्या लोकसहभागातून वन आणि वन्यप्राणी यांचे संरक्षण व संवर्धन व्हावे, यासाठी संयुक्त वन व्यवस्थापन समिती व ग्राम परिस्थितीकी विकास समिती कार्यरत आहेत. या समित्यांतील सदस्यांचा सहभाग अधिक वाढविण्याच्या दृष्टीने त्यांच्याशी पत्र, दूरध्वनी, एसएमएस, ईमेल ह्यांद्वारे संपर्क साधता येण्यासाठी आवश्यक ती संगणकीय प्रणाली विकसित करणे गरजेचे आहे. त्या अनुषंगाने, संयुक्त वन व्यवस्थापन समितीचे नाव, वनवृत्त, वन विभाग, गावाचे नाव, सदस्यांची नावे व तद्नुषंगीक माहिती तयार करण्यासंदर्भात संगणक आज्ञावली अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (माहिती, तंत्रज्ञान व धोरण), नागपूर यांनी तयार केली आहे.

तथापि, या संगणकीकृत माहितीमध्ये संयुक्त वन व्यवस्थापन समित्यांनी केलेल्या कामांची नोंद करुन त्यांच्यामध्ये स्पर्धात्मक वातावरण निर्माण करण्याची आवश्यक आहे. तसेच ज्या समित्या उत्तम काम करतील त्यांना प्रोत्साहनात्मक बाबींसंदर्भात प्रस्ताव तयार करणे गरजेचे आहे. त्याबरोबरच संगणक आज्ञावलीद्वारे समित्या करीत असलेल्या कामांचे संनियंत्रण होणे योगय राहील. त्यादृष्टीने कार्यवाही करण्यात यावी.

४७) **<u>नागरी वन समितींचे गठन व संगणकीकरण करणे :-</u>**

नागरी परिसरात असलेल्या नगरपालिका, नगरपरिषदा आणि महानगरपालिका क्षेत्रातील वनक्षेत्राचे स्थानिक लोकांच्या सहभागातून आणि सक्रीय योगदानातून संयुक्तरित्या वनसंरक्षण आणि वन व्यवस्थापन करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. त्यानुसार संयुक्त वन व्यवस्थापन समित्यांमध्ये (नागरी क्षेत्र) सर्वसाधारण समिती, कार्यकारी समिती यांचा समावेश आहे. त्याचप्रमाणे कार्यक्रमाच्या अंमलबजावणीमधील निरीक्षण अणि मार्गदर्शनाकरीता राज्यस्तरीय सुकाणू समितीचे गठण निश्चित करण्यात आले आहे. या कार्यक्रमात राष्ट्रीय उद्यान तसेच अभयारण्ये वगळता सर्व प्रकारच्या वनांचा समावेश असेल. यासंबंधीचा शासन निर्णय दि. ४ ऑगस्ट २०१५ रोजी निर्गमित करण्यात आला आहे.

या अनुषंगाने समित्यांचे गठण आणि प्रत्येक समितीचे अध्यक्ष व सदस्य यांची नावे, पत्ते व मोबाईल क्रमांक इ. माहितीची संगणकीय प्रणाली विकसित करण्यात यावी. जेणेकरुन, त्यांच्याशी संपर्क साधणे शक्य होईल.

## ४८) वन विभागाच्या वर्षभराच्या कार्यक्रमांचे नियोजन करुन प्रमुख पाहुण्यांच्या तारखा घेणे :-

वन विभागांतर्गत वर्षभरामध्ये वेगवेगळ्या बाबींसंदर्भात कार्यक्रम आयोजित केले जातात. त्यामध्ये मा.पंतप्रधान, मा. केंद्रीय मंत्री आणि इतर मान्यवर यांना बोलाविले जाते. तथापि, नियोजित कार्यक्रम आणि प्रमुख पाहुण्यांची उपलब्धता याचा मेळ बऱ्याचवेळा बसत नाही. त्यामुळे महत्त्वाच्या व्यक्ती कार्यक्रमाला येऊ शकत नाहीत. परिणामत: अमुल्य आणि मौलिक विचारांचा लाभ विभागास मिळत नाही. तसेच अशा पाहुण्यांमार्फत वन विभागामध्ये नवीन संकल्पना, विचार आणि भुमिका विकसित होण्यापासून विभाग वंचित राहतो.

वरील बाबींचा विचार केल्यास वर्षभरात हाती घ्यावयाच्या कार्यक्रमांचे नियोजन फार आधीपासून करणे हे व्यवस्थापन शास्त्राच्या तत्त्वाशी सुसंगत आहे. त्यानुसार कार्यक्रमाच्या तारखा आणि सन्माननीय व्यक्ती निश्चित झाल्यास त्यांना आधीपासूनच निमंत्रण पाठविता येईल. त्यामुळे सन्माननीय व्यक्तींना आपली वेळ उपलब्ध करुन देण्यास सुलभ होईल. विभागाला देखील त्याचा फायदा होईल.

त्यादृष्टीने कार्यक्रमांचे नियोजन करुन प्रमुख पाहुण्यांच्या तारखा घेण्याबाबत वेळीच प्रस्ताव तयार करण्याची कार्यपध्दती विकसित व्हावी.

## ४९) महानगरपालिका, नगरपालिका, ग्रामपंचायत, जिल्हापरिषद, पंचायत समिती महसूल जमिनी एम.आय.डी.सी. जमिनी यांच्या मोकळ्या जागा व्यवस्थापन यांचा कालबध्द कार्यक्रम :-

राज्याच्या प्रगती आणि विकासात वन विभागाचा वाटा महत्त्वपूर्ण आहे. राज्यातील हरित क्षेत्र आणि वनक्षेत्र वाढल्यास त्याचा अप्रत्यक्षरित्या चांगला परिणाम नागरिकांच्या आरोग्य, कार्यक्षमता आणि विकास कामांच्या अंमलबजावणीवर होऊ शकतो. त्यासाठी मोठ्या प्रमाणात वृक्षारोपणाचा कार्यक्रम हाती घेऊन लोकसहभागातून जास्तीत जास्त वृक्ष जिवंत राहण्याचे प्रमाण वाढेल, हे पाहिले गेले पाहिजे.

त्यासाठी महानगरपालिका, नगरपालिका, ग्रामपंचायत, जिल्हापरिषद, पंचायत समिती महसूल जमिनी एम.आय.डी.सी. जमिनी यांच्या मोकळ्या जागांची उपलब्धता होण्यासाठी त्यांच्याकडे सातत्याने संपर्क व सुसंवाद ठेवणे गरजेचे आहे. सदर जागांच्या उपलब्धतेबाबत अंदाजे क्षेत्र व स्थळ यांची माहिती संकलित करण्यात यावी. त्यानंतर अंमलबजावणी यंत्रणेस स्थानिक मातीचा प्रकार, हवामान व भौगोलिक परिस्थिती विचारात घेऊन रोपांची वृक्ष प्रजातींची निवड, रोपांची उपलब्धता व संगोपन व निगा यासाठी वन विभागाने संबंधित विभागांना तांत्रिक व प्रशासकीय सल्ला द्यावा. रस्त्यांच्या दुतर्फा व मोकळ्या जागांवर वृक्ष लागवड करणे, वन उद्यान, जैवविविधता उद्यान, नक्षत्र उद्यान, स्मृती उद्यान इ. पैकी कोणता प्रकल्प राबविता येईल हे ठरविण्यात यावे. त्यानुसार ठराविक मुदतीत राज्यातील वर नमूद ठिकाणी मोकळ्या जागांचे व्यवस्थापन आणि हरितीकरण करण्याचा कार्यक्रम निश्चित करण्यात यावा. यासाठी वन व सामाजिक वनीकरण विभागाची भुमिका प्रेरक (Facilitator) म्हणून असावी.

## ५०) राज्यातील वन विभागातील अतिक्रमण हटाव कालबध्द कार्यक्रम :-

वनक्षेत्रावरील अतिक्रमण हा चिंतेचा विषय आहे. वन, वन्यप्राणी व जैवविविधता यांची संवर्धन व संरक्षण ही महत्त्वाची जबाबदारी वन विभागाकडे आहे. वन विभागाच्या जमिनीवर कोणत्या-ना-कोणत्या प्रकारे अतिक्रमण होत राहिले तर वनक्षेत्र सातत्याने कमी होत राहील. त्याचा पर्यावरणाच्या संतुलनावर अनिष्ट परिणाम होतो. वन जमिनीवर अतिक्रमण कोणत्या भागामध्ये आणि किती क्षेत्रावर आहे, याचा संपूर्ण डेटाबेस तयार होणे आवश्यक आहे. त्यादृष्टीने वन जमिनीचे सर्वे आणि डिमार्केशन तातडीने पूर्ण करण्यात यावे. तसेच वन जमिनीचे महसुली अभिलेख ( Land Records ) अदयावत करण्यासाठी प्राधान्याने कार्यवाही व्हावी. जेणेकरुन अतिक्रमित क्षेत्र निश्चित करता येईल. त्याअनुषंगाने अतिक्रमण हटविण्यासाठी नियोजनपूर्वक कृती आराखडा तयार करुन सदर अतिक्रमण हटविण्याची कारवाई करावी.

## ५१) वन व वन्य प्राण्यांबाबत आवड व जागृतीसाठी चित्रपटांच्या शुटींग साईटवर वन विभागाची माहिती उपलब्ध करुन देणे :-

मुंबई ही बॉलिवूड नगरी म्हणून नावारुपाला आलेली आहे. चित्रपटांबरोबरच अनेक दूरदर्शन मालिकांचे चित्रीकरण मुंबई आणि राज्याच्या इतर भागात होत असते. अशा ठिकाणी वन, वन्यजीव, जैवविविधता, सामाजिक वनीकरण आणि पर्यावरण सुरक्षा आणि संवर्धन यासंदर्भातील पुस्तके, चित्रे, भित्तीचित्रे, माहितीपत्रके, सीडीज इ. सामग्री ठेवणे उपयुक्त होईल. शुटींगच्या ठिकाणी येणारे अभिनेते, अभिनेत्री व लोकप्रिय व्यक्तींमध्ये वन आणि वन्यप्राण्यांमार्फत सहानुभूती, प्रेम आणि आत्मियता निर्माण होण्यास हातभार लागेल. शुटींग स्थळी अनेकांबरोबर संवाद साधून विचारांची देवाण-घेवाण होऊ शकते. त्यातून या सर्व क्षेत्राबद्दल जिव्हाळा निर्माण होण्यास मदत होऊ शकते. अशा सेलेब्रिटीज जनतेमध्ये या क्षेत्राबाबत प्रसार आणि प्रचार करु शकतात. त्यातून व्यापक जनाधार वन आणि वन्यजीव क्षेत्रास मिळू शकतो.

त्या अनुषंगाने चित्रपट क्षेत्रातील कार्यालये व महाराष्ट्र राज्य चित्रपट महामंडळ यांच्यामार्फत चित्रपटांच्या व दूरदर्शन मालिकांच्या चित्रीकरणाच्या जागा समजू शकतात. त्यादृष्टीने वन आणि सामाजिक वनीकरण विभागाने उपक्रम हाती घेऊन अंमलबजावणी करावी.

## ५२) फोटोग्राफीची स्पर्धा ठेवणे.

निसर्ग सौंदर्य आपल्या कॅमेऱ्यामध्ये बंदिस्त करण्यासाठी अनेक कलंदर आणि रसिक लोक उत्सुक असतात. राज्यातील शाळा, महाविद्यालये, विद्यापीठे, ट्रेकिंग ग्रुप, इत्यादी ठिकाणी वन आणि वन्यप्राणी व निसर्ग यांच्याविषयी फोटोग्राफी स्पर्धा आयोजित करणे शक्य आहे. त्यातून उत्तमोत्तम छायाचित्रांचे प्रदर्शन राज्याच्या वेगवेगळ्या कलादालनांमध्ये (Arts Gallery) आयोजित करण्यासाठी प्रोत्साहन देणे

गरजेचे आहे. त्यामधून वन, वन्यजीव, जैवविविधता, सामाजिक वनीकरण आणि पर्यावरण सुरक्षा आणि निसर्ग याबद्दल लोकांच्या मनामध्ये जागृती निर्माण होण्यास मदत होईल.

त्यादृष्टीने कार्यक्रम व आराखडा तयार करुन प्रत्यक्ष कार्यान्वित करावा.

५३) <u>जिल्हा, विभागीय व राज्यस्तरावर ग्रीन मॅरेथॉन आयोजित करणे :-</u>

शारिरीक आणि मानसिक आरोग्य उत्तम राहण्यासाठी चालणे आणि धावणे हे उत्तम व्यायाम प्रकार म्हणून गणले जातात. लांब पल्ल्याच्या धावण्याची शर्यती राज्याच्या विविध भागात आयोजित केल्या जातात. अशा प्रसंगी लोक उत्साहाने आणि उत्स्फुर्तपणे ह्या स्पर्धा पाहण्यासाठी मोठ्या संख्येने जमतात. अशावेळी वेगवेगळे सामाजिक संदेश लोकांपर्यंत पोहोचविण्यासाठी वाव आणि संधी असते. त्याचा दृश्य परिणाम होतो.

राज्यामध्ये आयोजित केल्या जाणाऱ्या मॅरेथॉन स्पर्धामध्ये जमणारे लोक प्लास्टीक पाण्याच्या बाटल्या, खाद्यपदार्थ, शितपेये विकत घेतात. त्याचा उपयोग केल्यानंतर रिकाम्या बाटल्या आणि इतर साहित्य मिळेल त्या जागेमध्ये फेकून देतात. त्याचा पर्यावरणावर अत्यंत अनिष्ट परिणाम होतो. त्यासाठी असे साहित्य न वापरण्याबाबत लोकांमध्ये जागृती निर्माण करणे आवश्यक आहे.

या दृष्टीने ग्रीन मॅरेथॉन स्पर्धांचे आयोजन करण्याबाबत आयोजकांचे मन वळविणे गरजेचे आहे. त्यासाठी आयोजकांनी स्पर्धेपुर्वी अशा सामुग्रीचा वापर करु नये, म्हणून आवाहन करावे. तसेच मॅरेथॉन स्पर्धेच्या ठिकाणी वन, वन्यजीव, जैवविविधता, सामाजिक वनीकरण आणि पर्यावरण सुरक्षा आणि संवर्धन यासंदर्भातील पुस्तके, चित्रे, भित्तीचित्रे, माहितीपत्रके, सीडीज इ. सामग्री ठेवणे उपयुक्त होईल. त्यातून या क्षेत्राबद्दल चांगला संदेश लोकांपर्यत पोहोचविता येईल.

त्याचबरोबर ग्रीन मॅरेथॉन अंतर्गत वन, वन्यजीव, जैवविविधता, सामाजिक वनीकरण आणि पर्यावरण इत्यादी किंवा अन्य अशी एखादी विशिष्ट थिम घेवून त्या नावाने ग्रीन मॅरेथॉन आयोजित करावी. त्यातून एखादया विशिष्ट विषयाबाबत लोकांमध्ये जागृती निर्माण करता येईल.

वरील बाबींच्या अनुषंगाने कार्यवाही करण्याबाबत प्रसिध्दी आणि विस्तार विभागाने नेतृत्व करावे. अशा ग्रीन मॅरेथॉन राज्यातील वेगवेगळ्या भागात आयोजित करण्याबाबत पुढाकार घ्यावा.

५४) <u>देशातील इतर राज्यात वन क्षेत्रामध्ये होणारे काम जाणून घेण्यासाठी अभ्यास दौरे करणे :-</u>

आपल्या देशाला वनसंपदेची मोठी देणगी लाभलेली आहे. वन, वन्यजीव, जैवविविधता, सामाजिक वनीकरण आणि पर्यावरण यासंदर्भात त्या-त्या राज्याची भौगोलिक परिस्थिती आणि प्राधान्यक्रम यानुसार काम चालते. इतर राज्यात होणारे काम आपल्याकडील अधिकारी/कर्मचारी यांनी पाहिल्यास नवीन संकल्पना आपल्या राज्यात देखील रुजविता येतील. त्यासाठी अधिकारी/कर्मचारी यांना इतर राज्यात जाऊन विशिष्ट विषय घेऊन अभ्यास दौरा करण्यास प्रोत्साहित करणे योग्य होईल. राज्यामध्ये अनेक नाविन्यपूर्ण योजना, धोरण निश्चिती आणि अंमलबजावणी यासाठी त्याचा फायदा होऊ

शकेल. त्यादृष्टीने दर वर्षाचा कार्यक्रम तयार करुन योग्य अधिकाऱ्यांची निवड होऊन त्यांना अभ्यास दौऱ्यासाठी पाठविण्यात यावे. अभ्यास दौऱ्याचा अहवाल सादर झाल्यानंतर त्याची उपयुक्तता लक्षात घेऊन धोरण आणि अंमलबजावणीमध्ये उपयोग व्हावा.

**५५) शिक्षण विभागाच्या अभ्यासक्रमामध्ये वन, वन्यप्राणी यांचे संरक्षण व संवर्धनाबाबत धडा ठेवणे :-**

कोवळ्या आणि संस्कारक्षम वयामध्ये ज्या गोष्टी शिकविल्या जातात, त्याचा दिर्घकालीन परिणाम मनुष्य जीवनावर राहतो. त्यासाठी वन, वन्यप्राणी, जैवविविधता, पर्यावरण, सामाजिक वनीकरण इ. बाबत शालेय पुस्तकांमध्ये उत्तम पाठ ठेवल्यास मुलांना त्याची लहान वयातच माहिती होईल. या सर्व बाबींचे संरक्षण व संवर्धन करण्याबाबत त्यांच्या मनामध्ये आस, जिद्द आणि तळमळ निर्माण होईल. यासंदर्भात अयोग्य घटना घडल्यास त्यावर मात करण्यासाठी विद्यार्थी आपोआप पुढे येतील. या सर्व प्रक्रियेतून वन आणि वन्यप्राण्यांचे संरक्षण आणि संवर्धन होण्यास मोठा हातभार लागेल. शिक्षण संपल्यानंतर विद्यार्थी आपल्या भावी आयुष्यात देखील या क्षेत्राचा ठेवा सतत जतन करण्यासाठी सतत प्रयत्नशील राहतील.

या अनुषंगाने शालेय शिक्षण विभागास पाठ्यपुस्तकांमध्ये वर नमूद विषयांवर पाठ ठेवण्याबाबत विनंती करण्यात यावी.

**५६) अवैध वृक्षतोडीवर बंधन घालण्यासाठी उपग्रह पाळत ( Satellite Surveillance ) ठेवणे :-**

वन गुन्हेगारांमार्फत दुर्मिळ अशा वृक्षसंपदेची तोड केली जाते. व्यापक सामाजिक लाभ विचारात न घेता गुन्हेगारांकडून असे कृत्य केले जाते. त्यास प्रतिबंध घालणे आवश्यक आहे. घनदाट आणि लांबवर पसरलेल्या जंगलात पायपीट करुन अशी दुष्कृत्ये करणाऱ्या लोकांवर नजर ठेवण्यास मर्यादा येतात. त्याचा फायदा समाजकंटक घेतात.

अवैध वृक्षतोडीस आळा घालून उत्तम वनसंपदा राखण्यासाठी तंत्रज्ञानाचा प्रभावीपणे वापर करण्याचा पर्याय उपलब्ध झाला आहे. उपग्रहाद्वारे मिळाणाऱ्या चित्रिकरणाद्वारे वनाची स्थिती समजणे सोपे झाले आहे. सॅटेलाईटद्वारे मिळणाऱ्या फोटोंमार्फत वनक्षेत्रावर देखरेख ठेवल्यास अवैध वृक्षतोड तात्काळ लक्षात येऊ शकेल. त्यानंतर गुन्हेगारांना पकडून सक्षम न्यायालयातून जबर शिक्षा होणे शक्य होईल. सॅटेलाईट सर्वेलन्स हे अचूक आणि वेगाने होत असल्याने बेकायदा वृक्षांची कत्तल थांबविता येऊ शकेल. त्याकरिता केंद्र शासनाच्या संबंधित संस्था आणि महाराष्ट्र राज्य रिमोट सेंसिग एजन्सी यांच्याशी टाय-अप करावे.

त्यादृष्टीने वन विभागाने योजना तयार करुन त्याची अंमलबजावणी सर्व वनवृत्तांमध्ये होईल, याबाबत दक्षता घ्यावी.

**५७) वनक्षेत्राबाबत इतर देशांच्या कायद्यांचा अभ्यास करण्यासाठी समिती तयार करणे.**

जागतिक स्तरावर वन व वन्यप्राणी यांचे संरक्षण, संवर्धन व व्यवस्थापन या संदर्भात वेगवेगळे कायदे आहेत. त्या कायद्यातील तरतुदी आणि आपल्या कायद्यातील समकक्ष कायदे यांच्या त्रुटींचा

अभ्यास केल्यास आपल्या कायद्यामध्ये कोणत्या त्रुटी आहेत हे समजू शकेल. वनक्षेत्राचे प्रभावी संरक्षण व संवर्धनासंदर्भात कायद्यातील त्रुटी व पळवाटा आपल्याला बुजविता येतील. त्यासाठी इतर देशातील वन कायद्यांचा अभ्यास करण्यासाठी समिती नेमणे उपयुक्त होईल. या समितीने ठराविक मुदतीत देशातील इतर कायद्याचा अभ्यास करावा आणि त्या अनुषंगाने आपल्याकडील कायद्यामध्ये काही सुधारणा, भर आणि दुरुस्त्या आवश्यक आहे त्याबाबत शिफारशी कराव्यात.

त्यादृष्टीने समितीची स्थापना करण्यासाठी समितीवर नेमावयाच्या तज्ञ अधिकाऱ्यांची यादी तयार करावी. तसेच समितीस अंतिम स्वरुप देण्यासाठी प्रस्ताव सादर करावा.

**५८) <u>वन विभागाच्या योजनांचे मूल्यमापन करणारी व्यवस्था करणे :-</u>**

वन विभागात अनेक योजना, कार्यक्रम व उपक्रम राबविले जातात. तथापि, योजनांच्या अंमलबजावणीतून लोकांचा किती फायदा झाला याचे मुल्यमापन करणारी यंत्रणा आवश्यक आहे. सध्या योजनांचे मुल्यमापन काही प्रमाणात होते. परंतू ते परिपूर्ण दिसत नाहीत. त्यामुळे अस्तित्वातील योजनांचे मुल्यमापन झाल्यास त्यातील कमतरता, त्रुटी व चुका लक्षात येतील. त्यानुरुप धोरण आणि कार्यपध्दतीमध्ये बदल करता येतील. त्याचा दिर्घकालीन लाभ जनतेला आणि विभागाला होईल. त्यासाठी वन विभागाच्या योजनांचे मुल्यमापन करण्यासाठी स्वतंत्र यंत्रणा निर्माण करुन कार्यान्वित करण्याचा प्रस्ताव तातडीने विचारात घ्यावा.

**५९) विभागाचा गैरव्यवहार, वृक्षतोड, शिकार मूल्यवान सूचनांबाबत संगणकीय कॉल सेंटरची <u>निर्मिती करणे.</u>**

जनतेच्या तक्रारींचे निवारण करण्यासाठी संगणकीय कॉल सेंटर अंतर्गत खालील बाबींचा समावेश करावा :-

१) वन आणि वनेतर, सार्वजनिक जमिनीवर वृक्ष लागवड करण्यासाठी लोकांच्या शंकांचे निरसन करणे,
२) अशासकीय, सामाजिक, शैक्षणिक आणि इतर स्वयंसेवी संस्थांना वृक्ष लागवडीच्या कार्यक्रमांमध्ये सहभागी व्हावयाचे असेल तर त्यासाठी त्यांना पुरेशी तांत्रिक आणि प्रशासकीय मदत करणे,
३) अवैध वृक्षतोड आणि वनोपजाची चोरी, अवैध चराई व अवैध शिकार या संदर्भात जनतेच्या प्रश्नांना/तक्रारींना समाधानकारक उत्तरे देणे.
४) त्याचबरोबर वन व सामाजिक वनीकरण क्षेत्रासंदर्भात जनतेकडून मौलिक सुचना घेण्याची संधी उपलब्ध करुन देणे व त्यावर कार्यवाही करणे.

वर नमूद व इतर योग्य वाटतील त्या बाबींचा समावेश यामध्ये असावा. त्यादृष्टीने प्रस्ताव तयार करुन त्याची अंमलबजावणी कालमर्यादेत व्हावी.

## ६०) सरकारी नोकरीमध्ये अर्ज करताना १० वृक्ष लावले पाहिजेत असा नियम करणे :-

राज्य शासनाच्या सेवेमध्ये अर्ज करताना कमाल २ मुलांची मर्यादा, एमएस-सीआयटी संगणक परीक्षा उत्तीर्ण, मराठी वा इंग्रजी टंकलेखन, सैनिकी सेवा इत्यादी बाबी बंधनकारक आहेत. त्याच धर्तीवर शासकीय नोकरीत अर्ज करताना किमान १० वृक्ष लावले पाहिजे असे बंधन टाकणे योग्य होईल किंवा कसे, यासंदर्भात तपासणी करता येईल. असे झाल्यास शासकीय नोकरीपूर्वी वनाचे महत्त्व, त्याबाबतची जागरुकता विद्यार्थ्यांमध्ये निर्माण होईल. तसेच ज्या विद्यार्थ्यांना सरकारी नोकरीची आवड आहे ते विद्यार्थी भविष्यात नोकरी मिळण्याच्या दृष्टीने सुरुवातीपासून वनाची माहिती घेतील आणि वृक्ष लागवड स्वयंस्फुर्तीने करतील.

त्यादृष्टीने शासकीय नोकरीसाठी अर्ज करताना किमान १० वृक्ष लावले असले पाहिजेत ही अट अंतर्भूत करण्याबाबत प्रस्ताव तयार करुन सामान्य प्रशासन विभागाच्या मान्यतेसाठी सादर करावा.

## ६१) विभागाच्या सर्व कुंपणातील भिंतींवर NGO च्या माध्यमातून घोषवाक्य व चित्र लावणे :-

वन क्षेत्राचे संरक्षण करण्यासाठी वनक्षेत्रालगत संरक्षित भिंती उभारण्यात आल्या आहेत. त्या भिंतींवर अशासकीय संस्था/स्वयंसेवी संस्था यांच्या मार्फत वन, वन्यजीव, जैवविविधता, सामाजिक वनीकरण आणि पर्यावरण यासंदर्भात संरक्षण, संवर्धन, वृक्ष आवरण, पर्यावरण सुरक्षा आणि निसर्ग या संदर्भात उत्तम घोषवाक्य लिहिली गेल्यास त्याचा जन जागृतीसाठी प्रभावी परिणाम होवू शकेल. त्यादृष्टीने प्रस्ताव तयार करुन अंमलबजावणी व्हावी. सर्व वन वृत्तांना याबाबत सविस्तर सुचना आणि निकष तयार करुन पाठवावेत.

## ६२) वनक्षेत्रात येणाऱ्या शाळांना ग्रीन स्कूल योजना लागू करणे :-

"शालेय विद्यार्थ्यांना वन आणि पर्यावरणाची जाण व आपुलकी लहान वयातच निर्माण होणे गरजेचे आहे. पर्यावरणाची काळजी घेण्याची लहानपणापासूनच सवय लागावी आणि ते पर्यावरणाच्या अधिक जवळ जावेत म्हणून 'हरित शाळा' उपक्रम राज्यात काही ठिकाणी घेण्यात आला आहे. त्यातून आपल्या भोवतालच्या निसर्गाबद्दल उत्सुकता व जागरुकता निर्माण करणे शक्य होते. केवळ पुस्तकांमधील माहितीवर अवलंबून न राहाता त्यांना निसर्गाच्या जवळ घेऊन जाणे हे अभिप्रेत आहे.

यामध्ये रेन वॉटर हार्वेस्टिंग, टाकाऊ वस्तूंपासून टिकाऊ वस्तू बनवणे, वैयक्तिक स्वच्छतेच्या सवयी आदी गोष्टी टप्प्याटप्प्याने मुलांपर्यंत पोचवल्या जातात. शहरी आणि ग्रामीण भागात कचऱ्याचा प्रश्नही मोठ्या प्रमाणावर आहे. त्याची जाणीवही विद्यार्थ्यांना व्हावी, यासाठी या उपक्रमाद्वारे प्रयत्न केले जातात. या विषयावरील काही लघुपट वा माहितीपट मुलांना दाखविणे आवश्यक आहे. कागदी पिशव्या बनवणे, रद्दीतल्या कोऱ्या कागदांपासून वह्या बनवणे आदींचे प्रशिक्षणही मुलांना देणे उपयुक्त राहिल. या सर्व बाबींमुळे मुलांना या उपक्रमातून मोठा आनंद मिळू शकेल.

'एक विद्यार्थी एक झाड' ही संकल्पना अशा ठिकाणी राबविणे अपेक्षित आहे. "झाड लावणे म्हणजे नर्सरीतून तयार रोप आणून ते लावायचे असा आपल्याकडे प्रकार आहे. मात्र, या उपक्रमात मुलांना बी रूजवून त्याचे रोप तयार करण्यास प्रवृत्त केल्यास अधिक उपयोग होईल. बी रुजण्याची आणि त्याचे रोप तयार होण्याची प्रक्रिया यामुळे मुलांना प्रत्यक्ष अनुभव येतो. अशा प्रकारे मुलांची स्वत:ची नर्सरी तयार होऊ शकते."

या उपक्रमाचा उद्देश केवळ शाळेच्या स्वच्छतेपुरताच मर्यादित नसून, मुलांनी एकत्र येऊन आपल्या आजूबाजूचा परिसर स्वच्छ ठेवण्यात पुढाकार घ्यावा असाही आहे. नैसगिर्क साधन संपत्तींचा काटकसरीने वापर करण्यास विद्यार्थ्यांनी शिकावे म्हणून पुस्तके, फिल्म स्क्रिनींग्ज आदींचा समावेशही या उपक्रमात करणे अभिप्रेत आहे. गणेशोत्सवाच्या काळात विद्यार्थांच्या पथकांनी सार्वजनिक स्वच्छतेसाठी विशेष प्रयत्नशील राहण्यासाठी त्यांना प्रवृत्त करण्यात यावे. वेगवेगळे सण, कार्यक्रम याद्वारे पर्यावरणाचे महत्व पटवून दयावे. हा उपक्रम प्रत्यक्षात कृतीत आल्यास विद्यार्थ्यांमधील पर्यावरणविषयक जागरुकता वाढेल आणि ते निसर्गाच्या अधिक जवळ येतील.

हरित शाळा ही संकल्पना वनक्षेत्रातील सर्व शाळांमध्ये राबविणे अत्यंत उपयुक्त ठरेल. त्यातून वन, वन्यप्राणी, जैवविविधता, पर्यावरण व निसर्ग यांच्या रक्षणासाठी बालक-पालक व शिक्षक एकत्रितरित्या काम करु शकतील. यामध्ये शाळेच्या मालकीच्या जमिनीवर वृक्षारोपण/उद्यान निर्मिती करणे, शाळा आणि गावामध्ये सौरउर्जा प्रकल्प राबविणे, कामाची बचत करुन जलस्त्रोतांचे रक्षण करणे, कचरा व्यवस्थापन आणि स्थानिक औषधी वनस्पतींची लागवड व अस्तित्वातील वनस्पतींचे सरक्षण इत्यादी बाबी समाविष्ठ करता येतील. अशा उपक्रमातून निसर्गसंपदा वाचविण्यासाठी या शाळांचा फार मोठा हातभार लागेल.

शालेय शिक्षण, ग्राम विकास, आदिवासी विकास आणि सामाजिक न्याय या विभागांमार्फत वनक्षेत्रामध्ये शाळा चालविल्या जातात. या विभागांकडे वनक्षेत्रातील सर्व शाळा हरित शाळा म्हणून घोषित करण्याबाबत प्रस्ताव सादर करुन शासनाची मान्यता घेण्यासंदर्भात तातडीने कार्यवाही व्हावी.

## ६३) <u>राज्यात सर्व नर्सरी विकसित करुन High-tech रोपवाटिका करणे :-</u>

इंधन,चारा,छोटया इमारतींसाठी लाकुड आणि फळे या गरजांसाठी स्थानिक लोक वर्षानुवर्षे जवळच्या जंगलावर अवलंबून राहत होते. परंतु वाढत्या लोकसंख्येची गरज पाहाता वनांचे क्षेत्र कमी पडू लागले आहे. त्याचा विपरित परिणाम पर्यावरणाच्या संतुलनावर होत आहे. त्याचप्रमाणे पुष्कळसे प्रगतीशील शेतकरी त्यांचेकडील पडीक जमिनीवर व्यावसायिक दृष्टीकोनातून मौल्यवान वृक्षप्रजातींची लागवड करण्यास इच्छूक असतात.

नैसर्गिक वनांवरचा ताण कमी करणे आणि शेतकऱ्यांना व्यापारी उत्पादनासाठी पूरक व्यवसायाच्या संधी निर्माण करणे आवश्यक आहे. त्यासाठी वनक्षेत्राबाहेरील खाजगी तसेच सार्वजनिक जमिनीवर वृक्षलागवड करुन स्थानिक लोकांच्या गरजा भागविणे गरजेचे आहे. राज्यातील प्रत्येक

जिल्हास्तरावर व तालुकास्तरावर सामाजिक वनीकरण विभागाच्या रोपवाटिकांमधुन विविध प्रजातीच्या रोपांची निर्मिती यशस्वीपणे करण्यात आली आहे. तथापि बदलत्या कालानुरुप या रोपवाटिकांमध्ये सुधारणा करुन रोपवाटिकांमध्ये व्यापारी उपयोगाच्या प्रजातींची आधुनिक तंत्रज्ञानाच्या सहाय्याने मोठया प्रमाणात रोपेनिर्मिती करणे अत्यंत गरजेचे आहे. त्यादृष्टीने जिल्हास्तरावर व तालुका स्तरावर उच्च तंत्रज्ञानाद्वारे सदृढ आणि निकोप रोपे उपलब्ध करुन देण्यासाठी आधुनिक रोपवाटिका निर्माण करणे आवश्यक आहे.

त्यादृष्टीने २०१५-१६ पासून High-tech रोपवाटिका निर्माण करण्याची योजना कार्यान्वित करण्यात आली आहे. त्यामध्ये विभागीय आणि तालूका स्तरावर High-tech रोपवाटिका तयार करण्याचे प्रकल्प कार्यान्वित झाले आहेत. तथापि, मोठया प्रमाणात दर्जेदार व उंच रोपांची उपलब्धता होण्यासाठी राज्यातील सर्वच रोपवाटीका High-tech करण्यासाठी कालबध्द कार्यक्रम तयार करुन त्याची अंमलबजावणी करण्यात यावी.

## ६४) <u>पांदन रस्त्याच्या दुतर्फा झाडे लावण्याचा विचार करणे :-</u>

गांवकरी व शेतकरी यांना शेती व अन्य दैनंदिन कामकाजासाठी जाण्या-येण्यास पांदन रस्ता हा एकमेव पर्याय आहे. शेती उत्पादन मुख्य रस्त्यापर्यंत आणण्यासाठी बैलगाडीचा वापर अशाच पांदन रस्त्यावरुन होतो. रस्त्यांच्या दोन्ही बाजूस बहुतांशी ठिकाणी शेती असते. बऱ्याच ठिकाणी पांदन रस्ते ग्रामीण रोजगार हमी योजनेखाली घेतले जातात. तसेच असे रस्ते बऱ्याच वेळा नेहमीच्या पायपिटीने तयार होत असतात. असे पांदन रस्ते सुस्थितीत राहण्यासाठी व येणाऱ्या जाणाऱ्यांचा प्रवास सुखकारक व आल्हाददायक होण्यासाठी अशा रस्त्यांच्या बाजुने वृक्ष लागवड करणे उपयुक्त ठरते.

त्या अनुषंगाने पांदन रस्त्यांच्या दुतर्फा ग्रामपंचायतीच्या सहभागाने फळफळाव, शोभिवंत आणि सावली देणारे वृक्ष यांची लागवड करणे फायदेशीर ठरते. अशी वृक्ष लागवड एमजीनरेगा व मग्रारोहयो मधून घेता येऊ शकेल. भौगोलिक परिस्थिती, हवामान, पर्जन्यमान आणि पाण्याची उपलब्धता याचा विचार करुन वृक्ष प्रजातींची निवड उपयुक्त होईल. त्यासाठी वन आणि सामाजिक वनीकरण विभागाने ग्रामपंचायतीशी संपर्क करुन पुढाकार घ्यावा आणि या उपक्रमात तांत्रिक सल्ला द्यावा. त्यातून वृक्ष लागवडीचे व हरित महाराष्ट्राचे स्वप्न साकार होण्यास हातभार लागेल. त्या दिशेने विभागाने प्रस्ताव करुन त्याची अंमलबजावणी करावी.

## ६५) <u>बिबट सफारी, बटर फ्लाय गार्डन यांची निर्मिती करणे :-</u>

राज्यातील व्याघ्र प्रकल्प, अभयारण्ये आणि राखीव क्षेत्रे मोठ्या संख्येने आहेत. तेथे पर्यटन विकास आणि त्याद्वारे रोजगार निर्मितीस प्रचंड मोठा वाव आहे. राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय पर्यटक अशा ठिकाणांना आवर्जून भेटी देत असतात. या पर्यटन स्थळांच्या ठिकाणी किंवा जेथे वनाची घनता मोठी आहे अशा ठिकाणी बिबट सफारी प्रकल्प हाती घेतल्यास पर्यटकांना ते अधिक आकर्षण ठरेल. त्या दृष्टीने

प्रथम टप्प्यात बोरिवली येथील संजय गांधी राष्ट्रीय उद्यान तसेच चंद्रपूर येथे बिबट सफारी स्थापन करण्याबाबत निर्णय घेण्यात आला आहे. सदर प्रकल्प अधिक गतीने मार्गी लावण्याबाबत कार्यवाही व्हावी.

त्याचप्रमाणे राज्यामध्ये रंगीबेरंगी फुलपाखरांच्या अनेक जाती प्रजाती आहेत. फुलपाखरांच्या रंगीत व मनोहारी पंखामुळे हे किटक उडताना लहान-थोरांचे लक्ष सहजतेने आकर्षून घेतात. जैवविविधतेच्या दृष्टीने फुलपाखराचे स्थान अनन्यसाधारण असे आहे.

लेपिडॉप्टेरा हा कीटकांचा एक मोठा गण आहे. पूर्वीच्या शास्त्रज्ञांनी या गणाचे दोन उपगणांत विभाजन केले. त्यांपैकी पहिला गण ऱ्होपॅलोसेरा व दुसरा हेटेरोसेरा. ऱ्होपॅलोसेरात फुलपाखरे व हेटेरोसेरात पतंगांचा समावेश केला आहे. या वर्गीकरणामुळे फुलपाखरांना बरेच महत्त्व प्राप्त झाले आहे. फुलपाखरु उद्यान हा पर्यटकांच्या आकर्षणाचा केंद्र बिंदु आहे. चंद्रपूर जिल्हातील विसापूर येथे प्रस्तावित जैवविविधता उद्यानामध्ये फुलपाखरु उद्यान विकसित करण्याचे नियोजित आहे.

वर नमूद केल्याप्रमाणे राष्ट्रीय उद्याने आणि राज्यात नव्याने हाती घेण्यात येत असलेली उद्याने/जैवविविधता उद्याने यांच्या अंतर्गत किती आणि कोणत्या ठिकाणी फुलपाखरु उद्याने तयार करता येऊ शकतील, यासंदर्भातील आराखडा तयार करुन त्याची अंमलबजावणी व्हावी.

**६६) <u>प्रत्येक व्याघ्र प्रकल्पांतर्गत किमान ५० आसन क्षमतेचे मिनी थिएटर व माहिती केंद्र स्थापित करणे:-</u>**

राज्यामध्ये नामांकित आणि नावाजलेले असे ६ व्याघ्र प्रकल्प आहेत. त्याठिकाणी हजारो पर्यटक भेटी देत असतात. अशा व्याघ्र प्रकल्पांबाबत नकाशासह आणि छोट्या फिल्म्सद्वारे माहिती दिल्यास पर्यटकांची उत्सुकता अधिक वाढेल. त्यातून मौखिक प्रसिध्दीद्वारे ही पर्यटन केंद्र अधिक नावारुपाला येतील. त्यासाठी व्याघ्र प्रकल्पांच्या ठिकाणी किमान ५० आसन क्षमतेचे थिएटर असणे उपयुक्त होईल. तिथे पर्यटकांना संपूर्ण माहिती देता येईल. त्याचप्रमाणे अशा व्याघ्र प्रकल्पांसंदर्भात पुस्तके, चित्रे, घडीपुस्तिका, सीडीज याद्वारे माहिती उपलब्ध करुन देण्यासाठी माहिती केंद्र स्थापित व्हावे. त्यादृष्टीने प्रस्ताव तयार करुन त्याची अंमलबजावणी व्हावी.

**६७) <u>सिध्दिविनायक मंदिराजवळ वृक्ष लागवड आणि संवर्धनासंदर्भात तयार केलेली झाडाची प्रतिकृती सर्व जिल्ह्यांमध्ये प्रवेश करतानाच्या मुख्य मार्गावर लावण्याबाबत :-</u>**

सिध्दिविनायक मंदिरासमोर झाडाची प्रतिकृती तयार करुन त्यावर **"झाडे लावा, झाडे जगवा"** असा संदेश ठळक अक्षरात झाडावर लिहिला आहे. झाड स्वत:च जणू बोलते आहे असे त्यातून प्रतिबिंबित होते. हा संदेश लोकांच्या मनाला तात्काळ भिडणारा आहे. अशा संदेशातून झाडांबद्दल चटकन प्रेम आणि आस्था निर्माण होते. वृक्षलागवडीबाबत लोकांमध्ये जनजागृती व लोकशिक्षण होण्यास अशा झाडरुपी प्रतिकृतीचा खूप परिणाम होऊ शकतो.

त्यादृष्टीने सिध्दिविनायक मंदिराजवळ वृक्षलागवड आणि संवर्धनासंदर्भात तयार केलेली झाडाची प्रतिकृती सर्व जिल्ह्यांमध्ये प्रवेश करतानाच्या मुख्य मार्गावर लावण्याबाबत प्रस्ताव तयार करुन शासनाच्या मान्यतेने सर्व संबंधित अधिकाऱ्यांना कळविण्यात यावे.

**६८) महाराष्ट्र खाजगी वने ( संपादन अधिनियम ), १९७५ यात सुधारणा करुन यातील जमिनीत वृक्ष लागवड करणे किंवा परवडणारी घरे बांधण्यासाठी वापर करता येईल किंवा कसे, याबाबत <u>तपासणी करणे :-</u>**

राज्यातील वनक्षेत्र वाढावे आणि त्यातून पर्यावरण संतुलन आणि सुरक्षितता राखली जावी म्हणून खाजगी जमिनीवरील वनक्षेत्र हे वन विभागाकडे हस्तांतरीत करण्याबाबत वर नमूद अधिनियमांन्वये शासनाने जाणीवपूर्वक निर्णय घेतला होता. त्यामुळे जवळपास १ लक्ष हेक्टर वनक्षेत्र सध्या वन विभागाच्या ताब्यामध्ये आहे. तथापि, कोर्टाच्या निर्णयाचा अन्वयार्थ लावून सदर क्षेत्र पुन्हा मुळ मालकांना परत करण्याबाबत मागण्या आहेत. परंतु व्यापक वन आणि पर्यावरणाच्या हिताच्या दृष्टीने सदर जमिनी परत करणे योग्य होणार नाही. त्याऐवजी खालील पर्याय उपलब्ध आहेत :-

१) सदर वनक्षेत्र वन विभागाच्या ताब्यामध्ये राहण्यासाठी विविध कायदेशीर पर्यायांचा अवलंब करणे.

२) उपलब्ध जमिनीवर मोठया प्रमाणावर वृक्ष लागवडीचा कार्यक्रम घेणे व हरित महाराष्ट्राच्या संकल्पनेस चालना देणे .

३) सदर जमिनीवर जनतेसाठी परवडणारी घरे बांधणे.

वर नमूद दोन्ही पर्यायाबाबत सखल अभ्यास होवून अतिंम धोरण शासनाच्या मान्यतेने ठरविणे योग्य होईल.

**६९) National Geography channel च्या माध्यमातून लोकांना व्याघ्र प्रकल्पाचा एपिसोड तयार <u>करण्यासाठी प्रोत्साहीत करणेबाबत :-</u>**

नॅशनल जिओग्राफी चॅनलवर जगातील वन आणि वन्यप्राणी यांचे संदर्भातील अतिशय सुदंर अशा फिल्म्स दाखविल्या जातात. हया फिल्म्स पाहणे म्हणजे अतिशय आनंददायी अनुभव असतो. निरनिराळया वन्यप्राण्यांचे निसर्गसृष्टीमध्ये येणे, त्यांचा अधिवास, त्यांची वाढ, एकमेकांबद्दलची ओढ, अनुवंशिक वहन, भक्ष शोधणे, शिकार आणि एकंदरीतच वनामधील वावर व हालचाली यासंदर्भात अतिशय सखोल आणि सुक्ष्म चित्रिकरण दाखविले जाते. त्यामुळे लोकांमध्ये वन्यप्राण्यांच्या एकंदरीतच जीवन पध्दतीबाबत उत्सुकता निर्माण होते.

राज्यामध्ये वनसंपदा आणि वनवैभव विस्तृत ठिकाणी पसरले आहे. त्यामध्ये वाघाचा रहिवास बऱ्याच ठिकाणी जाणवतो. वाघ हया अतिशय सुंदर, आकर्षक, डौलदार आणि राजबिंडया प्राण्याचे आकर्षण सर्वच स्तरावरील लोकांमध्ये आहे. नॅशनल जिओग्राफी चॅनलवर वाघासंदर्भातील फिल्म्स लोक

आवर्जुन पाहतात. त्यामुळे वाघांबद्दलच्या फिल्म्स तयार करण्यासाठी लोकांना विशेषत: वन्यजीवप्रेमींना प्रोत्साहन देणे गरजेचे आहे. जंगलामध्ये राहून धाडसाने आणि धडाडीने वाघासंदर्भात शुटिंग केलेल्या फिल्म्स लोकांना पाहता येतील. त्यादृष्टीने कार्यवाही करण्यात यावी.

### ७०) मोराचे कृत्रिम प्रजनन नियोजन तयार करणे :-

मोर हा अतिशय सुंदर, आकर्षक असा राष्ट्रीय पक्षी म्हणून आपल्याला ज्ञात आहे. मोराचे पंख, पिसारा आणि नृत्य हे मोठमोठे कवी आणि साहित्यिक यांच्या लेखणीचा अविभाज्य भाग आहे. तथापि, मोरांचे प्रजनन कमी झाल्यामुळे हा पक्षी संकटग्रस्त अवस्थेत आहे. मोर पक्षाची संख्या वाढावी त्यासाठी जाणिवपूर्वक प्रयत्न करणे ही परिस्थितीची निकड आहे. मोर पक्षी वाचविण्यासाठी हरियाणा, बिहार व राजस्थान शासनाने बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटीच्या सहकार्याने कृत्रिम प्रजनन केंद्र सुरु केल्याची माहिती आहे. त्याच धर्तीवर महाराष्ट्रात देखील मोरांची संख्या वाढावी आणि जैवविविधतेमध्ये उच्च स्थान असलेल्या या पक्षाचे अस्तित्व अधिक वाढावे, यासाठी कृत्रिम प्रजनन केंद्र सुरु करण्याबाबत प्रकल्प हाती घेऊन कार्यान्वित करण्यात यावा. सदर प्रकल्प राज्यात कोठे आणि किती ठिकाणी सुरु करता येतील, याचा देखील अभ्यास व्हावा.

### ७१) वनक्षेत्रातून रोजगारविषयक योजना तयार करणे :-

वन विभागांतर्गत विविध कामे उदा. वन आणि वनेत्तर जमिनीवर वृक्षारोपण, संरक्षण व संगोपन, निसर्ग/वन पर्यटन, वर्कींग प्लॅन अंतर्गत कामे, वन हद्दीचे सर्वेक्षण व सिमांकन, जल व मृद संधारण, सामाजिक वनीकरणांतर्गत खाजगी आणि सामुहिक जमिनीवर वृक्ष लागवड इत्यादी कामे हाती घेतली जातात. बहुतांशी कामे ही रोजगार निर्मितीशी संबंधित आहेत. वन आणि इतर भागांमध्ये राहणाऱ्या जनतेला उपजिविकेची व रोजगाराची साधने निर्माण करुन त्यांची सामाजिक आणि आर्थिक उन्नती साधण्यामध्ये वन विभागाचा महत्त्वपूर्ण सहभाग राहिला आहे. तथापि, अद्यापही रोजगार निर्मिती संदर्भात मोठा पल्ला गाठणे शक्य आहे.

गडचिरोली, चंद्रपूर, भंडारा, नंदुरबार इत्यादी १३ आदिवासीबहुल जिल्ह्यांमध्ये गरीब आणि विशेषत: दारिद्र्यरेषेखालील जनतेला रोजगाराच्या संधी उपलब्ध करुन देणे अत्यंत आवश्यक आहे. यामध्ये अगरबत्ती प्रकल्प, हस्तकला वस्तुंना मार्केटिंग मिळवून देणे, बांबू उत्पादन, वनौषधी लागवड, उत्पादन व विक्री आणि इतर वनावर आधारित प्रक्रिया उद्योगांद्वारे रोजगार निर्मितीस वाव आहे.

त्यादृष्टीने वन विभागामार्फत रोजगाराच्या कोणत्या विस्तारीत संधी उपलब्ध होऊ शकतात, याचा अभ्यास करुन त्यानुसार योजना/प्रकल्प हाती घेण्यासंदर्भात शासन मान्यतेने कार्यवाही करण्यात यावी.

## ७२) रानभाजी प्रजाती संरक्षण, महत्त्व पुस्तिका, रानभाजींची लागवड, संशोधन, विशिष्ट मोसमात येणाऱ्या रानभाज्यांची माहिती एकत्र करणे :-

मानवाच्या सर्वांगीण व शाश्वत विकासात जैवविविधतेचा सहभाग अत्यंत महत्त्वाचा आहे. सजीव सृष्टीतील प्रत्येक घटक एकमेकांशी जोडला गेला आहे. त्यामुळे जैवविविधतेतील प्रत्येक घटकाचे संरक्षण व संवर्धन होणे आवश्यक आहे.

मानवी आहारामध्ये वापरल्या जाणाऱ्या बहुतांशी भाज्या/वनस्पतींची शेतात लागवड केली जाते. तथापि, उत्पादनात वाढ होण्यासाठी रासायनिक खते आणि द्रव्यांचा वापर केला जातो. त्यामुळे भाज्यांची नैसर्गिक चव व त्यातून मिळणारी प्रतिकारशक्ती कमी होत चालली असल्याचे दिसते. यासाठी पारंपरिक भाजी पिकांना पर्याय म्हणून रानभाज्यांचा विचार होऊ शकतो. त्यादृष्टीने रानभाजी प्रजातींची लागवड, संरक्षण, महत्त्व, संशोधन आणि विशिष्ट मोसमात येणाऱ्या रानभाज्यांची माहिती संकलित करणे, यासंदर्भातील प्रकल्प हाती निश्चित निष्कर्षाप्रत येणे गरजेचे आहे. त्यादृष्टीने प्रस्ताव तयार करुन अंमलबजावणी करण्यात यावा.

## ७३) मेळघाट व चिखलदरा विकास :-

मेळघाट हे भौगोलिक दृष्टीने अत्यंत अतिदुर्गम आणि आदिवासी क्षेत्र म्हणून ओळखले जाते. या भागात वनाची घनता आणि वन, वन्यजीवांची विविधता अवर्णनीय अशी आहे. वन विभागातील अधिकारी/ कर्मचाऱ्यांची कार्यालये तळस्तरापर्यंत अत्यंत अवघड आणि दुर्गम भागात वसलेली आहेत. मुख्य रस्त्यांव्यतिरिक्त इतर ठिकाणी दळणवळणाची मोठी अडचण आहे. अशा परिस्थितीत आदिवासी लोकसंख्येला रोजगाराच्या संधी उपलब्ध करुन देण्यात वन विभाग अग्रेसर आहे. लोकसहभागातून वनाचे संरक्षण करण्यामध्ये वन विभाग अतिशय मोलाची भूमिका पार पाडत आहे.

भारत सरकारच्या राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरणाने (NTCA) मॅनेजमेंट इफेक्टिव्हनेस इव्हॅल्युएशन ऑफ टायगर रिझर्व्ह इन इंडियाबाबत केलेल्या अभ्यासात राज्यातील मेळघाट व्याघ्र प्रकल्पास “व्हेरी गुड” दर्जा मिळाला आहे.

त्याचप्रमाणे व्याघ्र प्रकल्पांतर्गत चांगल्या प्रतीची कामे झाल्याबद्दल देशातील चार व्याघ्र राखीवांना पुरस्कार देण्यात आले. यापैकी राज्यातील मेळघाट व्याघ्र राखीव क्षेत्रातील गावांच्या पुनर्वसनाबाबत झालेल्या उत्कृष्ट कामासाठी एनटीसीए कडून महाराष्ट्राला पारितोषिक मिळाले. ही बाब वन विभागाच्या दृष्टीने भुषणास्पद आहे. तथापि, मेळघाट व्याघ्र प्रकल्पांतर्गत पर्यटनविषयक सोयीसुविधांबाबत बराच मोठा पल्ला गाठावयाचा आहे. निसर्ग पर्यटनाचा १० वर्षाचा आराखडा तयार करुन जनतेच्या सूचनांसाठी प्रसिध्द केला आहे. त्यावर तातडीने निर्णय होणे अपेक्षित आहे.

त्याचबरोबर मेळघाट भागातील राखीव क्षेत्रातील गावांचे पुनर्वसन, उन्हाळ्यातील पाणी टंचाई, पशुवैद्यकीय चिकित्सालय, वाघ आणि अन्य प्राण्यांची अवैध शिकार, अवैध वृक्षतोड, मानव-वन्यप्राणी संघर्ष, आदिवासी आणि बिगर आदिवासींना उपजिविकेची विस्तृत साधनांची निर्मिती इत्यादी व अन्य प्रश्न

आहेत, यांची सोडवणूक प्राधान्याने होण्याबाबत नियोजनपूर्वक कार्यवाही होऊन या भागाचा विकास साधण्यास वन विभागाने आपली महत्त्वपूर्ण भूमिका पार पाडणे गरजेचे आहे.

चिखलदरा हे थंड हवेचे ठिकाण म्हणून जगप्रसिध्द आहे. येथील निसर्ग सौंदर्य आणि वनवैभव हे भूरळ पाडणारे आहे. या ठिकाणच्या भौगोलिक परिस्थितीचा आणि जैवविविधतेचा उपयोग पर्यटनवृध्दीसाठी करण्यास खूप मोठा वाव आहे. त्याचबरोबर वनऔषधी लागवड आणि उत्पादन मोठ्या प्रमाणात वाढविणे शक्य आहे. त्यादृष्टीने कालबध्द पदधतीने विकास योजना राबविल्यास या भागातील विकासासाठी वन विभागाचा उत्तम हातभार लागू शकेल.

## ७४) <u>विभागात वास्तुविशारद सेवा घेण्यासाठी नियोजन :-</u>

विभागांतर्गत प्रशासकीय कार्यालये, विश्रामगृहे आणि अधिकारी/कर्मचारी यांची निवासस्थाने यासंदर्भातील इमारतींचे बांधकाम केले जाते. सध्या असलेल्या इमारती पाहिल्या असत्या त्या तेवढ्या आकर्षक वाटत नाहीत. निवासस्थानांची रचना देखील फारशी समाधानकारक नाही. वन विभागांतर्गत सर्वच इमारती ह्या ग्रीन बिल्डींग ह्या संकल्पनेशी सुसंगत असणे गरजेचे आहे. तरच वन आणि पर्यावरण याबाबत आपण लोकांमध्ये अधिक चांगला संदेश देऊ शकू. त्यादृष्टीने खाजगी वास्तुविशारदांच्या सेवा उपलब्ध करुन त्यांच्यामार्फत पर्यावरणस्नेही इमारतींचे बांधकाम व लॅण्ड स्केपिंग उत्तमरितीने करु शकू. त्या अनुषंगाने प्रस्ताव विचारात घेऊन कार्यवाही करावी.

## ७५) विभागांतर्गत न्यायालयीन प्रकरणांचे मुल्यमापन करुन किती प्रकरणात आपण जिंकतो याचा <u>आढावा घेणे. तसेच न्यायालयीन प्रकरणात उत्तम वकिलांच्या सेवा घेणे :-</u>

वन विभागातंर्गत कर्मचारी/अधिकारी आणि वन आणि सामाजिक वनीकरणातील वनमजूर यांच्या सेवाविषयक आणि विभागाच्या इतर काही तांत्रिक बाबीं संदर्भात कामगार न्यायालये, औद्योगिक न्यायालये, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई, औरंगाबाद आणि नागपूर आणि उच्च न्यायालय, मुंबई, औरंगाबाद आणि नागपूर व सर्वोच्च न्यायालयामध्ये प्रकरणे दाखल होत असतात. बहुतांशी प्रकरणांमध्ये सचिव (वने) हे प्रतिवादी क्र.१ असतात. इतर संबंधित अधिकारी देखील प्रतिवादी असतात.

न्यायालयीन प्रकरणाबाबत योग्य ती संवेदनशिलता (sensitivity), तत्परता (promptness) आणि सावधानता (alertness) क्षेत्रिय कार्यालयाकडून अपेक्षित आहे. त्यासाठी आपला प्रतिसाद (Response) बदलणे ही लोकशाही प्रक्रियेतील महत्वाची बाब आहे. त्यासाठी कार्यालयीन कामासोबत न्यायालयीन प्रकरण हे आपल्या कामाचा अविभाज्य भाग समजून न्यायालयीन प्रकरणास प्रथम प्राधान्य देणे आवश्यक आहे.

न्यायालयीन प्रकरणात आवश्यक त्या कालमर्यादेत प्रतिज्ञापत्र दाखल करणे आणि सरकारी वकिलांना प्रकरणाचे योग्य ते ब्रिफिंग करणे महत्त्वाचे आहे. शासनाची बाजू याचिकेतील / मूळ अर्जातील

सर्व मुद्दयांचा विचार करुन न्यायालयामध्ये प्रतिज्ञापत्राद्वारे वस्तुस्थितीदर्शक, खुलासेवार आणि भक्कमपणे मांडल्यास त्याचा विचार निश्चितच मा. न्यायालय करते.

सद्य:स्थितीत जवळपास २३९० न्यायालयीन प्रकरणे विविध स्तरावर प्रलंबित असल्याचे दिसून येते. आतापर्यंत दाखल झालेली न्यायालयीन प्रकरणे कोणत्या परिस्थितीत दाखल झाली व ती टाळता येणे शक्य होते काय ? यासंदर्भात धोरणविषयक बाबी आणि विभागाकडून होणारी कार्यवाही याबाबत मुल्यमापन होणे गरजेचे आहे. त्याचप्रमाणे आतापर्यंत दाखल झालेल्या किती प्रकरणात शासनाच्या बाजुने निर्णय झाला आणि किंवा किती प्रकरणी विरोधी निकाल झाला, याबाबत देखील आढावा होणे आवश्यक आहे. तरच विभागाच्या कामगिरीबाबत वस्तुनिष्ठ मुल्यमापन होऊ शकेल. न्यायालयीन प्रकरणे हाताळण्याबाबत वन विभागाच्या दि. ३०.४.२०१५ रोजीच्या परिपत्रकान्वये सविस्तर सूचना देण्यात आल्या आहेत. न्यायालयीन प्रकरणांबाबत विभागाची प्रतिमा उच्चस्तरावर राहण्यासाठी त्यानुसार कार्यवाही अपेक्षित आहे.

त्याचप्रमाणे सर्व न्यायालयीन प्रकरणात शासनाच्या बाजुने निर्णय होण्यासाठी चांगल्या वकिलांच्या सेवा उपलब्ध करुन घेण्याबाबत फीचे स्वरुप आणि शासनावर येणारा आर्थिक भार याचा विचार घेऊन निर्णय अपेक्षित आहे. त्यादृष्टीने विभागाने कार्यवाही करावी.

**७६) <u>झाडे लावण्यासंदर्भातील जागतिक सर्व विक्रम मोडण्याचे नियोजन करणे :-</u>**

राज्यामधील वनक्षेत्र आणि वृक्षाच्छादन सद्याच्या २० टक्क्यावरून ३३ टक्क्यापर्यंत नेण्याच्या दृष्टीने “हरित महाराष्ट्र” ह्या महत्वकांक्षी कार्यक्रमाची राज्यात अंमलबजावणी सूरू आहे. इतर काही राज्यामध्ये पावसाळ्यातील एका दिवसात १० लाखापेक्षा जास्त झाडे लावण्याचा विक्रम झाला असून त्याची नोंद गिनिज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड मध्ये झाल्याचे आपल्या सर्वांच्या निदर्शनास आले आहे.

महाराष्ट्रात देखील वृक्ष लागवडीसाठी प्रचंड मोठा वाव आहे. राज्यामध्ये वन, सामाजिक वनीकरण, कृषी व फलोत्पादन, ग्रामविकास व जलसंधारण, सार्वजनिक बांधकाम, जलसंपदा विभाग, आदिवासी विकास, नगर विकास विभागांतर्गत नगर पालिका व महानगरपालिका, शालेय शिक्षण व उच्च आणि तंत्र शिक्षण विभागाअंतर्गत शाळा, महाविद्यालये व विद्यापीठे, खाजगी, सेवाभावी व स्वयंसेवी संस्था, खाजगी उद्योजक, रोटरी क्लब इत्यादी आणि आणखी काही संस्थांना या सामाजिक कामात समावून घेणे शक्य आहे.

त्यादृष्टीने सन २०१६ मधील पावसाळ्यात दि. १ जुलै ते ७ जुलै, २०१६ या वन महोत्सव कालावधीमधील आठवड्यात कोणताही एक दिवस निश्चित करुन त्या दिवशी किमान २ कोटी वृक्ष लागवड करण्याबाबत आराखडा व कृती कार्यक्रम तयार करण्याबाबत मा. मंत्री (वने) यांच्याकडे दि. २९.१२.२०१५ रोजी झालेल्या बैठकीत निर्णय घेण्यात आला. त्या अनुषंगाने या कार्यक्रमाचे नियोजन करण्याबाबत प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांच्या अध्यक्षतेखाली दि. ८ जानेवारी, २०१६ रोजीच्या पत्रान्वये समिती गठीत करण्यात आली आहे. तसेच समितीच्या

कामकाजाची रुपरेषा निश्चित करण्यात आली आहे. त्यानुसार मा.मंत्री (वने) यांच्याकडे लवकरच सादरीकरण केले जाणार आहे.

राज्यात वर नमूद कालावधीमध्ये एका दिवसात वृक्ष लागवडीचा जो विक्रम केला जाईल, तो जागतिकस्तरावर देखील कोणीही तोडू शकणार नाही, अशा पध्दतीने कार्यक्रम राबविण्याबाबत नियोजन व्हावे.

### ७७) संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातील अतिक्रमण केलेल्यांना घरे देण्याचा कालबध्द कार्यक्रम :-

संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातील जमिनीवर अतिक्रमण केलेल्या रहिवाशांपैकी दिनांक १.१.१९९५ पूर्वी पात्र झोपडपट्टीधारकांना पर्यायी घरे देण्याबाबत शासनाने जबाबदारी स्विकारली आहे. आतापर्यंत जवळपास ११,००० झोपडीधारकांना पर्यायी घरे दिली आहेत. अद्यापही जवळपास १३,००० झोपडीधारकांना पर्यायी घरे द्यावयाची आहेत. त्यासंदर्भातील कालबध्द कार्यक्रम आखून त्याची अंमलबजावणी झाल्यास रहिवाशांचा रोष मावळेल. तसेच मानव-वन्यप्राणी संघर्षाची तीव्रता कमी होईल. त्यादृष्टीने या प्रस्तावाचा विचार व्हावा.

### ७८) ट्रि क्रेडिटची ( वृक्षगुण/पत ) योजना :-

राज्यामधील वनक्षेत्र वाढविण्याच्या दृष्टीने राज्यातील लोकांना योग्य तो नियतकालीक आर्थिक मोबदला मिळवून देवून त्यांनी स्वेच्छेने आणि स्वयंस्फुर्तीने वृक्षांचे संरक्षण करण्यासाठी अनुकूल परिस्थिती निर्माण करण्यासाठी ट्रि क्रेडिट ही संकल्पना तयार करण्यात आली आहे.

या अंतर्गत निवडक प्रजातीचे वृक्ष लावणाऱ्या व त्यांचे संवर्धन करणाऱ्या व्यक्ती/संस्था ( वृक्षधारक ) यांना प्रत्येक वृक्षाकरिता वृक्षाचे वय किमान पाच वर्षे झाल्यानंतर वृक्षगुणांच्या स्वरुपात नियतकालिक प्रमाणपत्रे प्रदान करणे प्रस्तावित आहे. सदर वृक्षगुण प्रक्रिया वृक्ष परिपक्व होईपर्यंत दर पाच वर्षाच्या अंतराने करण्यात येईल. वृक्षपत प्रमाणपत्रे ही शेअर्सच्या स्वरुपात असतील व त्यांची किंमत मागणी व पुरवठा या प्रमाणात बदलेल.

वरील प्रस्तावावर शासनाचा निर्णय तातडीने व्हावा.

### ७९) ग्रीन बोनस देण्याची योजना :-

मा.मंत्री (वित्त, नियोजन व वने) यांनी राज्यातील दुष्काळी परिस्थिती, विशेषत: मराठवाड्यात वारंवार उदभवणाऱ्या टंचाई परिस्थितीवर मात करण्यासाठी उपस्थित झालेल्या विधानसभेतील चर्चेवर दि. २२.१२.२०१५ रोजी उत्तर दिले. त्यावेळी मा.मंत्री महोदय यांनी राज्यातील ज्या जिल्ह्यात ३३% पेक्षा जास्त वनक्षेत्र आहे त्या जिल्ह्यांना ग्रीन बोनस निधी उपलब्ध करुन देण्यात येईल, असे सभागृहात उपस्थित झालेल्या मुद्याच्या अनुषंगाने सभागृहास आश्वासित केले.

त्या अनुषंगाने ग्रीन बोनस निधी देण्यासाठी कोणते निकष असावेत आणि त्याचा विनियोग कोणकोणत्या बाबींसाठी करता येईल, उदा. गौण वनोपजावर प्रक्रिया, रोजगार निर्मिती व वनक्षेत्रावरील अवलंबित्व कमी करणे इत्यादिबाबत धोरणात्मक निर्णय घेणे आवश्यक आहे. सन २०१६ मधील पावसाळ्यात दि. १ जुलै ते ७ जुलै या वन महोत्सवाच्या कालावधीतील एका दिवशी २ कोटीपेक्षा जास्त रेकॉर्ड ब्रेकिंग वृक्ष लागवड करण्यासंदर्भात कृती आराखडा बनविण्याबाबत प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांच्या अध्यक्षतेखाली दि. ८.१.२०१५ रोजीच्या पत्रान्वये समिती नेमण्यात आली आहे. या समितीकडे ग्रीन बोनसचा विषय सोपविण्यात आला आहे. त्या समितीच्या शिफारशीनुसार पुढील कार्यवाही तातडीने करण्यात यावी.

## ८०) <u>विविध कंपन्यांच्या CSR निधीतून वृक्ष लागवडीचा कार्यक्रम आखणे :-</u>

राज्यामध्ये जलयुक्त शिवार अभियानाची अंमलबजावणी करण्यासाठी, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय, क्र. जलअ-२०१४/प्र.क्र.२०३/जल-७, दि. ०५/१२/२०१४ अन्वये सविस्तर सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत. या शासन निर्णयातील परिच्छेद क्र. १५ मध्ये जल व मृदसंधारणार्थ टंचाई सद्दश परिस्थितीला तोंड देणेकरिता वृक्ष लागवडीस प्रोत्साहन देऊन वृक्ष लागवड करणेबाबत CSR फंडातून कामे घेण्याबाबत तरतूद करण्यात आली आहे. हरितीकरणाद्वारे पर्यावरण आणि आर्थिक परिस्थितीचे सशक्तीकरण करण्याचा उद्देश आहे.

या प्रस्तावांतर्गत त्रिसदस्यीय करारनामा करुन वृक्ष लागवड कार्यक्रम राबवावयाचा आहे. त्या दृष्टीने राज्यामध्ये कोणत्या भागामध्ये आणि किती क्षेत्रात वृक्ष लागवड करणे शक्य आहे यासंदर्भात माहिती संकलित करुन त्यानुसार कृती आराखडा तयार करण्यात यावा. सदर आराखड्याची कालबध्दरितीने अंमलबजावणी व्हावी.

## ८१) <u>गोंडवाना विद्यापीठात वन विभाग अभ्यासक्रमाचा विचार करणे :-</u>

आदिवासी, नक्षलग्रस्त, दुर्गम आणि अतिदुर्गम भागामध्ये उच्च शिक्षणाच्या आणि संशोधनाच्या सोयी-सुविधा उपलब्ध होण्यासाठी गडचिरोली येथे गोंडवाना विद्यापीठाची स्थापना करण्यात आली आहे. विद्यापीठाचे कार्यक्षेत्र चंद्रपूर आणि गडचिरोली जिल्हे आहेत. या जिल्ह्यांमध्ये अनुक्रमे ४५% आणि ७८% इतकी वनाचे प्रमाण आहे. जैवविविधतेचा प्रंचड मोठा वारसा या भागास लाभला आहे. वन आणि वन्यजीव यांच्यातील विविधता मोठ्या प्रमाणात या भागात दिसून येते. त्यामुळे वन, वन्यजीव, जैवविविधता, सामाजिक वनीकरण आणि पर्यावरण यासंदर्भातील अभ्यास आणि संशोधन करण्यासाठी विद्यार्थांना खूप वाव आहे.

उपरोक्त बाबी लक्षात घेता गोंडवाना विद्यापीठामध्ये वन विभागासंदर्भात अभ्यासक्रम सुरु केल्यास राज्याच्यादृष्टीने खुप फायदयाचे ठरेल. त्याअनुषंगाने प्रस्ताव उच्च व तंत्रशिक्षण विभागाकडे मान्यतेसाठी सादर करण्यात यावा. शासनाची अंतिम मान्यता मिळण्यासाठी जातीने प्रयत्न व्हावेत.

८२) **महाबळेश्वर येथील पोलो ग्राऊंडचा विकास व आंतरराष्ट्रीय स्पर्धांचे आयोजन करणे :-**

वन विभागाच्या अखत्याऱ्यात महाबळेश्वर येथील बॉम्बे पॉईंट जवळ पोलो ग्राऊंड हे पर्यटकांच्या आकर्षणाचे केंद्र आहे. त्याठिकाणी निसर्ग आणि व्याघ्र पायवाटेव्दारे दूरपर्यंत चालू शकणाऱ्या निसर्गप्रेमींना येथे पोहचता येते. बॉम्बे पॉईंट जवळ निसर्ग सानिध्यात सुर्यास्ताचे आगळेवेगळे दर्शन घेता येते. हा अनुभव पर्यटकांसाठी पर्वणी समजली जाते.

सदर पोलो ग्राऊंडवर पुर्वी खाजगी घोडेस्वारांच्या मदतीने रपेट मारता येत होती. तथापि, आता येथील सर्व उपक्रम बंद झाले आहेत. पोलो ग्राऊंड उत्तमरितीने विकसित केल्यास तेथे पर्यटन केंद्र म्हणून नावारूपास येईल. महाबळेश्वरमध्ये दरवर्षी देश विदेशातील लाखो पर्यटक येत असतात. पर्यटकांनी पोलो ग्राऊंडला भेट दिल्यास वन खात्यास महसूल मिळेलच पण त्याचबरोबर स्थानिक लोकांना विशेषत: तरुणांना गाईड म्हणून इतर बाबींमध्ये रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील.

वरील बाबी विचारात घेवून पोलो ग्राऊंडचा पर्यटन केंद्र म्हणून विकास करण्यासाठी तज्ञ व्यक्तींमार्फत अभ्यास व्हावा आणि त्यांनंतर सदर केंद्र विकसित करण्यासाठी नियोजन आराखडा तयार करून अंमलबजावणी व्हावी. त्याचबरोबर या ठिकाणी आंतरराष्ट्रीय स्पर्धांचे आयोजन करण्याबाबत आणि मा. राज्यपाल यांच्याकडे दिनांक ३०.११.२०१५ रोजी झालेल्या बैठकीमध्ये पोलो ग्राऊंड संदर्भात घेतलेल्या निर्णयांबाबत लवकरात लवकर कार्यवाही व्हावी.

८३) **पश्चिम घाट विकासाची योजना व पर्यटन विकास :-**

पश्चिम घाट क्षेत्र हे वन, वन्यजीव आणि जैवविविधतेच्या दृष्टीने अतिशय संवेदनशिल क्षेत्र म्हणून ओळखले जाते. तसेच जगातील जगातील सर्वात जास्त जैवविविधता असणाऱ्या जागांपैकी पश्चिम घाट हे एक ठिकाण आहे. इथे ५००० पेक्षा जास्त फुलझाडे, १३९ प्राण्यांच्या जाती, ५०८ पक्ष्यांच्या जाती व १७९ उभयचर प्राण्यांच्या जाती आढळतात. माथेरान, लोणावळा, खंडाळा, महाबळेश्वर पाचगणी, अंबोली घाट या सारख्या महत्त्वाच्या पर्यटन स्थळांचा समावेश आहे. पावसाळ्यात पश्चिम घाटाचे सौंदर्य वाढविण्यास कारणीभूत घटक म्हणजे प्रेक्षणीय धबधबे आणि पर्यटन स्थळे.

वन विभागांतर्गत वन आणि पर्यटन स्थळे विकसित करण्यास खूप मोठा वाव आहे. येथील जैवविविधतेमध्ये देश-विदेशातील पर्यटकांना आकर्षित करण्यासाठी पर्यटन स्थळांवर उत्तम सोयी-सुविधा निर्माण झाल्यास त्याचा राज्याला खूप फायदा होईल. तसेच सह्याद्री व्याघ्र प्रकल्पाच्या उभारणी आणि विकासामध्ये येणारे अडथळे आणि समस्या दूर करुन तो प्रकल्प वेगाने कार्यान्वित करण्यासाठी चिकाटीने प्रयत्न होणे गरजेचे आहे.

राज्यातील पश्चिम घाट क्षेत्रातील परि-संवेदनाशील ( Eco-Sensitive Zone ) क्षेत्राची सिमा डॉ. के. कस्तुरीरंगन यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या उच्चस्तरीय कार्यगटाच्या अहवालात नमूद केलेल्या शिफारशीनुसार अधिसूचित करावयाची आहे. तथापि, अशारितीने कार्यवाही करण्यापूर्वी महसूल विभागाच्या दिनांक ४.०६.२०१४ रोजीच्या शासन निर्णयान्वये गावनिहाय समित्या व राज्यस्तरीय समिती गठीत करण्यात आली. त्याअनुषंगाने गावस्तरीय समित्यांच्या अहवालानुसार राज्यस्तरीय कमिटीने केलेल्या शिफारशीनुसार कस्तुरीरंगन समितीने निश्चित केलेल्या परि-संवेदनशील क्षेत्रात काही बदल संभवत आहे. त्यानुसार क्षेत्र निश्चिती करण्याबाबत केंद्र शासनास दि. ७.०९.२०१५ रोजीच्या पत्रानुसार प्रस्ताव पाठविण्यात आला आहे. त्या प्रस्तावाचा देखील पाठपूरावा होवून अंतिम निर्णय केंद्र शासनाकडून मिळण्याबाबत कार्यवाही व्हावी.

त्याचप्रमाणे वन विभागामार्फत पश्चिम घाट विकासाच्या दृष्टीने कोणत्या घटकांचा समावेश करता येईल, याचा अभ्यास करुन आराखडा हा पर्यटन विकासासह तयार करावा व त्याची अंमलबजावणी करण्यात यावी.

## ८४) वन जमिनीवर अतिक्रमण होऊ नये म्हणून नियम आणि कायदयात बदल करण्यासंदर्भात अभ्यास होणे :-

शहरी आणि ग्रामीण भागाच्या जवळपास असणाऱ्या वनक्षेत्रातील वन जमिनीवर होणारे अतिक्रमण ही मोठी समस्या विभागाला भेडसावत आहे. त्यावर वेळीच उपाययोजना न केल्यास वन आणि निसर्गसंपदेचे प्रमाण कमी होत राहील. वनाजवळ जेवढे रहिवाशी क्षेत्र जास्त तेवढी वन्यजीवांची नैसर्गिक अन्न साखळी बाधित होते. त्याचबरोबर वनाशेजारील लोकांचे वनावरील अवलंबित्व वाढत जाते. त्यातून जैवविविधतेला मोठा धोका संभवतो. अशा भागात विविध कारणांमुळे प्रदुषण वाढल्यामुळे पर्यावरणाची सुरक्षितता देखील प्रभावित होते.

सध्या अस्तित्वात असलेल्या कायद्यांमध्ये काही त्रृटी व कमतरता असल्यामुळे अतिक्रमण धारकांना सक्षम प्राधिकाऱ्यांकडून आणि न्यायालयाकडून जबर शिक्षा होत नाही. त्यामुळे वनक्षेत्रावर अतिक्रमण करण्याच्या घटना वाढत जात असल्याच्या दिसून येतात. यावर प्रभावी उपाययोजना करण्यासाठी प्रस्तापित कायद्यांमध्ये आवश्यक त्या सुधारणा, भर किंवा नवीन तरतूदी समाविष्ट करणे ही परिस्थितीची गरज आहे. त्यानुसार अभ्यास हाती घ्यावा. आवश्यकता वाटल्यास या क्षेत्रातील तज्ञ आणि अनुभवी लोकांची समिती स्थापन करण्यात यावी. सदर अभ्यास पुढच्या तीन महिन्याच्या कालावधीत पूर्ण करुन शासनास शिफारशी सादर कराव्यात. शासनाने त्यावर दोन महिन्याच्या काळात निर्णय घ्यावा.

## ८५) कॉफी टेबल पुस्तक तयार करुन सर्व पंचतारांकित हॉटेलमध्ये विक्रीची व्यवस्था करणे :-

राज्यातील अभयारण्ये, राखीव क्षेत्र आणि व्याघ्र प्रकल्प या संदर्भात उत्तम, आकर्षक आणि सुंदर छायाचित्रांसह कॉफी टेबल बुक तयार करण्यात आले आहे. या पुस्तकाचे विमोचन व्याघ्र दिनानिमित्त

मंत्रालयामध्ये दिनांक ४.०८.२०१५ रोजी झालेल्या कार्यक्रमाच्यावेळी मा. मुख्यमंत्री यांच्या हस्ते करण्यात आले. सदर पुस्तकाबद्दल अत्यंत चांगल्या प्रतिक्रिया लोकांकडून आल्या आहेत. हे पुस्तक कायमस्वरुपी संग्रही ठेवण्यासाठी लोक तयार होतील.

सदर कॉफी टेबल बुक पंचताराकित हॉटेलमध्ये ठेवल्यास देशी विदेशी पर्यटकांना राज्यातील वनवैभव, निसर्गसंपदा आणि जैवविविधतेबाबत उत्तम माहिती मिळू शकेल. त्यातून पर्यटन क्षेत्राला चालना मिळेल. त्याचबरोबर राज्यातील वनक्षेत्राचा मोठा प्रसार आणि प्रचार होण्यास मदत होईल. त्याअनुषंगाने या पुस्तकाच्या जास्तीत जास्त प्रती काढून पंचतारिक हॉटेलमध्ये विक्रिसाठी ठेवण्यात याव्यात.

### ८६) वन विभागाची नियतकालिके ( Publication ) याचा आढावा घेवून त्याची प्रसिध्दी योजना :-

वन व सामाजिक वनीकरणांतर्गत मुख्य आणि क्षेत्रीय कार्यालयांकडून वन, वन्यजीव, जैवविविधता आणि पर्यावरण यासंदर्भात वेगवेगळया विषयांवर नियतकालिके, पब्लिकेशन्स आणि इतर प्रसिध्दी साहित्य तयार केले जाते. त्यामध्ये ई-पत्रिका, एनजीसी टाईम्स ( National Green Corps Times ), सहयाद्री वार्ता, सहयाद्री जनवार्ता, मेल व्याघ्र इत्यादीचा अंतर्भाव आहे. अशा नियतकालिकांच्या संख्येमध्ये आणखी वाढ होणे अपेक्षित आहे.

तथापि, वर नमूद साहित्याचा व्यापक प्रसिध्दी आणि विस्तारासाठी उपयोग होणे गरजेचे आहे. लोकांपर्यंत हे साहित्य पोहचणे अपेक्षित आहे. तरच वन आणि वन्यजीव क्षेत्राबाबत लोकजागृती, प्रबोधन आणि शिक्षण होण्यास मदत होईल. त्यादृष्टीने निरनिराळया कार्यालयांनी तयार केलेली नियतकालिके आणि पब्लिकेशन्स वन विभागांतर्गत पुणे आणि नागपूर येथील प्रसिध्दी व विस्तार विभागाकडे आवर्जुन पाठवावित. प्रसिध्दी विभागाने हे साहित्य निरनिराळया कार्यक्रमांच्या स्थळी महत्वाची ठिकाणे, पर्यटन स्थळे, पंचताराकिंत हॉटेल्स इत्यादी व अन्य ठिकाणी प्रसिध्दी व विक्रीसाठी ठेवावीत.

### ८७) वन विभाग पब्लिसिटी प्लॅनचा वेळोवेळी आढावा व त्यात नाविन्यपूर्ण संकल्पनांद्वारे प्रसिध्दी :-

वन विभागाचे प्रसिध्दी व माहिती शाखा प्रधान मुख्य वनसंरक्षक व महासंचालक, सामाजिक वनीकरण संचालनालय, पुणे यांच्या अधिपत्याखाली आणण्याबाबत दि. १६.०७.२०१५ रोजीच्या शासन निर्णयान्वये आदेश निर्गमित केले आहेत. त्यामुळे प्रसिध्दी व विस्तार कार्यक्रमाचे काम अधिक व्यापक आणि गतिशिल करण्याचा प्रयत्न आहे. वन आणि सामाजिक वनीकराणांतर्गत वेगवेगळया विषयांवरील माहिती जनतेपर्यंत मोठया प्रमाणात पोहचविणे गरजेचे आहे. त्याअनुषंगाने प्रसिध्दी आणि विस्तार कार्यक्रमाचा कालबध्द आराखडा तयार करुन त्याची अंमलबजावणी करणे अपेक्षित आहे.

प्रसिध्दी आणि विस्तार कार्यक्रमांतर्गत नवीन संकल्पना, नाविण्यपूर्ण विचार, सर्जनशिलता (Creativity), कलात्मकता आणि आधुनिक तंत्राचा वापर होणे आवश्यक आहे. त्यासाठी खाजगी जाहिरात एजन्सी, सल्लागार आणि या क्षेत्रातील तज्ञ व्यक्ती यांच्या सहाय्याने प्रसिध्दी संदर्भातील आराखडा तयार

करण्यात यावा. सदर आराखडयाचा वेळोवेळी आढावा घेण्यात यावा. त्यात परिस्थितीनुरुप सुधारणा व्हावी.

## ८८) ग्रीन आर्मी संकल्पना विकसीत करणे :-

वने, वन्यप्राणी, जैवविविधता, वनसंपदेचे व पर्यावरणाचे रक्षण व संवर्धन याबाबत शालेय विद्यार्थ्यांना संस्कारक्षम वयात जाणीव व आवड निर्माण होण्यासाठी प्रयत्न होणे गरजेचे आहे.

वन विभागाच्या पुढाकाराने शालेय शिक्षण विभागाने दि. १५.७.२०१५ रोजीच्या शासन आदेशान्वये वृक्षारोपण आणि पर्यावरण रक्षक सेना स्थापित करण्याबाबत निर्णय घेतला आहे. केंद्र शासनाच्या राष्ट्रीय हरित सेना शाळांच्या धर्तीवर प्रत्येक शाळेत किमान १० विद्यार्थी/विद्यार्थीनीचा गट "पर्यावरण रक्षक सेना" (Green Army) म्हणून तयार करण्याबाबत सूचना दिल्या आहेत. त्यामध्ये एक विद्यार्थी/विद्यार्थीनी गटप्रमुख राहील. या विद्यार्थी/विद्यार्थीनींना वनसंपदेचे आणि पर्यावरणाचे रक्षण, संवर्धन यासाठी प्रशिक्षित व प्रोत्साहित करण्यात यावयाचे आहे.

या योजनेचा भाग म्हणून तालूका, जिल्हा व विभाग स्तरावर, निबंधस्पर्धा/चित्रकलास्पर्धा/ छायाचित्रस्पर्धा/ वक्तृत्व स्पर्धा घेवून बक्षिसे देण्याबाबत सूचना आहेत.

वरील प्रयत्नांचा भाग म्हणून पहिल्या टप्प्यात दि. १५ ऑगस्ट, २०१५ रोजी जवळपास ३०,००० शाळांमध्ये ६ लाख वृक्षांची लागवड करण्यात आली. तसेच या शाळांमध्ये २८,३७५ "पर्यावरण रक्षक सेना" स्थापन करण्यात आल्या आहेत.

वरील कार्यक्रमाची व्याप्ती सन २०१६ पासून आणखी मोठ्या प्रमाणात वाढविण्यासाठी आणि मोठ्या संख्येने पर्यावरण रक्षक सेना (हरित रक्षक सेना) स्थापित करण्याबाबत कालबध्द कार्यक्रम तयार करुन कार्यान्वित व्हावा.

## ८९) वन विभागात नाविन्यपूर्ण संकल्पनांसाठी इच्छूक अधिकारी/कर्मचारी/वनक्षेत्रात काम <u>करणाऱ्या व्यक्ती यांची टिम करुन त्यांच्याकडून सूचना घ्याव्यात :-</u>

एकविसाव्या गतिमान शतकात यश मिळविण्यासाठी कर्मचारी आणि अधिकाऱ्यांमध्ये सकारात्मक विचारधारा रुजविणे आवश्यक आहे. लोकांना तत्पर आणि दर्जेदार सेवेची अपेक्षा आहे. लोकांच्या आशा आणि आकांक्षामुळे बहुतांशी कामांमध्ये ज्ञानाचा वापर वाढणार आहे. त्यामुळे कामात नवनवीन कल्पनांचा वापर करणे आवश्यक आहे. प्रचंड मोठी माहितीची भांडारे हाताळणे ही परिस्थितीची गरज आहे. त्यातून निर्माण होणाऱ्या निष्कर्षाचा वापर दैनंदिन कामात करावा लागणार आहे. त्यासाठी कर्मचारी/अधिकारी यांच्यामध्ये कामाप्रती निष्ठा आणि उत्तम क्षमतांचा विकास झाला तर नव्या शतकाने उभी केलेली आव्हानात्मक आणि स्पर्धात्मक परिस्थितीस आपण खात्रीने तोंड देऊ शकू.

वन आणि सामाजिक वनीकरण या क्षेत्रामध्ये सर्जनशिलतेला (Crativity) खूप मोठा वाव आहे. उपरोक्त बाबींचा विचार केला करता वन विभागात नाविन्यपूर्ण संकल्पनांसाठी इच्छूक

अधिकारी/कर्मचारी व वनक्षेत्रात काम  करणाऱ्या व्यक्ती यांची टिम करुन त्यांच्याकडून सूचना घेणे उपयुक्त राहील.  त्यातून नवीन संकल्पना आणि विचार समोर येतील.  त्याचा उपयोग विभागाचे काम गतिमान आणि कार्यक्षम करण्यासाठी होईल.  त्यादृष्टीने कार्यवाही होईल.

**९०) वन पर्यटनस्थळे यांचा रेंजनिहाय आढावा घेवून त्यांचा विकास करण्याचा <u>कालबध्द कार्यक्रम :-</u>**

राज्यातील विविध भागात निसर्गसौंदर्याने नटलेली अनेक पर्यटन स्थळे आहेत. तिथे उत्तम सोयी-सुविधा निर्माण करुन विकास केल्यास अनेक पर्यटक अशा ठिकाणी आकर्षित होतील.  राज्याचे नाव सर्वदूर पसरले जाईल.  महसूल व रोजगार निर्मितीमध्ये याचा प्रंचड फायदा राज्याला होईल. त्यासाठी राज्यातील प्रत्येक रेंजमध्ये कुठे पर्यटन स्थळे विकसित करण्यास वाव आहे याची स्थळनिश्चिती होणे गरजेचे आहे.  त्यादृष्टीने प्रत्येक रेंजनिहाय अस्तित्वातील पर्यटन स्थळे आणि नव्याने निश्चित झालेली पर्यटन स्थळे यांचा टप्याटप्याने विकास करण्याबाबत कालबध्द कार्यक्रम हाती घेवून कार्यान्वित करण्यात यावा.

**९१) वन, वन्यप्राणी, जैवविविधता व सामाजिक वनीकरण यासंदर्भांतील महत्व जनतेसमोर येण्यासाठी मोटारसायकल/सायकल वरून राज्य,देश आणि विदेश स्तरावर प्रवास करणाऱ्या व्यक्तींना <u>प्रोत्साहन देणे :-</u>**

राज्यातील आणि देशातील निसर्ग, वन व पर्यावरण प्रेमी आणि हरहुन्नरी  अशा व्यक्ती छंद म्हणून वेगवेगळया पर्यटन आणि धार्मिक स्थळांना भेटी देत असतात. काही लोक गटा - गटाने किंवा समुहाने असा खूप लांबचा प्रवास करत असतात. राज्यातील महत्वाचे व्याघ्र प्रकल्प, राष्ट्रीय उद्याने आणि संरक्षित क्षेत्रांमधील पर्यटन स्थळांना आवर्जुन भेटी देतात.  त्याशिवाय देशामध्ये  उदा. श्रीनगर, लेह, मानससरोवर, हरिव्दार, ऋषीकेश, चारधाम,  कन्याकुमारी, मध्य भारत आणि पुर्वाचंल प्रदेश इत्यादी ठिकाणी भेटी देतात.

अशा व्यक्तींना  वर नमूद केलेल्या बाबींसंदर्भांत प्रसिध्दी करण्यासाठी प्रोत्साहित करता येऊ शकेल. त्यासाठी त्यांना वन्यजींव आणि दुर्मिळ पशु पक्षी यांची छायाचित्रे असलेले पेहराव (Dress) वन विभागामार्फत किंवा या क्षेत्रात काम करणाऱ्या सेवाभावी संस्थांमार्फत देण्यात यावेत.  (उदा. वाघ, सिंह, इत्यांदी). तसेच अशा प्रवासाच्या मार्गस्थ ठिकाणी असलेल्या वनविभागाच्या विश्रामगृहात त्यांना काही काळा वास्तव्य करण्यासाठी सहाय्य करावे. इतर राज्यात वन विभागाच्या विश्रामगृहात त्यांना वास्तव्य करण्यासाठी तेथील व्यवस्थापनाशी संपर्क साधून मदत करता येईल.  जेणेकरुन त्यांचा प्रवास सुखकारक आणि आल्हाददायी होवू शकेल.  त्यादृष्टीने धोरणात्मक निर्णय घेवून क्षेत्रीय अधिकाऱ्यांना कळविण्यात यावे.

## ९२) राज्यातील उत्तम वन आणि पर्यटन स्थळांच्या ठिकाणी सहली आयोजित करणे:-

राज्याला उत्तम असे वनवैभव आणि निसर्गसंपदा लाभलेली आहे. अशा ठिकाणी जास्तीत जास्त लोकांनी भेटी दिल्यास ती ठिकाणे पर्यटन स्थळे म्हणून अधिक नावारूपाला येवू शकतात. त्यातून राज्याचे महसूली उत्पन्न तर वाढेलच पण त्याच बरोबर तरूणांना आणि स्थानिक लोकांना रोजगाराच्या विविध संधी उपलब्ध होतील. राज्याच्या विकासाला व प्रगतीला त्यातून हातभार लागेल.

त्यासाठी राज्यातील उद्योगपती,पत्रकार आणि मान्यवर व्यक्ती यांच्या सहली वन , अभयारण्ये व व्याघ्र प्रकल्पांच्या ठिकाणी वन विभागामार्फत आयोजित करणे योग्य राहिल. डेक्कन ओडिसी सारख्या रेल्वेव्दारे अशा मान्यवरांना जवळच्या रेल्वे स्टेशनपर्यंत नेता येईल. तेथून बसेसव्दारे पर्यटनस्थळांपर्यंत प्रवास करता येईल. उदा. ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्प, कास पठार इत्यादी त्यातून अशा पर्यटन स्थळांचा अधिक विकास होण्यास मदत होईल.

उपरोक्त बाबी लक्षात घेता या संदर्भात धोरणात्मक निर्णय घेवून अंमलबजावणी व्हावी.

## ९३) ताडोबा - अंधारी व्याघ्र प्रकल्प आणि इतर अभयारण्ये आणि राष्ट्रीय उद्याने यामधील अंतर्गत रस्ते उत्तम दर्जाचे तयार करणे :-

राज्यामध्ये एंकदर ५७ राष्ट्रीय उद्याने आणि अभयारण्ये आहेत. याठिकाणी देशी विदेशी पर्यटक मोठया संख्येने येत असतात. याठिकाणचे अंतर्गत रस्ते पारंपारिक पध्दतीने सिमेंटचे किंवा डांबरीकरणाने तयार केलेले आहेत. सदर रस्ते आधुनिक तंत्रज्ञान आणि सिमेंट व डांबर यांचा वापर न करता अन्य पर्यावरण पूरक साहित्य आणि सामुग्री वापरून आतिशय सुबक, गुळगुळीत आणि उत्तम दर्जाचे तयार करता येवू शकतात. त्यासाठी आंतरराष्ट्रीय स्तरावर उपलब्ध असलेल्या तंत्रज्ञानाचा अभ्यास आणि माहिती घेवून त्याप्रमाणे आपल्या राज्यात देखील असे रस्ते बनविणे आवश्यक आहे.

पर्यटकांना नाविन्यपूर्ण बाबी निदर्शनास आल्यास तिकडे ते आकर्षित होतात. त्यासाठी वन विभागांतर्गत उत्तम वन, वन्यजीव आणि निसर्ग पर्यटनस्थळी सतत काही ना काही आकर्षक गोष्टीचीं निर्मिती होणे गरजेचे आहे. प्रत्येक बाबतीत सर्जनशीलता (creativity) दिसावी. तरच पर्यटक तिकडे वळण्यास तयार होतात.

वरील बाबींचा विचार करुन वन विभागांतर्गत वेगवेगळया ठिकाणचे रस्ते निर्मितीबाबत धोरण ठरवून अंमलबजावणी व्हावी.

## ९४) वन विभागांतर्गत अभयारण्ये, राष्ट्रीय उद्याने, व्याघ्र प्रकल्प आणि महत्वाची वने व निसर्ग पर्यटन केंद्र दर्शविणारे माहिती फलक (Signage Boards) अत्यंत आकर्षकरित्या लावणेबाबत:-

देशी विदेशी पर्यटकांना एखाद्या वन/ निसर्ग पर्यटनाच्या ठिकाणी सहजतेने येण्यासाठी महत्वाच्या ठिकाणी दिशादर्शक चिन्हे आणि माहिती फलक लावलेले असणे अत्यंत गरजेचे आहे. माहिती फलकांवर वाघ, सिंह आणि इतर वन्यप्राण्यांचे वेगवेगळया पोझमधील छायाचित्रे ठेवणे आवश्यक आहे. त्याचबरोबर वन आणि पर्यटन केंद्रांची रंगीत विशेषत: हिरवागार प्रदेशाची प्रचिती देणारी छायाचित्रे

लावणे योग्य राहते. त्यातून पर्यटकांची उत्सुकता ताणली जाते. अशा स्थळांना भेटी देण्यासाठी मौखीक प्रसिध्दी होत जाते. त्यातून वन व निसर्ग पर्यटन क्षेत्राकडे वन आणि निसर्गप्रेमी आकर्षित होतात. त्यामुळे पर्यटन क्षेत्राचा विस्तार होण्यास आपोआप मदत होते.

वरील बाबी विचारात घेवून यासंदर्भात निश्चित धोरण आणि निकष ठरवून त्याची अंमलबजावणी तातडीने होईल याद्दष्टीने कार्यवाही करावी.

९५) <u>कारवान टूरिझम (Caravan Tourism) :-</u>

कारवान टुरिझमच्या धर्तीवर राज्यामध्ये देखील वन व निसर्ग पर्यटन विकासास गती आणि चालना मिळावी म्हणून त्या दृष्टीने प्रस्ताव तयार करण्यात यावा व शासन मान्यतेने यासंदर्भातील मार्गदर्शक सूचना व निकष निश्चित करण्यात यावे आणि त्याप्रमाणे कार्यवाही व्हावी.

९६) <u>कृषि वानिकी क्षेत्रावर ( Field of Agro Forestry ) भर देणे :-</u>

राज्यातील वनक्षेत्र आणि वृक्षाच्छादन वाढविण्यासाठी आणि त्यातून शेतकऱ्यांना शेती उत्पादन वाढवून रोजगार निर्मिती करण्याच्या संधी उपलब्ध होण्यासाठी कृषी वानिकी हा उत्तम पर्याय आहे. अशा कार्यक्रमातून नापिक, पाणथळ, क्षारयुक्त, हलक्या प्रतिची आणि अवर्षणप्रवण भागातील शेतीची उत्पादकता वाढवून आर्थिकदृष्टया तेथील शेतकऱ्यांना सक्षम बनविण्याच्या दिशेने या कार्यक्रमाद्वारे मार्गक्रमण करता येवू शकेल. पिक उत्पादनाबरोबरच वृक्षांपासून चारा, लाकूड आणि गौण वनौपज असा दुहेरी फायदा मिळविणे शक्य आहे.

सबब कृषी वानिकी कार्यक्रमाबाबत सध्याचे धोरण, राज्य आणि केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचना आणि अंमलबजावणी बाबत येणाऱ्या अडचणी व त्रुटी यांचा अभ्यास करुन सुधारीत मार्गदर्शक सुचना आणि निकष निश्चित करण्याबाबत तातडीने कार्यवाही व्हावी.

९७) **राज्यातील संयुक्त वन व्यवस्थापन समित्यांचे कार्यक्षमतेबाबत निकष** ( Performance Indicators) <u>**ठरवून वर्गीकरण करण्याबाबत :-**</u>

राज्यातील वनक्षेत्रालगतच्या जवळपास १५,५०० गावांमध्ये लोकसहभागाद्वारे वन आणि वन्यजीव यांच्या संरक्षण व संवर्धनासाठी आणि वनक्षेत्र व वृक्षाच्छादन वाढविण्याच्या दृष्टीने संयुक्त वन व्यवस्थापन समित्या/गाव परिस्थितीकीय समित्या कार्यरत आहेत. या समित्यांच्या कामकाजाबाबत कार्यक्षमतेचे काही निकष विहित करून त्यांचे अ (चांगला), ब (सर्वसाधारण) आणि क (सर्वसाधारण पेक्षा कमी ) या वर्गवारीमध्ये वर्गीकरण होणे आवश्यक आहे.

असे वर्गीकरण झाल्यास संयुक्त वन व्यवस्थापन स़मित्यांना ते करीत असलेल्या कामाचा दर्जा आणि गुणवत्ता कोणत्या स्तरावर आहे, हे वेळोवेळी कळू शकेल. तसेच कामामध्ये असलेल्या उणिवा व त्रुटी दूर करण्यासाठी वाव राहील. त्याचबरोबर संयुक्त वन व्यवस्थापन समित्यांना आपापसात स्पर्धा करुन आणि चुरस निर्माण होवून उत्तम काम जनतेसमोर येवू देण्यास संधी राहील.

उपरोक्त बाबी विचारात घेवून सध्या अस्तित्वात असलेल्या संयुक्त वन व्यवस्थापन समित्यांच्या वर्गीकरणाची कार्यवाही येत्या **२ महिन्यात** पूर्ण करण्यात यावी. त्याचबरोबर अशा वर्गीकरणानंतर ज्या समित्यांचे कामकाज सर्वसाधारण किंवा त्यापेक्षा कमी आहे अशा समित्यांच्या कामकाजामध्ये सुधारणा घडवून आणण्यासाठी उपाययोजना करुन अशा समित्या “चांगल्या” ( अ ) प्रवर्गात येण्यासाठी पुढील **६ महिन्यात** कार्यवाही पूर्ण करावी.

९८) **विभागीय चौकशी प्रकरणे :-**

विभागांतर्गत विभागीय चौकशी प्रकरणे जवळपास ४७१ इतकी प्रलंबित आहेत. त्यामध्ये २ वर्षावरील प्रकरणे २३० इतकी आहेत. यातील बहुतांशी प्रकरणे क्षेत्रिय स्तरावर मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) यांच्याकडे प्रक्रियेखाली आहेत. या सर्व प्रकरणावर नियमानुसार विहित कालावधीत निर्णय होणे अपेक्षित आहे. तरच कर्मचारी/अधिकारी यांच्या पदोन्नत्या, सेवानिवृत्ती प्रकरणे आणि अन्य बाबींवर परिणाम होणार नाही. वर्षानुवर्ष प्रकरणे सुरु राहिल्यास विभागाचा अमुल्य वेळ त्यामध्ये जातो. धोरणात्मक आणि विकासात्मक बाबींकडे कमी वेळ दिला जातो. गतीमान आणि उत्तम प्रशासनाच्यादृष्टीने ही बाब खचितच योग्य नाही.

वरील परिस्थिती पहाता विभागीय चौकशी प्रकरणांवर विशेषत: २ वर्षावरी प्रलंबित प्रकरणे कालबध्द पध्दतीने नियोजन करुन त्यांचा निपटारा करण्याबाबत कार्यवाही व्हावी.

९९) **कार्यआयोजना ( Working Plan ) अदयावत करणे :-**

वनाचे शास्त्रोक्त पध्दतीने व्यवस्थापन करण्यासाठी कार्यआयोजना हा महत्वाचा घटक आहे. वनक्षेत्रातील वृक्षलागवड, झाडांची पाडणी, नैसर्गिक आणि कृत्रिम वनाची पूर्ननिर्मिती आणि त्याअनुषंगीक रोपवाटीकांची निर्मिती ही कार्यआयोजना प्रमाणे अपेक्षित आहे. वन उत्पादन वाढविण्याच्या दृष्टीने आणि सर्व वन उत्पादनाचे योग्य प्रकारे व्यवस्थापन हे देखील कार्यआयोजना प्रमाणे करावयाचे आहे.

सबब ज्या कार्यआयोजनाचा कालावधी संपला आहे ते नव्याने तयार करण्याबाबत तात्काळ कार्यवाही व्हावी. तसेच ज्यांचा कालावधी जवळपास संपत आला आहे ते देखील नव्याने तयार करण्याबाबत प्रक्रिया तातडीने सुरु करावी. तसेच संबंधित प्रस्तावांना केंद्र शासनाची परवानगी घेण्याबाबत देखील प्रक्रिया गतीमान व्हावी.

संरक्षित क्षेत्र, राखीव क्षेत्र आणि पडिक क्षेत्राबद्दलची माहिती महाराष्ट्र राज्य रिमोट सेन्सिंग एजन्सी, नागपूर यांच्याकडून संबंधित मुख्य वनसंरक्षक यांनी घ्यावी. सदर माहिती कार्यआयोजन तयार करणाऱ्या अधिकाऱ्यांना पुरवावी. जेणेकरुन कार्यआयोजना अचूकरित्या तयार करण्यास मदत होईल.

* * * * * * * * * * * * * *